सोलापूर
Solapur Tarun Bharat
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, २९ जुलै २०२४ | वर्ष दुसरे | अंक १२९ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

देशासाठी सतत काहीतरी नवीन करण्याची उर्जा कायम ठेवा : पंतप्रधान

नवी दिल्ली, २८ जुलै - देशासाठी सतत काहीतरी नवीन करण्याची उर्जा कायम ठेवा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना केले. त्यांनी 'मन की बात' (११२ वा भाग) कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधला. तसेच सध्या संपूर्ण जगावर पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धांची मोहिनी पसरलेली आहे. ऑलिम्पिक क्रीडास्पर्धा आपल्या खेळाडूंना जागतिक पातळीवर तिरंगा फडकवण्याची संधी देतात, देशासाठी काहीतरी करून दाखवण्याची संधी देतात. तुम्ही सर्वांनी सुद्धा आपल्या खेळाडूंचा उत्साह वाढवा, भारताला पाठींबा द्या, असेही त्यांनी सांगितले.

पंतप्रधान पुढे म्हणलो, क्रीडा विश्वातील या ऑलिम्पिकपेक्षा वेगळे असलेले गणिताच्या जगातील ऑलिम्पिक काही दिवसांपूर्वीच पार पाडले. आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड. या ऑलिम्पियाड मध्ये भारतातील विद्यार्थ्यांनी फार उत्तम कामगिरी करून दाखवली. या स्पर्धेत आपल्या भारतीय संघाने सर्वोत्तम कामगिरी करत चार सुवर्णपदके आणि एक रौप्य पदक जिंकले आहे. आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड या स्पर्धेत जगातील १०० हून अधिक देशांचे संघ सहभागी होतात आणि एकंदर पदकतालिकेचा विचार करता आपला संघ पहिल्या पाच सर्वोत्तम संघांमध्ये स्थान मिळवण्यात यशस्वी झाला. या स्पर्धेत देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे आहेत- पुण्याचा आदित्य वेंकट गणेश, पुण्याचाच सिद्धार्थ चोप्रा, दिल्लीचा अर्जुन गुप्ता, ग्रेटर नोईडाचा कणव तलवार, मुंबईचा ऋषील माथुर आणि गुवाहाटीचा आनंदो भादुरी.

'मानस' विशेष केंद्र अंमली

पदार्थांविरुद्धच्या लढाईतील मोठे पाऊल

प्रत्येक कुटुंबाला काळजी असते की आपलं मूल अंमली पदार्थांच्या विळख्यात सापडू नये. आता अशा लोकांना मदत करण्यासाठी सरकारने 'मानस' नावाचे विशेष केंद्र उघडले आहे. अंमली पदार्थांविरुद्धच्या लढाईतील हे एक मोठे पाऊल आहे. 'मानस' ही हेल्पलाइन आणि पोर्टल काही दिवसांपूर्वी सुरू करण्यात आले आहे. सरकारने '१९३३' हा टोल फ्री क्रमांक जारी केला आहे. यावर फोन करून कोणीही आवश्यक सल्ला घेऊ शकतो किंवा पुनर्वसनाशी संबंधित माहिती मिळवू शकतो. जर कोणाकडे अंमली पदार्थांशी संबंधित कोणतीही माहिती असेल तर ते या नंबरवर कॉल करून 'नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो' सोबत शेअर करू शकतात. मानसला पुरवलेली माहिती गोपनीय राखली जाते. भारताला अंमली पदार्थ मुक्त बनवण्यासाठी झटणाऱ्या सर्व लोकांना, सर्व कुटुंबांना, सर्व संस्थांना माझी विनंती आहे की मानस हेल्पलाइनचा पुरेपूर वापर करा.

वाघ आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग

उद्या जगभरात व्याघ्र दिन साजरा होणार आहे. भारतामध्ये वाघ हा आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. आपण सर्वजण वाघाच्या वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी ऐकतच लहानाचे मोठे झालो आहोत. जंगलासभोवतीच्या परिसरात राहणाऱ्या लोकांना वाघासोबत सहजीवन कसे जगायचे हे पक्के माहीत असते. अशी अनेक गावे आहेत, जिथे माणूस आणि वाघ यांच्यात कधीच संघर्ष होत नाही. मात्र जिथे असा संघर्ष उद्भवतो तिथे सुद्धा वाघांच्या संरक्षणासाठी मोठे प्रयत्न होत आहेत. लोकसहभागाचा असाच एक प्रयत्न म्हणजे कुल्हाडी बँड पंचायत. राजस्थानातील रणथंबोरपासून सुरू झालेली ही मोहीम रंजक आहे. कुऱ्हाड घेऊन जंगलात जाणार नाही आणि झाडे तोडणार नाही, अशी शपथ स्थानिक समाजानेच घेतली आहे. या एका निर्णयामुळे येथील जंगले पुन्हा हिरवीगार होत असून वाघांसाठी चांगले वातावरण निर्माण होत आहे.

जगातील ७० टक्के वाघ आपल्या देशात - महाराष्ट्रातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हा वाघांच्या प्रमुख अधिवासांपैकी एक आहे. इथल्या स्थानिक समुदायांनी, विशेषत: गोंड आणि माना जमातींच्या आमच्या बंधू-भगिनींनी इको-टूरिझमच्या दिशेने वेगाने पावले टाकली आहेत. त्यांनी जंगलावरील आपले अवलंबित्व कमी केले आहे जेणेकरून येथे वाघांच्या हालचाली वाढू शकतील. आंध्र प्रदेशातील नल्लामलाईच्या टेकड्यांवर राहणाऱ्या 'चेंचू' जमातीचे प्रयत्न पाहून तुम्हालाही आश्चर्य वाटेल. टायगर ट्रॅकर्स म्हणून त्यांनी जंगलातील वन्य प्राण्यांच्या हालचालींची प्रत्येक माहिती गोळा केली. यासोबतच त्यांनी परिसरातील अवैध कामांवरही लक्ष ठेवले आहे. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशातील पिलीभीत येथे सुरू असलेला 'बाग मित्र कार्यक्रम'ही खूप चर्चेत आहे. या अंतर्गत स्थानिक लोकांना 'बाग मित्र' म्हणजे व्याघ्रमित्र म्हणून काम करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. वाघ आणि मानव यांच्यात संघर्ष होणार नाही याची हे 'वाघमित्र' पूर्ण काळजी घेतात. असे अनेक प्रयत्न देशाच्या विविध भागात सुरू आहेत. मी येथे फक्त काही प्रयत्नांची चर्चा केली आहे परंतु मला आनंद आहे की लोकसहभागामुळे वाघांच्या संवर्धनात खूप मदत होत आहे. अशा प्रयत्नांमुळे भारतातील वाघांची संख्या दरवर्षी वाढत आहे. जगातील ७० टक्के वाघ आपल्या देशात आहेत हे जाणून तुम्हाला आनंद आणि अभिमान वाटेल.

'हर घर तिरंगा अभियानात सहभागी व्हा- १५ ऑगस्टचा दिवस आता फार दूर नाही. गेल्या काही वर्षांपासून देशभरात 'हर घर तिरंगा अभियाना'साठी सर्वांचाच उत्साह आहे. गरीब असो, श्रीमंत, छोटं घर असो की मोठं घर, प्रत्येकाला तिरंगा फडकवताना अभिमान वाटतो. तिरंग्यासोबत सेल्फी काढण्याची आणि सोशल मीडियावर पोस्ट करण्याचीही क्रेझ आहे. तुमच्या लक्षात आले असेल की जेव्हा कॉलनीत किंवा सोसायटीतील प्रत्येक घरावर तिरंगा फडकतो, तेव्हा काही वेळातच इतर घरांवरही तिरंगा दिसू लागतो. म्हणजेच 'हर घर तिरंगा अभियान', तिरंग्याच्या अभिमाना मुळे एक अनोखा उत्सव बनला आहे. आता याबाबत विविध प्रकारचे नवनवीन प्रयोग होऊ लागले आहेत. १५ ऑगस्ट जसजसा जवळ येतो तसतसे घर, कार्यालये, गाड्यांमध्ये तिरंगा लावण्यासाठी विविध प्रकारची उत्पादने दिसू लागतात. काही लोक तर 'तिरंगा' त्यांच्या मित्रांना आणि शेजाऱ्यांना वाटतात सुद्धा. हा आनंद, हा तिरंग्याबद्दलचा उत्साह आपल्याला एकमेकांशी जोडतो आहे.

ओबीसीचे १०० आमदार विधानसभेत गेले पाहिजेत - प्रकाश आंबेडकर

सोलापूर, २८ जुलै : ज्या राज्यात ७० हजार कोटीची चोरी होऊ शकते. मंत्र्याची हिशोबी बेहिशोबी संपत्ती कोटीच्या घरात वाढते मग ते राज्य भिकारी कसे म्हणायचे असा सवाल उपस्थित करत ओबीसीचे १०० आमदार विधानसभेत गेले पाहिजेत अशी भूमिका वंचित बहुजन आघाडीचे ॲड प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली. आरक्षण बचाव यात्रेच्या निमित्ताने ते शनिवारी मंगळवेढ्यात बोलत होते.

यावेळी अविनाश भोसीकर, रमेश बारसकर,सोमनाथ साळुंखे, इम्तियाज नदाफ, चंद्रशेखर मडीखांबे, अशोक माने,वैभव भंडारे, अनंता वाघमारे, रवींद्र आठवले, महादेव ढोणे, बिराप्पा मोटे,अशोक माने,सतीश लोकरे,अंकुश शेंबडे,आदी उपस्थित होते.

यावेळी ॲड आंबेडकर बोलताना म्हणाले की, सध्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून सामाजिक तणाव सुरू आहे तो बंद झाला पाहिजे.राजकीय पक्षानी मनोज जरांगे-पाटील यांची मागणी बरोबर की योग्य यावर भूमिका स्पष्ट केली नाही. राजकीय भूमिका ही राजकीय राहिली पाहिजे ती सामाजिक होता कामा नये मतं दुभांगली तर काही फरक पडत नाही मात्र मनं दुभागली नाही पाहिजेत राजकीय वाद सध्या काळात सामाजिक वादाकडे वळायला लागला आहे. देवेंद्र फडणवीस व शरद पवार हे समाजापुरते बघतात आणि राजकीय पक्षाची मानसिकता देखील समाजापुरते आहे ती जनतेसाठी नाही. आरक्षण प्रश्नांमध्ये दाखवायचे दात वेगळे आहेत.ओबीसीचे आरक्षण स्थायी करण्यासाठी ते घटनात्मक करणे आवश्यक आहे. भविष्यात ओबीसीचा राजकीय चेहरा उभा राहिला पाहिजे त्याचवेळी आरक्षण वाचू शकेल.विधानसभा निवडणुकीनंतर ओबीसी आरक्षणाला मोठा धोका आहे. त्या त्या पक्ष कार्यकर्त्यांनी आरक्षण प्रश्नावर बांधले पाहिजे. ओबीसीला जो पक्ष उमेदवारी देणार नाही तो आपला नाही शंभर आमदार निवडून गेले तरच आरक्षण वाचेल.राज्य श्रीमंत असल्यामुळे लाडका बहीण भाऊ साठी कोट्यावधीची तरतूद केली मात्र शिष्यवृत्तीसाठी ४५० कोटीची तरतूद करत नाही.

भारताने आशियाई आपत्ती पूर्वतयारी केंद्राचे अध्यक्षपद स्वीकारले

नवी दिल्ली, २८ जुलै : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली, आपत्ती जोखीम कमी करण्याच्या (डीडीआर) क्षेत्रात भारत जागतिक आणि प्रादेशिक नेतृत्वाची भूमिका बजावत आहे. भारताने त्यासाठी जागतिक पातळीवर अनेकवेळा पुढाकार घेतला आहे. आपत्ती रोधक पायाभूत सुविधांसाठी आंतरराष्ट्रीय युती (सीडीआरआय) हे त्याचेच उदाहरण आहे. केंद्र सरकारचे प्रतिनिधी तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे (एनडीएमए) विभागप्रमुख आणि सदस्य म्हणून राजेंद्र सिंह यांनी २०२४-२५ या वर्षासाठी चीनकडून आशियाई आपत्ती सज्जता केंद्राचे (एडीपीसी) अध्यक्षपद नुकतेच थायलंडमध्ये बँकॉक येथे स्वीकारले. एडीपीसी ही आशिया आणि प्रशांत प्रदेशात आपत्ती जोखीम कमी करण्यासाठी आणि हवामान बदलाचा प्रतिकार करण्यासाठी सहकार्य आणि अंमलबजावणी करणारी स्वायत्त आंतरराष्ट्रीय संस्था आहे. भारत तसेच बांगलादेश, कंबोडिया, चीन, नेपाळ, पाकिस्तान, फिलीपिन्स, श्रीलंका आणि थायलंड हे आठ शेजारी देश या संस्थेचे संस्थापक सदस्य आहेत. याच ठिकाणी एडीपीसीच्या विश्वस्त मंडळाची पाचवी बैठक भारताच्या अध्यक्षतेखाली झाली.

पॅरिस ऑलिम्पिक; मनू भाकेरने कांस्यपदक पटकावले

पॅरिस : भारताने पॅरिस ऑलिम्पिकमधील आपले पदकांचे खाते अखेर उघडले. मनू भाकेरने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये १० मीटर एअर पिस्तुल प्रकारात कांस्यपदक पटकावले. मनूने यावेळी १२ वर्षांचा दुष्काळ संपवत भारताला पदक जिंकवून दिले. मनुची फायनलमध्ये सुरुवात चांगली झाली होती. पहिल्या फेरीत तिने ५०.४ गुण कमावले होते. त्यानंतर तीन फेऱ्यांनंतर मनुच्या खात्यामध्ये १००.३ गुण होते. त्यानंतर मनु १२१.२ गुणांसह दुसऱ्या स्थानावर विराजमान झाली होती. त्यानंतर मनुचे १४०.८ गुण झाले होते आणि ती तिसऱ्या स्थानावर होती.

सरसेनानी अशोकजी सिंघल भगवे वस्त्र न घातलेले संत होते -अनिल भालेराव

छत्रपती संभाजीनगर येथे सरसेनानी अशोक सिंघल विशेषांक प्रकाशन सोहळा संपन्न

छत्रपती संभाजीनगर : नेतृत्वाचे चार प्रकार समजले जातात राजकीय नेतृत्व, सामाजिक नेतृत्व,धार्मिक नेतृत्व,आणि सांस्कृतिक नेतृत्व.मा.अशोकजी यांनी आपल्या वैयक्तिक गुणांच्या आधारावर आणि संघनिष्ठेच्या बळावर आपले सांस्कृतिक नेतृत्व हे जगामध्ये फिरून स्थिर केले होते.

हिंदू,हिंदुत्व,हिंदुराष्ट्र आणि राम जन्मभूमी ही अशोकजींची अविचलनिष्ठा होती विरोधकांवर ते कठोर प्रहार करत पण विरोधकांविषयी त्यांच्या मनात क्रोध आणि विद्वेषाचा विकार आढळला नाही. आपल्या विचारांशी असहमत असणाऱ्या लोकांना जेव्हा अशोकजी भेटत तेव्हा त्यांच्या मनावरही आपल्या आत्मीय मधुर व्यवहाराची छाप टाकत असत. त्यामुळे विरोधकही त्यांच्याकडे आदराने पाहत

असत.अशोकजी भगवे धारण न केलेले संत होते त्यांच्या व्यवहारात पारदर्शीपणा होता पण व्यवहार कुशलताही होती. त्यांच्या वागण्या बोलण्यातील नितळपणा पाहूनच लोकांना ते आपलेसे वाटत आणि अशोकजी लोकांना आपलेसे करून घेत असे उद्गार राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक मा. अनिल भालेराव यांनी काढले ते त्रिदेवता मंदिर ट्रस्टच्या सभागृहात दिनांक २८ जुलै ला सरसेनानी अशोकजी सिंघल विशेषांक प्रकाशन प्रसंगी बोलत होते यावेळी व्यासपीठावर वेदमूर्ती अनंत पांडव गुरुजी श्री.राजीव जहागिरदार श्री.विनोद शेवतेकर श्री.गौतमजी बारस्कर श्री.योगेश पाठक उपस्थित होते.

या प्रकाशन समारंभ प्रसंगी बोलताना राजीव जहागिरदार यांनी आपले विचार व्यक्त केले ते म्हणाले तब्बल वीस वर्ष विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय अध्यक्ष राहिलेले अशोकजी सिंघल यांच्या उल्लेखाशिवाय राम मंदिर आंदोलनाचा इतिहास अपूर्ण असेल त्यांचे स्मरण केल्याशिवाय मंदिर आंदोलनाचा इतिहास पुढे सरकू शकत नाही आज अशोकजी हयात नाहीत पण मंदिर आंदोलनाचा जो पाया त्यांनी रचला होता संपूर्ण देशातील जनमानस ढवळून काढले होते.

सीपी राधाकृष्णन महाराष्ट्राचे नवे राज्यपाल, हरीभाऊ बागडे राजस्थानच्या राज्यपालपदी

बनवारीलाल पुरोहित यांचा राजीनामा स्वीकारला

नवी दिल्ली, २८ जुलै (हिं.स.) : महाराष्ट्राचे विद्यमान राज्यपाल रमेश बैस यांच्या जागी झारखंडचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे २४ वे राज्यपाल आहेत. तसेच भाजपचे ज्येष्ठ नेते हरीभाऊ बागडेंची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी अनेक राज्यांमध्ये नवीन राज्यपालांच्या नियुक्त्या केल्या आहेत.

शनिवारी रात्री उशिरा राष्ट्रपती भवनाकडून या संदर्भातील पत्रक जारी करण्यात आलं. या परिपत्रकामध्ये एकूण १० राज्यांमधील राज्यपालांच्या बदल्या आणि फेरनियुक्त्या करण्यात आल्या आहेत. सदर नियुक्त्या या पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून लागू होतील, असंही सांगण्यात आलं आहे.

कोण आहेत महाराष्ट्राचे नवीन राज्यपाल?

सी.पी राधाकृष्णन (६७) हे मूळ तामिळनाडूचे आहेत. त्यांचा जन्म ४ मे १९५७ रोजी तिरुपूरमध्ये झाला. वयाच्या १६ व्या वर्षापासून त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम सुरू केले. कोइंबतूर मतदारसंघातून लोकसभेवर राधाकृष्णन हे दोन वेळा निवडून गेले. भाजपचे तामिळनाडू प्रदेशाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. २००४ ते २००७ या कालावधीत त्यांच्याकडे तामिळनाडूची सूत्रे होती. या कालावधीत

त्यांनी रथयात्रा काढली होती. त्यासोबतच नदीजोड प्रकल्प, अस्पृश्यता आणि दहशतवादाला विरोध यासाठीही त्यांनी आवाज उठवला होता. ते २०१६ ते २०१९ पर्यंत ऑल इंडिया कॉयर बोर्डाचे अध्यक्ष होते. १८ फेब्रुवारी २०२३ रोजी ते झारखंडचे राज्यपाल झाले होते.

सीपी राधाकृष्णन हे दक्षिण भारतातील भाजपच्या प्रमुख नेत्यांपैकी एक आहेत. तामिळनाडू आणि केरळसह इतर दक्षिणेकडील राज्यांमध्ये पक्ष संघटना मजबूत करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. गेल्या कित्येक वर्षांपासून ते संघ, जनसंघ आणि भाजप यांच्याशी संबंधित आहेत.

हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती

महाराष्ट्रातील भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ बागडे यांची राजस्थानच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे. हरिभाऊ बागडे हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील फुलंब्री मतदारसंघातून विधानसभेवर निवडून आले होते. २०१४ ते २०१९ पर्यंत त्यांनी महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांचा पदभार स्वीकारला होता.

कोणकोणत्या राज्याला मिळाले नवीन राज्यपाल?

महाराष्ट्र - सी. पी. राधाकृष्णन, राजस्थान - हरिभाऊ किसनराव बागडे, झारखंड - संतोषकुमार गंगवार, छत्तीसगड - रमण डेका, मेघालय - सी. एच. विजयशंकर, सिक्किम - ओमप्रकाश माथूर, पंजाब, चंडीगड (गुलाबचंद कटारिया), आसाम, मणिपूर (अतिरिक्त कार्यभार) - लक्ष्मण प्रसाद आचार्य, तेलंगणा - जिष्णू देव वर्मा, पुदुच्चेरी (उप राज्यपाल) - के. कैलाशनाथन दरम्यान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बनवारीलाल पुरोहित यांचा पंजाबचे राज्यपाल आणि केंद्रशासित प्रदेश चंदीगडचे प्रशासक म्हणून राजीनामा स्वीकारला आहे.

वार तिथी योग नक्षत्र आणि करण या पाच अंगांनी गृह मंडलाचा आणि ब्रह्मांडांचा वेध घेणे म्हणजेच पंचांग- ज्योतिषाचार्य अनंत पांडव गुरुजी

पंचांग वाचन कार्यशाळा वि.हि.प.च्या मंदिर अर्चक पुरोहित व्यायामाचा स्तुत्य उपक्रम

छत्रपती संभाजीनगर - अनुकूल समयी जे कार्य केले जाते त्यामध्ये यशाची शक्यता अधिक असते त्यामुळे योग्य काळ योग्य वेळ सांगण्याची जे शास्त्र आहे त्याचे नाव पंचांग असे आहे.

प्राचीन भारतीय वैज्ञानिक ऋषिमुनी यांनी संपूर्ण खगोल विज्ञान म्हणजे गृह तारे राशी नक्षत्रे यांना अत्यंत सुलभ पद्धतीने पंचांगाचे रूपाने प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचले होते. पंचांग म्हणजेच वार,तिथी,नक्षत्र,योग आणि करण ही पंचांगाची पाच अंगे आहेत याच पाच अंगाने मिळून गृह मंडलाचा आणि ब्रह्मांडाचा वेध घेणे म्हणजेच पंचांग होय असे प्रतिपादन वेदमूर्ती ज्योतिषाचार्य अनंत पांडव गुरुजी यांनी केले ते विश्व हिंदू परिषदेच्या अंतर्गत चालणाऱ्या मंदिर अर्चक पुरोहित आयाम आणि त्रिदेवता मंदिर ट्रस्ट सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने

रविवार दिनांक २८ जुलै २०२४ रोजी पार पडलेल्या ओळख पंचांगाची या कार्यशाळेत बोलत होते यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक मा.अनिलजी भालेराव,त्रिदेवता मंदिर ट्रस्टचे विश्वस्त गौतमजी बारस्कर, मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागिरदार,संभाजीनगर विभाग सह संपर्कप्रमुख विनोद शेवतेकर उपस्थित होते. यावेळी बोलताना अनंत पांडव गुरुजी पुढे म्हणाले पंचांगामागे विज्ञान आहे आणि तर्क शुद्ध विचार आहे. त्याच्या आधारावर शेकडो वर्ष प्रयोग करून नोंदी ठेवून पंचांग शास्त्र विकसित झाले आहे. त्याचे स्वरूप अत्यंत सुलभ असल्याने अगदी खेड्यापाड्यातील शेतकरी कारागीर व इतर सर्व बांधव पंचांगाचा आधार घेऊन शेतीविषयक अन्य कार्य सण उत्सव याचे आयोजन व नियोजन करीत असतात अजूनही भारतामध्ये ७५ टक्क्या पेक्षा अधिक लोक विविध कारणासाठी पंचांगांचा आवर्जून वापर करतात .

पंचांगाचा यापुढे नियमित अभ्यास केला तर सूर्योदय आणि सूर्यास्त याच्या वेळा तसेच आकाशातील गृह नक्षत्राची स्थिती सांगता येईल शुभ अशुभ काळ याचे निदान करता येईल विविध मुहूर्त सांगता येतील. ज्योतिष शास्त्राची पण तोंडओळख होईल विविध राशी व नक्षत्राची माहिती होईल त्यामुळे आज या कार्यशाळेत दिलेल्या प्राथमिक माहितीवर अवलंबून न राहता यापुढे सातत्याने पंचांगाचा अभ्यास केल्यास अधिक उपयुक्त ठरणार आहे.पंचांग वाचनात कोणास अडचण येत असेल त्यांनी मला कधीही संपर्क करावा मी आपणास योग्य ती माहिती देण्यास तयार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सुरुवात विजय मुळे यांनी गायलेल्या भक्ती गीताने झाली.त्यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांनी दीपप्रज्वलन केले. मंदिर अर्चक पुरोहित संपर्क आयाम प्रमुख श्री.राजीव जहागिरदार यांनी प्रास्ताविकामध्ये मंदिर अर्चक पुरोहित विभागाच्या कामाची आवश्यकता प्रतिपादन केली व यापुढेही असे उपयुक्त उपक्रम करणार असल्याबाबत सांगितले

राजीव जहागीरदार यांच्या प्रास्ताविकानंतर माननीय अनिल जी भालेराव आणि गौतमजी बारस्कर यांनी मनोगत व्यक्त केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभाग संपर्कप्रमुख योगेश पाठक यांनी तर आभार प्रदर्शन विभाग सह संपर्कप्रमुख विनोद शेवतेकर यांनी केले सांघिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री योगेश पाठक श्री विनोद शेवतेकर श्री संजय डाके श्री रवी कुलकर्णी अरुण जाधव सौ अनुराधा पुराणिक महेश बसेर भास्कर कुलकर्णी चंद्रकांत डोणगावकर राजीव पाथरीकर गौतम जी बारस्कर विठ्ठलराव सोनवणे तुकाराम घोडजकर यांनी मेहनत घेतली.

आयएएस कोचिंग सेंटरच्या तळघरात १२ फूट पाणी, ३ विद्यार्थ्यांचा मृत्यू, दिल्लीत मोठी दुर्घटना

नवी दिल्ली: दिल्लीतील एका प्रसिद्ध कोचिंग सेंटरच्या तळघरात पाणी साचल्याने तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. ओल्ड राजेंद्र नगर येथील राव आयएएस कोचिंग सेंटरमध्ये ही दुर्दैवी घटना घडली आहे. याप्रकरणी दोघांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात येत आहे. दरम्यान, दिल्ली सरकारने या घटनेच्या दंडाधिकारी चौकशीचे आदेश दिले आहेत.

नेमकं काय घडलं?

दिल्ली अग्निशमन विभागाला शनिवारी संध्याकाळी ७ वाजता कोचिंग सेंटरच्या तळघरात पाणी भरल्याची माहिती मिळाली होती. कोचिंग सेंटरच्या तळघरात पाणी साचले असून अनेक विद्यार्थी अडकल्याची माहिती विभागाला देण्यात आली. प्रकरणाचे गांभीर्य पाहून एनडीआरएफच्या पथकाने बचावकार्य सुरू केले. परिस्थिती इतकी भीषण होती की डायव्हर्सला पाण्यात उतरवावे लागले.

कोचिंग सेंटरच्या तळघरात एक लायब्ररी आहे. त्यामुळे येथे काही विद्यार्थी अभ्यास करत होते. अग्निशमन विभागाचे संचालक अतुल गर्ग यांनी दिलेल्या माहितीनुसार, घटनेवेळी येथे ३० ते ३५ विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी तीन जण अडकले होते. बचाव मोहिमेनंतर तीन विद्यार्थ्यांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये दोन मुली आणि एका मुलाचा समावेश आहे.

या घटनेत जीव गमावलेला नेविन डाल्विन हा विद्यार्थी केरळचा रहिवासी होता. मात्र, गेल्या सहा ते आठ महिन्यांपासून तो दिल्लीत राहत होता. नेविन हा पटेल नगर येथे राहत होता आणि कोचिंग सेंटरच्या लायब्ररीत अभ्यासासाठी गेला होता. तो जेएनयूमधून पीएचडी करत होता.

प्राथमिक तपासात तळघरात लायब्ररी असल्याचे समोर आले असून तेथे अनेक विद्यार्थी होते. अचानक तळघरात पाणी भरू लागले. अडकलेल्या विद्यार्थ्यांची दोरीच्या मदतीने सुटका करण्यात आली.

वडगाव साजापुर रस्त्यावर गटारगंगा

वाळूज महानगर : येथील दाट लोकवस्ती असलेल्या भविष्यदीप नगर भागात वडगाव साजापूर मुख्य रस्त्यावर गेल्या दोन दिवसांपासून दोन ठिकाणच्या ड्रेनेज लाईन उघडी करून ठेवल्याने गटारीचे मैलामिश्रित पाणी रस्त्यावर वाहत आहे. परिसरात मैला वाहत असल्यामुळे परिसरात दुर्गंधीचे वातावरण पसरले आहे. अश्या परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

भविष्यदीप नगर हे वडगाव साजापूर या मुख्य रस्त्यालाच असल्याने या रस्त्यावरून लहान मुले, वयस्क, वृद्ध लोकाची वर्दळ असते. या ठिकाणी ग्रामपंचायतच्या वतीने दोन चेंबर उघडे करून ठेवले आहे त्यातील मैल मिश्रित दूषित पाणी पाणी मुख्य रस्त्यावरून वाहत आहे त्यामुळे परिसरात दुर्गंधीचे वातावरण असून दिवसभर या रस्त्यावरून नागरिक नाक दाबून ये - जा करीत होते. ग्रामपंचायतच्या या गलथान कारभारामुळे साथीचे आजार उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. काल रात्रीपासून आज सायंकाळपर्यंत याकडे ग्रामपंचायतीचा एकही कर्मचारी आला नसल्याने नागरिकातून नाराजी व्यक्त होत होती.ग्रामपंचायतीने ही गटारगंगा त्वरित बंद करून चेंबरचे काम करावे असे मागणे ग्रामस्थ करीत आहे.

नरेंद्र पाटील यांच्या उपस्थितीत भव्य लाभार्थी मेळावा

तभा वृत्तसेवा

कन्नड - दि.२९ जुलै - मराठा समाजातील तरुण व शेतकरी यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकार कडून सुरू करण्यात आलेल्या आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेचा लाभ शेतकरी व्यावसायिक तरुणांनी घ्यावा. मात्र घेतलेल्या कर्जाची परतफेड प्रामाणिक करून एक स्वाभिमानी लाभार्थी व्हा असे प्रतिपादन आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले.

शहरातील राजुरेश्वर मंगल कार्यालयात आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या. मुंबई व सदगुरु साई मोटर्स, साई एजन्सीज संचालक बाळासाहेब खंडागळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाने लाभार्थी मेळावा संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भाजप जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, देवनाथ पा. खंडागळे, युवा उद्योजक मनोज पवार, बाळासाहेब खंडागळे, कृउबा माजी सभापती प्रकाश घुले, हिमांशु गुप्ता, प्रविण आगवण पाटील, चेतन काळे गिरीश जाधव प्रमोद पाटील, आदींची प्रमुख उपास्थिती होती. यावेळी वीस लाभार्थी शेतकऱ्यांना स्वराज ट्रक्टर चे वाटप व नियमित कर्जाची परतफेड करून योजनेचा लाभ घेतलेल्या वीस लाभार्थी शेतकऱ्यांचा सन्मान गौरव चिन्ह देऊन करण्यात आला.यावेळी आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाच्या माध्यमातून राज्य भरात एक लाख मराठा उद्योजक पूर्ण झाल्याने व्यासपीठावर केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या मेळाव्यासाठी मयूर मगर, राहुल मगर, कृष्णा चौथे, रामेश्वर राठोड, संतोष बोडखे, दिलीप राणा, अभिषेक नवले, शुभम खरे आदींनी परिश्रम घेतले.

लाभार्थ्यांकडून जास्तीची व्याज आकारणी थांबवा

आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेतुन मराठा समाजातील आर्थिक दृष्टा मागास तरूणांना उदयोजक बनविण्यासाठी महामंडळाच्या माध्यमातुन व बँकेकडुन जे कर्ज दिले जाते. त्यावर महामंडळाकडुन १२ टक्के व्याज परतावा देण्यात येतो. परंतु बॅक लाभार्थ्यांकडुन १५ टक्के ने व्याज आकारात आहे. तरी आपण त्या बँकेना निर्देश करून १२ टक्के व्याज आकारण्यात यावे. तसेच बँकेच्या कागदपत्रामध्ये आवश्यकते पुरते कागदपत्रे घेउन जास्तीत जास्त उदयोजक आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मार्फत होतील यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी युवा उद्योजक मनोज पवार यांनी नरेंद्र पाटील यांना निवेदन देऊन केली आहे.

बिडकीन स. भु. मध्ये अवतरली भांड्यांची दुनिया

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २५ जुलै : अध्ययन अध्यापन म्हणजे केवळ शिकणे आणि शिकविणे नाही तर विद्यार्थ्यांना ख-या अर्थाने जगायला शिकविणे होय. केवळ पाठ्यपुस्तकातील उतारे वाचून दाखवणे म्हणजे शिकविणे नाही तर त्याच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रत्यक्ष अध्ययन अनुभव विद्यार्थ्यांना देणे,त्याला त्या भावविश्वात रममाण करुन त्याला शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी म्हणून विविध अनुभव त्याला देणे, जीवन जगण्याची कला त्याला शिकविणे म्हणजे शिक्षण होय. नविन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांना केवळ पुस्तक केंद्रित न ठेवता प्रत्यक्ष त्याला जगण्यासाठी आवश्यक ती कौशल्य त्यांच्यामध्ये निर्माण करणे अपेक्षित आहे. असे उपक्रम गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा ध्यास घेतलेली श्री.सरस्वती भुवन शिक्षण संस्था सतत राबवित असते. त्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी संस्थेने मागील वर्षी वर्षभर शिक्षकांच्या कार्यशाळा आयोजित केल्या होत्या. त्याचे फलित म्हणून आज सर्व शिक्षक आपल्या अध्यापनात नवनवीन प्रयोग, उपक्रम राबवित आहेत.पैठण तालुक्यातील श्री.सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथील मराठी विषयाच्या उपक्रमशील शिक्षिका वैशाली लोंढे यांनी इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना भांड्यांच्या दुनियात ' हा पाठ शिकवताना अगदी पूर्वीच्या काळातील कालबाह्य झालेली भांडी उपलब्ध करून विद्यार्थ्यांना पुन्हा एकदा ख-या अर्थाने भांड्यांच्या दुनियात नेले. यामध्ये मातीची चूल,दगडी जातं,वरवंटा-पाटा ,दगडी खलबत्ता,दगडी कुट्टी,लाकडी उलथने,लाकडी काठवत,लाकडी रवी,पाणी तापवण्याचा तांब्याचा बंब,चिमणी (पितळी कंदील) ताकाचा कावळा,डेग,उखळ मुसळ,आठवा, पितळी तांब्याच्या घागरी,घंगाळ यासारखी विविध प्रकारची भांडी विद्यार्थ्यांनी जमवली होती.

एक अगळा वेगळा अनुभव या निमित्ताने विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळाला. अशा पद्धतीने जर अध्यापन केले तर विद्यार्थी त्यामध्ये आनंदाने समरस होऊन अधिक चांगल्या प्रकारे शिकतात असे मत मराठी विषयाच्या शिक्षिका वैशाली लोंढे यांनी व्यक्त केले. पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा, राजू शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच शिक्षक अशा प्रकारचे उपक्रम आपल्या वर्गात राबवित असतात.

गंगापूर शहरात पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते सीसीटीव्ही कॅमेराचे लोकार्पण

गंगापूर शहरातील गुन्हेगारांवर सीसीटीव्ही कॅमेरातून नजर

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२८: गंगापूर शहरात संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते रविवारी दुपारी लोकार्पण करण्यात आले. यामुळे गंगापूर शहर पूर्णतः गुन्हेगारी मुक्त करण्यात येणार आहे.चोरी लुटमार, अवैध वाहतूक ,वाहनधारकांवर कारवाई करण्यात येणार आहे. याचे नियंत्रण कक्ष हे पोलीस ठाण्यात असून त्याचा थेट संपर्क पोलीस अधीक्षक यांच्याकडे असणार आहे. त्यामुळे गुन्हेगारावर पोलीस प्रशासनाचा वचक राहणार आहे जिल्ह्यात वैजापूर आणि गंगापूर शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसण्यात आले आणखीही पैठण सोयगाव सिल्लोड आदी शहरात पण अद्यावत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येतील असे आश्वासन पालकमंत्री अब्दुल सत्तार यांनी यावेळी उपस्थितांना दिले. माजी पालकमंत्री संदिपान भुमरे यांनी या कामासाठी सव्वाचार कोटी रुपये निधी मंजूर केला होता त्याचे काम पूर्ण झाल्याने पालकमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

यावेळी पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया अप्पर पोलीस अधीक्षक सुनील कृष्णा लांजेवार उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप भागवत उपविभागीय अधिकारी अरुण जराड तहसीलदार सतीश सोनी पोलीस निरीक्षक कुमार सिंह राठोड माजी आमदार राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष कैलास पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

हरिभाऊ बागडे राजस्थानचे राज्यपाल होताच फुलंब्री विधानसभेसाठी नवीन पुढाऱ्यांनाऱ्यांना मोकळे मैदान

पारंपारिक प्रतिस्पर्धी काळे-बागडे यांच्या नंतर कोण?

फुलंब्री, २८ जुलै, त.भा फुलंब्री विधानसभा क्षेत्रातून हरिभाऊ बागडे राजस्थानचे राज्यपाल झाल्याने व त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ. कल्याण काळे जालना लोकसभेतून खासदार झाल्याने गेल्या वीस वर्षांपासून एकमेकांचे प्रतिस्पर्धी असलेले दोन्ही दिग्गज यंदा फुलंब्री विधानसभेत नसल्याने नवीन पुढऱ्यांसाठी मोकळे रान झाले आहे. अनेक पुढारी यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून उभे आहे. यात कोण बाजी मारेल हे तर येणार काळचं सांगेल. त्यात ज्येष्ठ नेते हरिभाऊ बागडे यांना राजस्थानची जबाबदारी देण्यात आली. त्यामुळे त्यांच्या फुलंब्री मतदारसंघात आता इच्छुकांमध्ये तिकीटासाठी रस्सीखेच होणार आहे.

गेल्या दोन दशकापासून फुलंब्री मतदारसंघात भाजपकडून बागडे नाना आणि काँग्रेसकडून डॉ. कल्याण काळे असा दमदार सामना रंगला आहे.२००४ व २००९ च्या विधानसभा निवडणुकीत कल्याण काळे यांनी बागडे यांचा पराभव केला तर २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत हरिभाऊ बागडे यांनी परत बाजी मारून डॉ. कल्याण काळे यांचा पराभव केला होता.नुकत्याच झालेल्या जालना लोकसभा निवडणुकीत डॉ. कल्याण काळे यांनी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांचा पराभव केला. काळे खासदार झाले. त्यांचा फुलंब्री विधानसभेवरचा दावा आपोआप संपला. तर आता बागडे नाना यांना पण राजस्थानच्या राज्यपाल पदाची जबाबदारी दिल्याने या दोघांची या मतदारसंघातील प्रतिस्पर्धा संपुष्टात आली.

फुलंब्री विधानसभा मतदार संघात आता सर्व पक्षातील नवीन पुढाऱ्यांसाठी मार्ग मोकळा झाल्याने, काँग्रेस, भाजप आणि इतर पक्षातील अनेक इच्छुकांचा आत्मविश्वास दुणावला आहे.

अकुम्सची ऑफर ३० जुलै पासून सुरू

छत्रपती संभाजीनगर- अकुम्स ड्रग्ज अँड फार्मास्युटिकल्स लिमिटेडच्या इक्विटी शेअर्सच्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरची बोली-ऑफर मंगळवार, ३० जुलै २०२४ रोजी उघडेल. या ऑफरमध्ये कंपनीच्या एकूण ६,८०० दशलक्षपर्यंतच्या (प्रत्येकी २ चे दर्शनी मूल्य) इक्विटी शेअर्सचा ताज्या इश्यूचा समावेश आहे. १७,३३०,४३५ इक्विटी शेअर्सच्या विक्रीसाठी कंपनीच्या काही विद्यमान भागधारकांद्वारे (विक्री भागधारक) ऑफर केले जातील. ऑफर केलेल्या शेअर्समध्ये संजीव जैन यांचे १,५१२,००० इक्विटी शेअर्स, संदीप जैन यांचे १,५१२,००० इक्विटी शेअर्स, (एकत्रितपणे, प्रवर्तक विक्री भागधारक) आणि रुबी क्यूसी इन्व्हेस्टमेंट होल्डिंग्ज पीटीई लिमिटेडद्वारे १४,३०६,४३५ इक्विटी शेअर्सपर्यंत विक्री भागधारकांद्वारे इक्विटी समभागांच्या विक्रीसाठी अशी ऑफर, यांचा समावेश आहे. रुबी क्यूसीला क्वाड्रिया कॅपिटल या आशियातील प्रख्यात आरोग्यसेवा केंद्रीत खासगी इक्विटी फंडाचा पाठिंबा आहे.

मेहगाव येथे कायदेविषयक सल्ला शिबिराचे आयोजन

व्ही .डी .पाटील न्यायाधीश दिवाणी न्यायालय कन्नड यांच्या हस्ते वृक्षारोपण

तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि.२८. जुलै- कन्नड तालुक्यातील मेहगाव येथे ग्रुप ग्रामपंचायत च्या वतीने कायदेशीर सल्ला शिबिराचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व्ही .डी. पाटील (न्यायाधीश दिवाणी न्यायालय कन्नड) व प्रमुख अतिथी चंद्रहार ढोकणे गट विकास अधिकारी तथा तालुका विधि सेवा समिती सचिव यांनी ग्रामस्थ ,विद्यार्थी, यांना कायदेविषयक मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी न्यायाधीश व चंद्रहार ढोकणे यांनी विधी सेवा समितीचे कार्य कामकाज याविषयी सखोल माहिती दिली. आलेल्या अतिथींचे ग्रामपंचायत च्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच जागतिक निसर्ग संवर्धन दिनानिमित्त २४ तास ऑक्सिजन देणाऱ्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पोलीस दलात नवीन भरती झालेल्या सौरभ सोनवणे ,योगेश घुगे या शेतकरी मुलांचे न्यायाधीशांच्या हस्ते सत्कार केला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जि .प. शिक्षक शहा सर यांनी केले व आभार प्रदर्शन सरपंच रेखाबाई बोंगाणे यांनी मानले . याप्रसंगी एन .एम. शेख, जे. सी. मगर, दारकुंडे सर, विकास चोंदे, पांडुरंग घुगे गावातील आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.

लोक शाहिर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त प्रा सुरेश चौथाईवाले यांचे व्याख्यान

छत्रपती संभाजीनगर : डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठाच्या वतीने, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती निमित्त , येत्या गुरुवारी (१ ऑगस्ट) व्याख्यानाचे ,आयोजन करण्यात आले आहे .शाहिर अण्णा भाऊ साठे अध्यासन केंद्राच्या वतीने सकाळी ११. ३० वाजता हा कार्यक्रम , विद्यापीठाच्या कला सादरीकरण विभाग(नाट्यशास्त्र) या ठिकाणी , संपन्न होईल.या वेळी प्रसिद्ध साहित्यिक, प्रा. सुरेश चौथाईवाले यांचेअण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील सामाजिक जाणिवा या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केल्या गेले आहे .या कार्यक्रमाला विद्यापीठाचे कुलसचिव, डॉ .प्रशांत अमृतकर हे उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन ,अध्यासनाचे संचालक डॉ. वैशाली बोदेले यांनी केले आहे.

मराठी साहित्यिक फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांना होली स्पिरीट इंग्लिश इंग्रजी हायस्कूल तर्फे श्रद्धांजली

बिडकीन दि २७ जुलै थोर लेखक व विचारवंत यांना बिडकीन येथील होली स्पिरिट इंग्रजी शाळेतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर शेजवळ यांनी श्रद्धांजली अर्पण करत असताना आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की फादर जेव्हा जेव्हा पैठणला व्याख्यानासाठी जात असता ते आवर्जून होली स्पिरिट इंग्रजी शाळेला भेट देत असत व मोठ्या आपुलकीने विद्यार्थ्यांशी संवाद साधत विद्यार्थ्यांना बोलते करत मराठी भाषा व मराठी संताविषयी विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते , शाळेतर्फे मुख्याध्यापक सुधाकर शेजवळ हे त्यांचे स्वागत करीत होते, थोर लेखात व मराठी साहित्यिक फादर फ्रान्सीस दिब्रिटो नुकताच निधन झाले आहे

वावन्यात आमदार हरिभाऊ बागडेनीं केले विविध विकास कामाचे भूमिपूजन

त.भा. वृत्तसेवा

बाबरा,२६ जुलै,

फुलंब्री तालुक्यातील वावना-पाडळी येथे आमदार हरिभाऊ बागडे यांनी विशेष बजट अंतर्गत शुक्रवारी (दि.२६) रोजी सकाळी साडे नऊ वाजता तीन कोटी दहा लाख रुपयांचा निधी देऊन विविध विकास कामांचे भूमिपूजन केले. यावेळी गावातील तीन सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचे सत्कारही करण्यात आले.

गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या निधोना मार्गे वावना फाटा व महादेव फाटा ते पिशोर रोड पर्यंत अशा या दोन रस्त्याचे व कमळा देवी सभागृहाच्या विकास कामांचे भूमिपूजन आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते करण्यात आले. बागडे यांच्या विशेष बजेट ३ कोटी १० लक्ष रुपये निधी अंतर्गत भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. तसेच यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी अभियंता बांधकाम विभाग धोंडिबा बनसोडे,शिक्षक पाटील,बजाज ऍटोचे एम एस ओ.दत्तात्रय जाधव यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी कृऊबा समिती सभापती अनुराधा चव्हाण, माजी जिप सदस्य तथा कृऊबा समिती संचालक जितेंद्र जैस्वाल, माजी पं स. सभापती संजय त्रिभुवन,भाजपा तालुका अध्यक्ष सांडू अण्णा जाधव,सा.बा. उपविभागीय अभियंता राजकुमार हेलाले, सरपंच कैलास काकडे, चेअरमन योगेश,उपसरपंच दामोधर जाधव, माजी सरपंच भिक्कनराव जाधव, सामाजिक कार्यकर्ते किसनराव जाधव,ग्रामपंचायत सदस्य सविता,कडुबा आबा, लहानू जाधव कारभारी साबळे,जाधव, ग्रा सदस्य संगीता आव्हाड, ग्रा सदस्य मंगल सोनवणे, पल्हाळ , गायकवाड,आर डी जाधव, ग्रामपंचायत ग्रामविकास अधिकारी देवकर कर्मचारी डिगंबर, रामदास,आभार भिक्कनराव जाधव यांनी मानले.यावेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयडीएफसीफर्स्ट बँकेचा तिमाही १वित्त वर्ष २५ साठी करानंतरचा नफा ३०.२ टक्के वाढीसह ६८१ कोटी रुपये

मुंबई - आयडीएफसी फर्स्ट बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ व्ही वैद्यनाथन म्हणाले,आज बँकिंगमध्ये सर्वात मोठी गरज आहे ठेवी जमा करण्याची क्षमता! या आघाडीवर, आम्ही उच्च दर्जाच्या सेवा स्तर, उच्च श्रेणीचे मोबाइल प्स आणि उत्कृष्ट कॉर्पोरेट गव्हर्नन्सच्या आधारे ठेवींमध्ये मजबूत वाढ साधत आहोत. आमचे कासा प्रमाण ४६.६ टक्के वर कायम आहे. आमच्या ग्राहकांच्या ठेवी दरवर्षी ३८टक्के वाढल्या आहेत. आमच्या ग्राहकांनी आमच्याबद्दल सदिच्छा दाखवल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.एकूण एनपीए १.९०टक्के आणि निव्वळएनपीए ०.५९टक्के वर स्थिर राहिला. उद्योगाच्या अनुषंगाने तिमाहीतील तरतुदी सामान्य केल्या. तामिळनाडूमधील अतिवृष्टी आणि हंगामामुळे, आम्ही चऋख व्यवसायासाठी अतिरिक्त तरतूदी केल्या आहेत. आधी सांगितल्याप्रमाणे, एच२वित्तीय वर्ष२५ मध्ये क्रेडिट खर्च सामान्य होण्याची आम्हाला अपेक्षा आहे.

साईबन हौसिंग परिसरात धूर फवारणी करा

वाळूज महानगर - वडगाव-साजापूर रोडवरील साईबन हौसिंग परिसरात तळ्यातील पाणीसाठ्यामुळे या परिसरात किटक, मच्छर, डास यांचे प्रमाण वाढले असल्याने साईबन हौसिंग सोसायटीमधील लहान मुले, महिला तापाने फणफणत आहेत, त्यामुळे सोसायटी परिसरात किटक, मच्छर, डास यांच्यावर आळा घालण्यासाठी ग्रामपंचायतीच्यावतीने धूर फवारणी करावी अशी मागणी संस्थापक अध्यक्ष संजय निकम, ॲड. नामदेव सावते, यशपाल कदम, गणेश लिहिणार, उमेश लाटकर, रतन कवाळे, सोमीनाथ गवळी, बाबासाहेब नवले आदींसह महिला रहिवाशांनी केली आहे.

पुंडलिक देसले यांचे निधन

सोयगाव,दि.२८ जुलै : सोयगाव येथील प्रगतीशील शेतकरी पुंडलिक भगवान पाटील देसले (वय.९२) यांचे रविवार रोजी सकाळी ८:३० वा.निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर रविवारी रोजी दुपारी २:३० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,सुंना,नातवंडे,असा परिवार आहे.ते युवराज देसले,दत्तू देसले यांचे वडील होत.

अविनाश देशपांडे यांचे अल्पशा आजाराने निधन

छत्रपती संभाजीनगर, दि.२८ : कडा कार्यालयातील सेवानिवृत्त कार्यालयीन अधिक्षक तथा नूतन यशवंत सोसायटी एन - ८ येथील रहिवाशी अविनाश द. देशपांडे यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. कै. देशपांडे हे श्री.एकरूप गणेश ट्रस्टचे सचिव व हेडगेवार रुग्णालयातील सेवाव्रती होते. एमजीएम रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात देहदान करण्याचा निर्णय त्यांनी मृत्यूपूर्वी घेतला होता. मरणोत्तर देहदानाबद्दल जागृती होणे आवश्यक असून आपल्या मृत्यूनंतर आपल्या देहाचा फायदा वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व्हावा, हा विचार कै. देशपांडे यांनी जोपासत देहदान केले.

सोयगाव - भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था संस्थेची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

पतसंस्थेसाठी सभासदांचे मोलाचे सहकार्य - चेअरमन प्रभाकर काळे

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि. २८ जुलै

सोयगाव येथील भैरवनाथ ग्रामीण बिगर शेती सह.पतसंस्था मर्यादित सोयगाव यांची २६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२८ रविवार रोजी सोयगाव येथील नॅशनल मराठी शाळा येथे सकाळी १०:०० वाजता सभा सुरू करून प्रथम संस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे,डॉ.रघुनाथ फुसे, एकनाथ महाराज,भागवत थोटे यांच्या हस्ते भैरवनाथ महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सभेला सुरुवात करण्यात आली.यावेळी संस्थेचे सर्व सभासद,प्रमुख अतिथी उपस्थित होते.यावेळी संस्थेचे व्हा.चेअरमन सतीश कोलते यांनी सभे पुढील येणारे विषय सभासदांना वाचून दाखवली.

क्रमांक एक मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत चा वृत्तांत वाचून कायम करणे,विषय नंबर दोन सन २०२३-२४ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले आर्थिक पत्रके वाचून मंजूर करणे,विषय नंबर तीन सन २०२३-२४ मध्ये अंदाज पत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे,विषय नंबर चार सन २०२३-२४ करिताचे संचालक मंडळांनी शिफारस केलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे,विषय नंबर पाच सन २०२४-२५ करिता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे,विषय नंबर सहा सन २०२३-२४ ऑडिट दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे,विषय नंबर सात २०२४-२५ करिता लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे बाबत, विषय क्रमांक आठ चेअरमन यांना मानधन ठरविण्याबाबत,विषय क्रमांक नऊ मे अध्यक्ष यांच्या पूर्वपरवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे बाबत याबाबतचे सर्व वाचून सभासदांना माहिती दिली,

संस्थेचे चेअरमन प्रभाकर(आबा) दयाळराव काळे यांनी संस्थेला २६ वर्षे पूर्ण झाले त्याबद्दल सर्व सभासदांचे फुलगुच्छ देऊन सत्कार केला तसेच आलेले प्रमुख पाहुणे यांचे सत्कार करण्यात आला. सभासदांनी असेच सहकार्य पतसंस्थेला कायम ठेवावे ही अपेक्षा व्यक्त पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांनी बोलताना केले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले डॉ.रघुनाथ फुसे, समाजसेवक अरुण सोहनी,राजू दुत्तोंडे,अनिल मानकर,भगवान वाघ,यांनी आपल्या भाषणेतून पतसंस्थेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व काही सूचना ही पतसंस्थेला यावेळी दिल्या. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी मंत्री अब्दुल सत्तार झाल्याबद्दल पतसंस्थेच्या वार्षिक सभेत त्यांचा अभिनंदनचा ठराव घेण्यात आला.सुचक दिलीप देसाई तर अनुमोदक कदीर शहा यांनी केले.व पतसंस्थेच्या मालकीच्या बिल्डिंगवर सभागृह बांधण्याची मागणी केली व शेतकऱ्यांच्या मालासाठी रो हाऊस बांधण्याचे मागणी केली.

यावेळी हाजी शेख बबलू,दिलीप देसाई,अनिल मानकर,नगरसेवक लतीफ शहा,स्वामी समर्थ पतसंस्थेचे मॅनेजर बाळू बोरसे,तिरुपती अर्बनचे मॅनेजर विकास देसाई,कै.बाबुरावजी काळे पतसंस्थेचे संचालक योगेश बोखारे,कृष्णा आप्पा कुर्ले कर,राजू एलीस,मुकुंदा तळेले, कदीर शहा,भगवान वारंगणे,पत्रकार राजू दुतोंडे,अरुण सोहणी,तुकाराम तायडे,रामा एलीस,वसंत साबळे,भगवान वाघ,मुरलीधर सोहनी,अनिल कळवत्रे,दत्तू पोटदुखे,आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.यावेळी पतसंस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे,व्हा.चेअरमन संतिष कोलते,संचालक नारायण घनघांव,मच्छिंद्र तेली,पांडुरंग बारी,कदीर शहा,मोतीराम पंडित,दामोधर निकम,निर्मलाबाई महाजन,सुवर्णा दुसाने,सुनिता औरंगे,

व्यवस्थापक धनराज औरंगे,लिपिक विजय जावळे,शिपाई योगेश काळे,गोकूळ रोकडे,वसंत पठाडे,संध्या जगताप उपस्थित होते.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश कोलते यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संस्थेचे चेअरमन प्रभाकर आबा काळे यांनी केले.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

तुळजापूरात डेंगुची साथ; औषध फवारणीची मागणी

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२८ जुलै -

तिर्थक्षेत्र तुळजापूरात डेंगु साथ रोखण्यासाठी नगर परिषद स्वच्छता व साथरोग पसरु नये म्हणून औषध फवारणी करीत असताना दुसरीकडे नव्या बसस्थानक प्रवेशध्दारावर घाणीचे साम्राज्य पसरल्याने गावात स्वच्छता तर बसस्थानक अस्वच्छतेचा विळख्यात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

या अस्वच्छतेमुळे पुनश्चसाथरोग शहरात पसरण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तुळजापूरात मागील पंधरा दिवसापुर्वी डेंगुचे रुग्ण आढळताच नगर परिषद प्रशासन अँक्शन मोडवर येवु न डास निर्मुलनसाठी प्रथमता औषध केली नंतर औषध पावडर टाकुन आता धुराडा फवारणी केली जात असतानाच लातूर रोडवर असणाऱ्या नवीन बसस्थानक समोरच काही महाभागांनी कचरा आणुन टाकला असुन पाऊस पडल्याने हा कचरा कुजल्याने येथे घाणीचे साम्राज्य पसरले.

बसस्टँन्ड परिसरात अस्वछता अशी परिस्थिती निर्माण झाल्याने कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

संक्षिप्त वृत्त...

महालक्ष्मीची यात्रा उत्साहात साजरी

धाराशिव, दि.२८ जुलै -

तालुक्यातील महाळंगी येथील जागृत देवस्थान श्री महालक्ष्मी देवीचा यात्रा विविध धार्मिक कार्यक्रमांनी दि.२८ जुलै रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. देवीच्या दर्शनासाठी भाविक दिवसभर संख्येने हजेरी लावली. देवीच्या दर्शनासाठी संततीप्राप्तीसाठी हजारो भाविक नवस बोलतात. विशेष म्हणजे संततीप्राप्ती झालेले दांपत्य येथे नवसपूर्तीसाठी येतात. दि.२८ जुलै रोजी सकाळी देवींची मूर्ती व पालखीचे पूजन पुजाऱ्यांच्या हस्ते विधीवत करण्यात आले. त्यानंतर मानकरी भारत ढवळे यांच्या निवासस्थानापासून पालखीचे मंदिराकडे प्रस्थान, पालखी मंदिरात दाखल झाल्यानंतर भाविकांची नवसपूर्ती व इतर धार्मिक कार्यक्रम पार पडले. यावेळी सरपंच व्यंकट पाटील, गौतम पाटील, भारत ढवळे, जीवन पाटील, आयोजक प्रशांत साळुंके यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दस्तापूर शाळेत शिक्षण सप्ताहाची सांगता

जळकोट, दि.२८ जुलै -

येथून जवळच असलेल्या जि.प.प्रा. शाळा, दस्तापूर येथे शिक्षण सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या शिक्षण सप्ताहाची सांगता करण्यात आली. मुलांना अभ्यासासोबत सामाजिक, सांस्कृतिक, इतिहासातील घडामोडी, मैदानी खेळात आवड निर्माण व्हावी. यासाठी शिक्षण सप्ताहात विविध उपक्रम राबविण्यात आले. या शिक्षण सप्ताहाची सांगता सनेहभोजनाने झाली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सिद्धया स्वामी, सुरज डावरे, रतन स्वामी, नागेश कलशेट्टी, मंगेश मदने, गजेंद्र डावरे, राम गडदे, शरद चव्हाण, गणेश गडदे, सोमनाथ कलशेट्टी व ग्रामस्थ, विद्यार्थी उपस्थित होते.

उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

मुरूम, दि.२८ जुलै -

उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त आणि भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुरूम येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे उपयोगी शालेय साहित्य वाटप आणि वृक्षारोपण करण्यात आले, उबाठा गटाचे रमेश धनशेट्टी यांच्या संकल्पनेने शनिवारी हा उपक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाला युवासेना तालुकाप्रमुख अजित चौधरी, शहरप्रमुख जगदीश निंबरगे, मुख्याध्यापक मंमाळे, विजयकुमार देशमाने, खंडू धुम्मा, व्हटकर, राजकुमार धनशेट्टी, विशाल मोहिते, अनंत पाटील, वैजनाथ मिटकरी, चांद गंवडी, सुमित पांढरे, शाळेतील विद्यार्थी व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षातील सदस्य उपस्थित होते.

तुळजापूर विधानसभा उमेदवारीसाठी ॲड. व्यंकट गुंड यांच्याकडून प्रदेशाध्यक्षांसह जिल्हाध्यक्षांकडे मागणी

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ जुलै -

धाराशिव जिल्ह्यातील मोठा उद्योग समूह असलेल्या रुपामाता समूहाचे संस्थापक आणि भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य ॲड. व्यंकट गुंड हे तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. त्याकरिता त्यांनी मतदारसंघात गावभेट दौऱ्याच्या माध्यमातून थेट जनतेशी संवाद साधत आहेत.

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व धाराशिव जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य-पाटील यांना मुंबईत भेटून उमेदवारीची संधी मिळावी, अशी रितसर मागणी त्यांनी केली आहे.

धाराशिव जिल्ह्यातील पाडोळी (आ.) या छोट्याशा गावातून सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्याला ॲड. व्यंकटराव गुंड यांनी सुरुवात केली. गुंड कुटुंब म्हणजे जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, संघ परिवार आणि भाजप हे समीकरण मागील जवळपास ४० वर्षांपासून कायमचे राहिलेले आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वातावरणात यांची जडणघडण झालेली आहे.

आजपर्यंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल या संघटनांमध्ये विविध पदावर काम काम केलेले असून सध्या ते भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य म्हणून पक्षात सक्रिय आहेत.

राजकीय क्षेत्रात कार्यरत असताना सर्वसामान्य शेतकरी शेतमजूर, दुध उत्पादक, ऊस उत्पादकांबरोबर लहान मोठ्या व्यावसायिकांच्या जीवनात गुंड यांनी आर्थिक क्रांती घडवून आणली आहे.

रुपामाता समूहातील मल्टीस्टेट, अर्बन बँक, दुध डेअरी, वेअर हाऊस, साखर कारखाना अशा वेगवेगळ्या उद्योगांच्या माध्यमातून हजारो युवकांना रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

विशेष म्हणजे २०१९ साली उमेदवारी मिळाली नाही तरी देखील तुळजापूर विधानसभा मतदार संघातील जनसंपर्क त्यांनी कायम ठेवलेला आहे. या मतदार संघातील नागरिकंनीही ॲड. गुंड यांनी निवडणूक लढवावी, अशी इच्छा व्यक्त केलेली आहे.

त्यामुळे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी मिळावी, अशी मागणी. ॲड. गुंड यांनी भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे आणि धाराशिव जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील यांच्याकडे केली आहे.

तहसील, नगर परिषद कार्यालयांना गळती!

तभा वृत्तसेवा
तुळजापूर, दि.२८ जुलै -

येथील सर्वाधिक वर्दळीचे तहसिल व नगरपरिषद कार्यालयातील वरचे मजले चारशे मिलीमीटर झालेल्या पावसात गळु लागले आहेत. त्यामुळे तहसिल कार्यालयांच्या बांधकामांचा दर्जा बाबतीत प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे.

तिर्थक्षेत्र तुळजापूर शहरात काही निजामकालीन शासकीय कार्यालय इमारती आजही वापरत आहेत. मात्र तहसील कार्यालयाची निजामकालीन इमारत पाडून नवीन बांधकाम केले. सध्या पावसाळ्यात वरच्या मजल्यावर असणाऱ्या तहसिलदार कार्यालायाच्या प्रवेशध्दार समोरीत स्लँब छत गळु लागला आहे. नगरपरिषद कार्यालयातील वरच्या मजल्यावर असणाऱ्या खोल्या गळत असुन स्लँब चा खालचा प्लास्टर केलेला थर खाली पडल्याने आतील स्टील सळई स्पष्टपणे दिसत आहे. या पार्श्वभूमीवर या दोन शाषकिय कार्यालयात कामासाठी गेलेल्या नागरिक भितीच्या छायेत काम उरकुन घेत आहे.

एकंदरीत या दोन सर्वाधिक वर्दळीचा कार्यालयांच्या या अवस्थेमुळे नागरिकांमधुन सदरील कार्यालयांचे दुरुस्ती करुन कार्यालयाचे छत मजबुत करण्याची मागणी होत आहे.

ठाकरे यांच्या वाढदिनी २६४ जणांचे रक्तदान

तभा वृत्तसेवा
परंडा, दि.२८ जुलै -

शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त परंडा येथे शिवसेना उद्धव बाळासाहे ठाकरे पक्षाच्या वतीने दि.२७ जुलै शनिवार रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन शिवसेना नेते आमदार ज्ञानेश्वर पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी २६४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रणजित ज्ञानेश्वर पाटील, तालुकाप्रमुख मेघराज पाटील शहरप्रमुख रईस मुजावर, माजी सभापती शंकर इथापे, माजी उपनगरध्यक्ष इस्माईल कुरैशी, बाजार समिती सभापती जयकुमार जैन, डॉ. अब्बास मुजावर, विनोद साळवे, संचालक ॲड. अनिकेत काशीद, संचालक शंकर जाधव, मधुकर गायकवाड, प्रशांत गायकवाड, सचिन शिंदे, युवासेना तालुका प्रमुख शिवाजी देवकर, युवा सेना शहरप्रमुख कुणाल जाधव, संतोष गायकवाड, ज्योतीराम गायकवाड, रेवण ढोरे, सुर्यकांत बोराडे, दत्ता मेहेर आदीन परिश्रम घेतले.

कळंब पत्रकार संघाच्या वतीने दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रेचे आयोजन

तभा वृत्तसेवा
येरमाळा, दि.२८ जुलै -

कळंब तालुका महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने संघाच्या विविध मागण्यासाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय संवाद यात्रेचा आयोजन करण्यात आले आहे.

या संवाद यात्रेच्या पोस्टरचे प्रकाशन येरमाळा पोलीस ठाण्याचे सपोनि महेश क्षिरसागर यांच्या हस्ते (ता.२७) करण्यात आले.

संवाद यात्रा तीन ऑगस्ट रोजी येरमाळा येथुन जाणार असल्याने तीन ऑगस्ट शनिवारी सकाळी ११ वाजता कळंब तालुका महाराट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

संवाद यात्रा पोस्टर प्रकाशनावेळी

संघाचे माजी राज्य प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब जाधवर, कळंब तालुका अध्यक्ष दीपक बारकुल, येरमाळ्यातील पत्रकार सचिन बारकुल, दत्ता बारकुल दत्ता गायके, सुधीर लोमटे, सुखदेव गायके, ॲड.मिलिंद देशमुख, संतोष बारकुल, बालाजी बारकुल, तानाजी बारकुल, कल्लेश भोसले, आदी पत्रकार मोठ्या संख्येने याप्रसंगी उपस्थित होते.

तीन ऑगस्ट रोजी येरमाळा येथे येणाऱ्या संवाद यात्रेच्या स्वागत समारंभासाठी कळंब तालुक्यातील प्रिंट मीडिया, पोर्टल, युट्युब डिजिटल मिडीयाच्या सर्व पत्रकारांनी सोलापूर धुळे महामार्गवरील छत्रपती शिवाजी उड्डाणपुल या ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन संघांचे कळंब तालुकाध्यक्ष दिपक बारकुल यांनी केले आहे.

सूर्यभान विठ्ठल माने यांचे निधन

तभा वृत्तसेवा
उमरगा, दि.२८ जुलै -

तालुक्यातील तुगाव (येणेगुर) गावातील

महात्मा गांधी विद्यालयाचे संचालक तथा माझी शिक्षक सूर्यभान विठ्ठल माने (वय ८५) यांचे दि.२७ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.

या बातमीने गावात सर्वत्र शोककळा पसरली आहे. त्यांचा पार्थिव्वावर गावातील वैकुंठधाम येथे सायंकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा पश्चात पत्नी, दोन मुले, तीन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

महाराष्ट्र विधान परिषदेची निर्मिती ही फक्त पांढरा हत्ती पोचण्यासाठीच : ॲड भोसले

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ जुलै -

दिवसेंदिवस महाराष्ट्र राज्याची आर्थिक परिस्थिती बिकट होत चाललेली असून राज्याला आत्मनिर्भर आणि स्वयंपूर्ण होण्यासाठी तसेच राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत असताना खर्च कमी करण्यासाठी पांढरा हत्ती पोसण्यासाठी निर्माण केलेली महाराष्ट्र विधान परिषद बरखास्त करण्याचा विधानसभेत एक ठराव घेऊन राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्याकडे पाठवून देण्याची मागणी समाजवादी पार्टीचे प्रदेश महासचिव तथा प्रवक्ते ॲड. रेवण भोसले यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

देशाच्या राज्यघटनेप्रमाणे केंद्रात संसद तयार करताना लोकसभा व राज्यसभा तयार करण्यात आली. त्याच धर्तीवर निवडून आलेल्या विधानसभेच्या सदस्यांच्या प्रमाणात विधानपरिषद तयार केली गेली, म्हणजे महाराष्ट्र विधानसभेचे २८८ आमदार असल्याने विधान परिषदेचे ७८ आमदार निवडले जातात परंतु दक्षिणेतल्या काही राज्यांनी आपल्या विधान परिषदा रद्द करून त्यावरील खर्च वाचविला आहे. विधान परिषदेवर कोट्यवधी रुपये खर्च होतात, ते पैसे वाचवून जनतेच्या कोणत्याही कामासाठी

वापरले तरी चालतील. राज्यातल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची पुस्तके मोफत द्या, शिवचरित्राचे मोफत वाटप करा, शेतकऱ्यांना, कामगारांना मदत करा. त्यामुळे अशावेळी विधान परिषद ठेवून तरी काय उपयोग? त्यातच आता पैसेवाल्यांना लोकशाहीचा खेळ करण्यासाठीच विधानपरिषदेवर पाठवले जाते. सर्वच राजकीय नेत्यांना त्यांच्या पक्षातील पडकेवाडे बांधण्यासाठीचा हा एक पर्याय झाला आहे. विधान परिषदेवर कला, क्रीडा, साहित्य, पत्रकारिता, कायदा, संशोधन अशा क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य जाणे अपेक्षित होते. मात्र सर्व पक्षाकडून राज्यपालाकडे जी यादी दिली जाते ती त्यांच्याकडे दावणीला बांधलेल्या लोकांचीच असते. या सदस्यांना गलेलठ्ठ पगार आणि पुन्हा निवृत्तीवेतन का म्हणून दिले जाते? विधानसभेच्या एका साध्या ठरावाने विधान परिषद रद्द करता येईल. ती ताबडतोब रद्द करणे गरजेचे आहे. विधान परिषदेवरील सदस्यासाठी होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च म्हणजे इथल्या सामान्य माणसाच्या डोक्यावर लादलेले ओझेच आहे. विधान परिषदेच्या माध्यमातून होणारा खर्च म्हणजे जनतेच्या खिशाला लावलेली कात्री आहे. अलीकडच्या काही वर्षातचे चित्र बघितले तर विधान परिषदेच्या निवडणुका हा चेष्टेचा भाग झाला आहे.

त्यामुळे महाराष्ट्र विधान परिषद बरखास्त करून जनतेच्या पैशावर पांढरा हत्ती पोसणे बंद करण्याचे आव्हानही ॲड. भोसले यांनी केले आहे.

कळंब आगाराच्या गळक्या गाडीत प्रवाश्यांचा सुखाचा प्रवास!

तभा वृत्तसेवा
खामसवाडी, दि.२८ जुलै -

सुरक्षित प्रवास सुलभ प्रवास, प्रत्येक प्रवाशी प्रवासाची हमी अशी आपल्या लाडक्या लालपरीच ब्रीद. पण सद्यस्थितीत सुरक्षित प्रवासाची हमी आहे का.? प्रत्येक प्रवाशाला सुरक्षित असणारी लालपरी सुरक्षित आहे का असा ज्वलंत प्रश्न समोर आला आहे. कळंब आगारच्या एसटी बसेस पुर्णपणे खिळखिळ्या झालेल्या आहेत. प्रचंड धुर ओकत एसटी बसेस रस्त्यावरून धावताना दिसत आहेत. कधी कुठे गाड्या बंद पडतील याचाही भरवसा नाही..? त्यातच भर पावसात यासर्व एसटी बसेस चक्क गळतात..! मोठ्या पाऊसात एसटीच्यामध्ये छत्र्या उघडव्या लागतात यावरून कळंब आगाराचे स्वरूपाचे दर्शन सर्वांना घडत आहे. आज घडीला कळंब आगराच्या एसटी बसने हजारो प्रवाशी प्रवास करतात. शाळेत, कॉलेज तेवढेच विद्यार्थी यामुळे सर्वांना याचा मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. कळंब आगारात सद्यस्थितीत एकूण ८४ एसटी बसेस आहेत यापैकी सर्वच गाड्या खिळखिळ्या, इंजिन बिघाड, पाऊसात गळक्या अशा अवस्थेत आहेत. लालपरीचे चालक-वाहक नावीलाजने आपले कर्तव्य पार पाडत आहेत.त्यांची अवस्था ही तोंड दाबुन बुक्क्याचा मार अशी आहे. त्यांच्याच वेतणासाठी त्यांना आंदोलन करावे लागले होते यातच डबड्या गाडीची व्यथा कोणाला सांगावी अशी अवस्था त्यांची आहे. जिव मुठीत घेऊन चालक-वाहक लालपरी चालवीत आहेत मात्र प्रवाशांची जोखीम कोण घेणार हे विशेषच..!

शिक्षण सप्ताहानिमित्त आर्य चाणक्य विद्यालयात विविध उपक्रम संपन्न

तभा वृत्तसेवा
धाराशिव, दि.२८ जुलै -

धाराशिव शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या निमित्ताने शिक्षण सप्ताहात विविध उपक्रम घेण्यात आले.यात विद्यार्थ्यांना क्रीडा दिवस, डिजिटल डे, शालेय पोषण दिवस, मूलभूत संख्याज्ञान आणि साक्षरता यासह अध्यापन साहित्य आधारित विविध कौशल्यांचे प्रशिक्षण विविध उपक्रम ांद्वारे देण्यात आले.

या शिक्षण सप्ताहनिमित्त आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना अध्यापन साहित्याचा शैक्षणिक अध्यापनात वापर करून अध्यापन करण्यात आले.

यात भाषा गणित विज्ञान या विषयावर आधारित विविध शैक्षणिक साहित्य वापरून शिकवण्यात आले. मूलभूत संख्याज्ञान आणि साक्षरता या दिवशी विद्यार्थ्यांना गणित आणि सामान्य भाषा याविषयी माहिती देण्यात आली.

क्रीडा दिनाच्या निमित्ताने बुद्धिबळ, कबड्डी, संगीत खुर्ची अशा खेळांमधून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक वाढीसोबत क्रीडाविषयक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच शरीर आणि मन तंदुरुस्त राहण्यासाठी खेळांची आवश्यकता असल्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

डिजिटल डे या दिवशी प्रशालेतील अटल टिंकरिंग लॅबमध्ये विद्यार्थ्यांचा डिजिटल क्लास घेण्यात आला.

या माध्यमातून गणितातील विविध अध्यापन कौशल्य विद्यार्थ्यांना शिकवण्यात आली.

यासोबतच विज्ञान, भाषा, इतिहास यासह सर्व विषयांचे डिजिटल क्लास या निमित्ताने घेण्यात आले. शालेय पोषण दिवसानिमित्त विद्यार्थ्यांना जंक फूड टाळून सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले अन्नपदार्थ खाण्याचा सल्ला आणि मार्गदर्शन करण्यात आले.

या सर्व उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक अध्यापन सोबत विविध कौशल्य विकसित करण्याचेवप्रशिक्षण मिळाले. तसेच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व जडणघडणीत शालेय अभ्यासक्रमासोबतच क्रीडा कौशल्य आणि संगणकीय कौशल्य माहिती तंत्रज्ञानाचा अभ्यासात वापर करण्याची दृष्टी यासह परिसरातील विविध वनस्पतींचा अभ्यास शैक्षणिक साहित्याच्या आधारे अवघड विषय समजून घेण्यासाठीची युक्ती हे ज्ञान मिळाले.

आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक डॉ. मनीष देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा शैक्षणिक सप्ताह विविध उपक्रमांनी शाळेतील माध्यमिक विभागाच्या सर्व शिक्षक, शिक्षिका कर्मचाऱ्यांनी विविध उपक्रम राबवून उत्साहात संपन्न केला.

कटाक्ष

गजानन निमदेव

पाकिस्तानचा क्रूर चेहरा विद्रूप करा

पाकिस्तानला प्रेमाची भाषा कळत नाही आणि कळली तरी वळत नाही. कुत्र्याचे शेपूट कधीच सरळ होऊ शकत नाही, हे जसे वास्तव आहे, तसेच पाकिस्तानचे आहे. पाकिस्तान कधीही सुधरू शकत नाही आणि पाकिस्तानला सुधरवायचे असेल तर त्याचे अस्तित्वच संपुष्टात आणावे लागेल. पाकिस्तानने गेल्या ४५-४७ दिवसांत जम्मू-काश्मिरात सात दहशतवादी हल्ले घडवून आणले आणि त्यात आपले ११ जवान हुतात्मा झाले. भारतीय सुरक्षा दलांनी अतिरेक्यांच्या भ्याड हल्ल्यांना भीक न घालता त्यांना ठार मारले, हे खरे असले तरी वाढते हल्ले चिंताजनक आहे. परवाच, कारगिल विजय दिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी द्रास येथील हुतात्मा स्मारकाला भेट दिली. तिथे बोलताना त्यांनी पाकिस्तानला कठोर संदेश दिला असला तरी आता निर्णायक भूमिका घेण्याची वेळ आली आहे. सर्जिकल स्ट्राईक करून पाकिस्तानला जशी धडकी भरवली होती, त्यापेक्षाही गंभीर कारवाई करावी, अशी जनतेची अपेक्षा चुकीची नाही.

पाकिस्तानी अतिरेक्यांनी हल्ले करण्याच्या योजनेत बदल केलेला दिसून येत आहे. आधी अतिरेकी आत्मघाती हल्ला करायचे. सशस्त्र अतिरेकी भारतात घुसून आठ-दहा लोकांना मारायचे आणि स्वत:लाही स्फोटात उडवून द्यायचे. पण, आता बदललेल्या रणनीतीनुसार ते जम्मू-काश्मिरात घुसतात, जंगलांमध्ये लपून बसतात आणि घात लावून सुरक्षा दलाच्या पथकांवर अचानक हल्ला करतात. नंतर जंगलात पळून जातात. जंगलात दडून बसलेल्या अतिरेक्यांना शोधून ठार मारणे तसे कठीण काम आहे. आपले जवान धाडसाने हे काम करीत असले तरी एकेका जवानाची किंमत मोजावी लागणे आपल्याला परवडणारे नाही. गेला दीड महिना जम्मू प्रांत अशांत आहे. लोक चिंतित झाले आहेत. या दीड महिन्यात ११ जवानांना प्राण गमवावे लागलेत. १० नागरिकांचेही प्राण गेले आहेत. जंगलांमध्ये अतिरेकी अजूनही दडून बसले आहेत. ते केव्हा हल्ला करतील याचा नेम राहिलेला नाही. त्यामुळे लोक चिंताग्रस्त आहेत. दुसरीकडे जंगलात दडलेल्या अतिरेक्यांना शोधताना आपले जवानच हुतात्मा होण्याचा धोका जास्त असल्याने अतिरेकी जिथे लपले आहेत, त्या भागावर ग्रेनेड, मोर्टार फेकले पाहिजेत, गनशिपचा, हेलिकॉप्टरचा वापर केला पाहिजे. देशात संरक्षण तज्ज्ञांचा हाच सल्ला आहे. हा सल्ला ऐकून सुरक्षा दलांनी काम केले तर आपले नुकसान कमी होईल आणि अतिरेकी मारले जातील.

अतिरेकी हल्ले आधीही होतच होते. तेव्हा अतिरेकी आत्मघाती बनून येत होते. एक हल्ला करायचा, त्यात सात-आठ लोकांना मारायचे आणि स्वत:ही मरायचे. पण, आता ते हल्ला करून पळून जात आहेत, पुन्हा दुसरा हल्ला करीत आहेत, संधी मिळाली तर तिसरा हल्ला करीत आहेत. हे असेच चालू राहिले तर त्यांचे मनोबल वाढेल आणि सुरक्षा जवानांचे मनोबल खच्ची होईल. त्यामुळे सरकारने आता सर्जिकल स्ट्राईकपेक्षाही मोठी कारवाई करून जनतेला आश्वस्त करण्याची आवश्यकता आहे. भिकेचे कटोरे घेऊन फिरणाऱ्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्याची आवश्यकता आहे. आता पाकिस्तानकडून जे अतिरेकी भारतात घुसवले जात आहेत, ते पूर्ण प्रशिक्षित आहेत. जंगलात राहून कसा हल्ला करायचा, पहाडांवर कसे लढायचे आणि युद्धप्रसंग आला तर काय करायचे, याचे प्रशिक्षण त्यांना पाकिस्तानी लष्कराकडून मिळाले आहे, हे स्पष्ट दिसते आहे. ही बाब लक्षात घेता आपल्या जवानांनाही विशेष प्रशिक्षण देणे आणि मार्गदर्शन करणे गरजेचे झाले आहे.

९ जून रोजी सशस्त्र पाकिस्तानी अतिरेक्यांनी पहिला हल्ला केला. रियासी भागातील शिवखोडी येथे हिंदू यात्रेकरूंच्या बसवर अंदाधुंद गोळीबार करून दहा यात्रेकरूंना ठार मारले होते. तेव्हापासून सुरक्षा दलांनी किमान २५ वेळा 'सर्च ऑपरेशन' राबविले. पण, एकही अतिरेकी हाती लागला नाही. त्यामुळे चिंता अधिक वाढली आहे. दुसरा हल्ला ११ आणि १२ जून रोजी डोडा व भदरवाह येथील पोलिस व लष्कराच्या अस्थायी शिबिरावर झाला. त्यात आपले ७ जवान जखमी झाले होते. हल्ला करणाऱ्या अतिरेक्यांचा शोध अजूनही सुरू आहे आणि दुर्दैवाने एकही अतिरेकी हाती लागलेला नाही. ७ जुलै रोजी राजोरी जिल्ह्यातील सुरक्षा चौकीवर तिसरा हल्ला झाला आणि त्यात एक जवान जखमी झाला. पळून गेलेले अतिरेकी अजूनही सापडले नाहीत. दुसऱ्याच दिवशी ८ जुलै रोजी चौथा हल्ला झाला. कठुआ येथे झालेल्या या हल्ल्यात आपले ५ जवान हुतात्मा झाले. हल्ल्यातील अतिरेक्यांचा शोध घेण्यासाठी ३ हजार जवान दिवसरात्र परिश्रम घेत आहेत. पण, अजूनपर्यंत एकही अतिरेकी पकडला गेला नाही. १६ जुलै रोजी डोडाच्या जंगलात सुरक्षा दलाच्या पथकावर पाचवा हल्ला झाला. घात लावून बसलेल्या अतरेक्यांनी केलेल्या या हल्ल्यात आपले ४ जवान हुतात्मा झाले. त्यात सामील एकही अतिरेकी अजून मारला गेला नाही वा पकडलाही गेला नाही. २२ जुलै रोजी पाकिस्तानी अतिरेक्यांनी राजोरीतील गुदा क्वासमध्ये सहावा हल्ला केला. यात एक जवान जखमी झाला. सातवा हल्ला राजोरीतीलच गलुतीमध्ये झाला. त्यातही एक जवान जखमी झाला. पण, अतिरेकी पकडता आलेला नाही. ही सर्वात मोठी चिंतेची बाब आहे.

गेल्या दीड महिन्यातील सर्व हल्ल्यांचा विचार करता पाकिस्तानने भारताविरुद्ध किती मोठे कारस्थान रचले आहे, याची स्पष्ट कल्पना येते. केरन, गुरेज आणि उरी सेक्टरमध्ये झालेले घुसखोरीचे मोठे प्रयत्न पाकिस्तानच्या कटकारस्थानाचा पर्दाफाश करणारेच आहेत. अमेरिका आणि ऑस्ट्रियाकडून घेतलेल्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसह पाकिस्तानकडून अफगाणयुद्ध प्रशिक्षित अतिरेक्यांना भारतात घुसविले जात असल्याचे पुराव्यांनिशी सिद्ध झाले आहे. अतिरेक्यांना जम्मू-काश्मिरात घुसवून हिंसाचार माजवायचा आणि दहशत पसरवून अशांतता निर्माण करायची, हा

पाकिस्तानचा उद्देश स्पष्ट दिसतो आहे. अतिरेक्यांकडे केवळ अमेरिकी आणि ऑस्ट्रियन शस्त्रेच आहेत असे नव्हे, तर जर्मन आणि चिनी शस्त्रास्त्रेही आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे आणि धोका किती मोठा आहे, हे ओळखून कायमचा बंदोबस्त करण्याच्या दृष्टीने ठोस कारवाई केली पाहिजे. ही काळाची गरज आहे.

भारतात अतिरेकी घुसवून अशांतता निर्माण करण्यासाठी पाकिस्तानने बॉर्डर ॲक्शन टीम अर्थात 'बॅट'ची निर्मिती केली आहे. यातून पाकिस्तानचा किळसवाणा चेहरा पुढे आला आहे. बॅटच्या सदस्यांना भारतीय सीमेत घुसवायचे आणि सुरक्षा दलाच्या जवानांवर हल्ले करायचे आणि वरून भारताचे आरोप फेटाळून लावायचे, हा पाकचा उद्योग आता हाणून पाडण्याची वेळ आली आहे. बॅटच्या सदस्यांना कठोर प्रशिक्षण देऊन त्यांना अतिशय क्रूर बनविण्याचे पाप पाकिस्तानी लष्कराकडून केले जात आहे. बॅटवाले हे क्रूर अतिरेकी भारतात घुसून कुणालाही ठार मारण्यास मागेपुढे पाहात नाहीत. ही बाब लक्षात घेता सीमेपलीकडे पाकिस्तानने जे दहशतवादी अड्डे तयार केले आहेत, ते उद्ध्वस्त करण्याची आणि आतपर्यंत घुसून पाकिस्तानला अद्दल घडविण्याची वेळ आली आहे. अपेक्षा आहे, लवकरच अशी कारवाई होईल आणि देशातील जनता आश्वस्त होईल. पाकिस्तानचा अतिशय क्रूर चेहरा यानिमित्ताने पाहायला मिळाला. असे क्रौर्य दाखवून पाकिस्तानने काय साध्य केले, असा सवाल आपण उपस्थित करू शकतो. पण, त्याला काहीही अर्थ नाही. पाकने जे साध्य करायचे आहे, ते केलेच आहे. पाकिस्तानने अतिशय घृणित कृत्य केले आहे. मानवाधिकाराचे उल्लंघनही केले आहे. पण, याविरुद्ध भारतातल्या मानवाधिकार कार्यकर्त्यांनी जराही आावाज उठविल्याचे ऐकिवात नाही. दुसरी बाब म्हणजे भारतात राहणाऱ्या आणि स्वत:ला पुरोगामी ठरवणाऱ्या एकानेही पाकिस्तानचा निषेध करण्याचे साधे देशकार्य पार पाडण्याचेही सौजन्य दाखविलेले नाही. भारतात असे घडले असते तर याच पुरोगाम्यांनी स्वत:च्या सरकारला झोडपून काढण्यात मागेपुढे पाहिले नसते. एखादा अखलाख मारला गेला म्हणून बेंबीच्या देठापासून बोंबलणारे स्वयंघोषित पुरोगामी पाकिस्तानातील धार्मिक कट्टरवादाबाबत मात्र चकार शब्द काढत नाहीत. हे आश्चर्यकारक अजिबात नाही. कारण, भारतातले पुरोगामी हे ढोंगी आहेत. त्यांना विशिष्ट पक्ष, विशिष्ट संघटना, विशिष्ट समुदाय यांचा फार राग आहे. मग या लोकांच्या मानवाधिकारावर प्रहार झालेत तरी हे पुरोगामी चकार शब्द काढत नाहीत. केरळात संघ स्वयंसेवकांवर हल्ले होतात, निष्पाप स्वयंसेवक मारले जातात, तरीही स्वयंघोषित पुरोगामी कधीच निषेध करीत नाहीत, हे वास्तव आहे. कारण, यांच्या दृष्टीने माणसे कधीच महत्त्वाची राहिली नाहीत. त्यांचा अजेंडाच वेगळा आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, भाजपा, हिंदुत्ववादी संघटना यांना झोडपून काढण्यातच ते धन्यता मानतात. मागे कुलभूषण जाधव प्रकरणात खरे तर यांच्याकडून तीव्र प्रतिक्रिया येणे अपेक्षित होते. पण, सगळे कसे मूग गिळून गप्प बसले होते. लोकसभेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीत नरेंद्र मोदी यांचा पराभव झाला असता तर सगळे कसे बेंबीच्या देठापासून बोंबलत सुटले असते. पण, त्यांच्या दुर्दैवाने मोदी आणि भाजपाचा दणदणीत विजय झाला अन् सगळ्यांचीच बोलती बंद झाली. तरीही ते जे बोलायचे ते बोलतच आहेत. भाजपाच्या जागा कमी होणे हा मोदींचा नैतिक पराभव आहे आणि आम्ही त्याला विजय मानतच नाही, अशी कोल्हेकुई सुरू आहे. असो. याचा पाकिस्तानशी तसा थेट काही संबंध नाही. पण, हे स्वयंघोषित पुरोगामी देशाचा प्रश्न येतो तेव्हाही सरकारची साथ देत नाहीत, हे दुर्दैवी आहे. गतकाळात पाकिस्तानने कुलभूषण जाधव यांच्या पत्नीला आणि आईला जी हीन वागणूक दिली होती, त्याचा एका सुरात निषेध होणे अपेक्षित होते. पण, तसे झाले नव्हते. आता पाकिस्तानने आपला खरा चेहरा काय आहे ते जगाला दाखवून दिले आहे. पाकिस्तानात दहशतवाद्यांचे अड्डे आहेत, पाकिस्तानकडून दहशतवाद्यांना प्रशिक्षण दिले जात आहे, शस्त्रास्त्रे पुरवून त्यांना भारतात घुसविले जात आहे. याचे अनेक पुरावे अनेकदा देऊनही आंतरराष्ट्रीय समुदायाकडून पाकिस्तानवर ठोस कारवाई केली जात नाही, हे भारताचे दुर्दैवच म्हटले पाहिजे. अजूनही वेळ गेलेली नाही. भारताने आंतरराष्ट्रीय समुदायाकडे हा मुद्दा प्रभावीपणे मांडावा आणि आपली बाजू सगळ्यांना नीट समजावून सांगत पाकिस्तानवर दबाव वाढवावा. पाकिस्तानला आणखी काही बाबतीत धडा शिकविण्याची गरज आहे. पाकिस्तानकडून वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात आहे. भारताने अनेकदा प्रत्युत्तर देऊनही पाकिस्तान काही सुधरायला तयार नाही. त्यामुळे पाकिस्तानच्या सीमेत घुसून तिथे असलेल्या सैनिकांना आणि अतिरेक्यांना ठार मारावे, अशी संतप्त प्रतिक्रिया भारतभर उमटली आहे. नसती उमटली तरच नवल. प्रत्यक्ष रणमैदानात चार वेळा चारीमुंड्या चीत झालेल्या पाकिस्तानला आता मैदानात लढाई करण्याची भीती वाटते. त्यामुळेच पाकिस्तानने भारताविरुद्ध छुपे युद्ध पुकारले आहे. या छुप्या युद्धातही आता पाकिस्तानला धूळ चारण्याची वेळ आली आहे. वारंवार पाकिस्तानकडून युद्धविरामाचे उल्लंघन केले जात आहे आणि भारताकडून फक्त तोंडी निषेध केला जातो, ही बाब जनतेला पटणारी नाही. आंतरराष्ट्रीय समुदायाचा कितीही दबाव असला तरी तो झुगारून भारताने पाकिस्तानवर थेट आक्रमण करावे आणि एकदाचे सगळे प्रश्न निकाली काढावेत, अशी जनभावना आता आकार घेऊ लागली आहे. देशातील जनमानस संतप्त आहे. पाकिस्तानविरुद्ध पुन्हा एकदा सर्जिकल स्ट्राईक करण्यात यावा अशा आशयाचा अग्रलेख तरुण भारतने प्रकाशित केला होता. अग्रलेखात तरुण भारतने जनभावनाच व्यक्त केल्या होत्या. त्या जनभावनांचा सन्मान भारतीय लष्कराने पुन्हा एकदा करावा, अशी अपेक्षा आहे. भारतीयांना आता आणखी कठोर कारवाईची अपेक्षा आहे. गतकाळात म्हणजेच, नेहरू पंतप्रधान असताना ज्या चुका भारताने केल्यात, त्यांची पुनरुक्ती आता होऊ नये. जेव्हा केव्हा संधी मिळेल तेव्हा पाकिस्तानला धडा शिकविला पाहिजे. वेळ पडली आणि संधी मिळाली तर जगाच्या नकाशावर पाकिस्तानचे नामोनिशाण राहणार नाही, अशी कृती केली पाहिजे. कारण, पाकिस्तान आता सुधरण्याच्या पलीकडे गेला आहे. देशवासीयांचा ऊर गौरवाने भरून येईल, अशी कृती आता भारताकडून केली जाणे अपेक्षित आहे. ■

रविवारची पत्रे

कलाकंद आणि कुल्फी

शाळेत असताना शाळेतर्फे व्हॉलिबॉलच्या आंतरशालेय स्पर्धा व्हायच्या. धरमपेठ शाळेकडून आम्हा मुलींची टीम रेशीमबाग येथे होणाऱ्या सामन्याकरिता जायचो. इयत्ता सातवी ते नववी हा खेळ आम्ही खूप खेळलो. हा खेळ संपूर्ण टीमचा असल्यामुळे स्पर्धेच्या काही दिवस आधी भरपूर सराव व्हायचा. सामना रेशीमबाग मैदानात म्हणजे आमच्या घरापासून बऱ्याच लांब अंतरावर असायचा. त्यामुळे सकाळी सकाळी सायकलवर स्वार होऊन सगळ्या झाशीच्या राण्या प्रशिक्षकांसोबत मैदानावर पोहोचत असू. तिथले वातावरण फार उत्साहाचे असायचे. सगळे मैदान विद्यार्थ्यांनी तुडुंब भरलेले. त्यात शाळेच्या गणवेषावरून एकमेकांना चिडवणे पण असायचे; जसे पांढरे बगळे, हडसचे हाडं खाऊ वगैरे... स्पर्धेत कधी जिंकत असू तर कधी हरत असू. खरा इंटरेस्ट मात्र त्यानंतर शाळेतर्फे मिळणाऱ्या अल्पोपाहारात. तिथून धरमपेठ येथे असणाऱ्या जोशी विश्रांती गृहमध्ये आम्ही सगळ्या यायचो. या विश्रांती गृहाने आजवर तमाम लोकांची क्षुधाशांती केली आहे. याला हॉटेल वगैरे शब्द नकोच. कारण साधे छोटे उपाहारगृह होते. तिथले समोसे, दोसे, उपमा, चहा एकदम प्रसिद्ध. तिथे आम्ही मसाला दोसा आणि कलाकंद नामक स्वीट डिश खायचो. त्यावेळी आम्ही कधीच मुद्दाम हॉटेल वगैरेत जात नसू. त्यामुळे या गोष्टीचे अप्रूप होते. तिथे रबडीसारखे घट्ट कम पातळसर असे कलाकंद आयुष्यात पहिल्यांदा खाल्ले. त्याची चव कधीच विसरणार नाही. माझ्यापुरते ते अमर झाले आहे. आजही ही आवड आम्ही जोपासली आहे. आताही घरी दूध नासले तर आम्हाला आनंद होतो. मुलगी तर आनंदाने ओरडते म्हणजे आता कलाकंद/छना मिळणार. पण तेव्हा खाल्लेल्या कलाकंदाची सर कधीच येत नाही. आजही कलाकंद म्हटले की, आम्ही सगळ्या दमलेल्या सात-आठवीतल्या पांढऱ्या स्कर्ट-ब्लाऊज घातलेल्या, पांढरे बूट-मोजे आणि वेण्या घातलेल्या चिवचिव करत दोस्यावर आणि डेझर्टवर ताव मारलेल्या मुलीच आठवतो. दुसरी आठवणीतली डिश म्हणजे लक्ष्मी भुवन येथे सरोज (आता सुदामा) टॉकीजसमोरच्या एकाच दुकानात उन्हाळ्यात मिळणारी दिलीप कुल्फी. ल्यूमिनियमच्या छोट्या डबा वजा वाटीत मिळायची आणि तिथे जाऊन टेबल-खुर्चीत बसून खावी लागायची. पहिलाच चमचा तोंडात टाकला की रसना तृप्त व्हायची आणि लवकर संपू नये म्हणून पुरवून पुरवून खायची. ती कुल्फी खायला आमचे काका आम्हा सगळ्यांना घेऊन जायचे आणि आम्ही बच्चा लोग ती जीभेवर तरंगणारी चव आठवत आठवत रमत गमत घरी चालत यायचो. त्यानंतर आयुष्यात खूपदा दोसा, कलाकंद, वेगवेगळ्या प्रकारचे आईस्क्रीम्स, कुल्फी सगळे खाल्ले, पण त्या छोट्याशा वाटीतल्या कलाकंदाची आणि कुल्फीची चव नाही गवसली. तुम्हाला माहीत असेल तर जरूर कळवा...

स्नेहल खंडागळे/नागपूर

●● ●●

मायावी वातावरण निर्मिती तंत्र!

दिशाभूल करणाऱ्या कुटिल वातावरण निर्मिती तंत्राला मायावी/आभासी वातावरण निर्मिती तंत्र (फेक नॅरटिव्ह सेटिंग टेक्निक) असे म्हणतात. आभास निर्मिती ही एक क्रिया असते. आभास दूर सारून वास्तव समोर आणणे, ही त्यावरील प्रतिक्रिया असते. प्रतिक्रिया येईपर्यंत क्रियेने आपला कार्यभाग साधलेला असतो, ही यातली खरी अडचण आहे! आभास निर्मिती तंत्र ही एक मायावी महाशक्ती आहे. मायावी वातावरण निर्मिती तंत्र वापरून कुणाचेही प्रतिमा भंजन करता येते तसेच महिमा मंडन करता येते. पाच वर्षांच्या यशस्वी कारकीर्दीनंतर देवेंद्र फडणवीस यांना मिळालेला प्रचंड जनादेश पायदळी तुडवत पवार आणि ठाकरे यांनी फडणवीसांना सत्तेपासून वंचित ठेवले, तरीही मीडियाला देवेंद्र फडणवीस यांच्याविषयी कुठेही सहानुभूती दिसली नाही? उलट ठाकरेंच्या पक्षात फूट पडली आणि अडीच वर्षांतच अप्रिय मविआ सरकार गडगडले. नंतर पवार साहेबांचा पक्षही फुटला, तर या दोन नेत्यांविषयी मीडियाला केवढी प्रचंड सहानुभूती पदोपदी दिसली? अगदी याच मायावी वातावरण निर्मिती तंत्राचा वापर करून मोदी प्रतिमा भंजन आणि राहुल महिमा मंडन हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविला जात आहे. निवडणुकीत भारतीय जनता पार्टी हरली की सगळे चिडीचिप आणि जिंकली की मतदान यंत्रांमध्ये हेराफेरी अशी आवई उठवायची. जागतिक पातळीवर कधी आपापसांत सहमतीने तर कधी एकमेकांच्या विरोधात काम करणाऱ्या तीन महाशक्ती आहेत. ध्येय-उद्दिष्ट्य वेगवेगळी आहेत, मात्र मिशन आहे, मिशन-२०४७! या तीन महाशक्ती कुठल्या तीन वेगवेगळ्या देशांच्या नाहीत तर तीन वेगवेगळ्या रंगांच्या आहेत! एका महाशक्तीला २०४७ पर्यंत सारं जग लाल रंगात रंगवायचं आहे, दुसऱ्या महाशक्तीला हिरव्या रंगात तर तिसऱ्या महाशक्तीला सारं जग सफेद रंगात रंगवायचं आहे. गंमत अशी की यातली एक महाशक्ती लोकशाही प्रणालीची कट्टर समर्थक आहे आणि इतर दोन महाशक्ती जिथे सत्तेवर असतात तिथे लोकशाही प्रणाली एकतर मुळीच नसते किंवा असलीच तर ती मृतवत असते. भगव्या रंगात रंगलेला सनातनी भारत हा या तीनही महाशक्तींच्या टार्गेटवर महाशक्तींच्या जन्मापासूनच आहे. भारतातलं त्यांचं आजचं आशास्थान आहे, काँग्रेस पार्टी आणि सोनिया-राहुल गांधी! २०१४ पासून मात्र त्यांचा धीर सुटत चालला आहे. नरेंद्र मोदी आणि त्याचा नया भारत अधिकाधिक सनातनी, जागृत, बळकट, स्वावलंबी होत गेला. मोदी मिशन-२०४७ यशस्वी झालं, तर आपलं कठीण होईल म्हणून भारतातील मोदीविरोधकांना सोबत घेऊन लोकसभा निवडणूक आपल्याला अनुकूल करून घेण्यासाठी या तीनही महाशक्तींकडून मायावी वातावरण निर्मिती तंत्राचा वापर करण्यात आला. जे कधी घडणारच नाही, ते नक्कीच घडणार आहे, असं भासविण्यासाठी हा प्रयत्न आहे. राहुल गांधी यांनी वेळी-अवेळी केलेले आणि चेष्टेचा विषय ठरलेले अनेक गूढ विदेश दौरे कुणी फारसे गांभीर्याने घेतले नाहीत, पण त्यांच्या प्रचार काळातील भाषणातून हेच जाणवते की राहुल गांधी हे मायावी वातावरण निर्मिती तंत्र योजना आखणी आणि वितरण याची पूर्वतयारी करण्यासाठीच वेळोवेळी विदेश दौरे करत असावेत. फसगत होऊ नये म्हणून अखंड सावधान असावे!

सोमनाथ देशमाने/९४२१६३६२९१

●● ●●

संस्कृत- जगत भाषेची जननी

भारताची मूळ संस्कृती देववाणी संस्कृतमध्ये आहे. संस्कृत भाषा भारतीयतेचा आरसा आहे. जीवनातील सुख, सुविधा, संपदा प्राप्त करण्याचे अनेक मार्ग आहेत, पण सत्यम् शिवम् सुंदरम् हे आपल्याला संस्कृतच प्रदान करते.

शरीरामध्ये जे स्थान आपल्या आत्म्याचे आहे, तेच स्थान भारतामध्ये संस्कृतला आहे. संस्कृत भाषा ही संपूर्ण भाषा आहे. उच्चाराच्या दृष्टीने याचा एकही शब्द व्यर्थ जात नाही. सामाजिक समरसता, भावनात्मक एकता आणि राष्ट्रीयतेची भावना उत्पन्न करण्यासाठी संस्कृत हे पूर्णतः सक्षम आहे. संस्कृत ही जगात बोलल्या जाणाऱ्या समस्त भाषांची जननी आहे. अगदी युरोपीय भाषांची सुद्धा.

काही भारतीय भाषांमध्ये जसे मराठी, उडिया, गुजराती, बंगाली, पंजाबी, राजस्थानी या सर्व भाषांमध्ये बरेचसे शब्द संस्कृतचे आहेत. संस्कृतचा प्रसार अधिक मात्रेत झाला तर निश्चितच भारतीय भाषांचा पण विकास जलद गतीने होईल. कारण या भाषांमध्ये येणारे शब्द, रूप, रस, गंध, अर्थ, वाक्य आणि म्हणी संस्कृतमधूनच आले आहेत. कारण, पूर्वी संपूर्ण विश्वामध्ये संस्कृतचे महत्त्व होते. त्यातूनच संस्कृतीचा विस्तार झाला.

संस्कृत भाषा ही हजारो वर्षांपासून मानवतावाद, ज्ञान विज्ञान, उन्नती, नैतिकता, राष्ट्रीय एकता आणि संस्कृतीची पोषक राहिली आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषद, पुराण, इतिहास, व्याकरण, महाभारत, स्मृती, संख्यायोग, शिशुपालवध, कालिदासाचे शाकुंतल, मेघदूत, पंचतंत्र, चाणक्य नीती, हितोपदेश असे अनेक ग्रंथ विश्वाची धरोहर आहे. संस्कृतचे साहित्यकार कालिदास, आर्यभट्ट, विशाखा दत्त, जयदेव, शंकराचार्य, चाणक्य, जगन्नाथ पंडित विशेष उल्लेखनीय आहेत.

संस्कृतचा विस्तार होणे गरजेचे आहे. इथे एक आवर्जून नमूद करावेसे वाटते. भारताच्या माजी परराष्ट्र मंत्री दिवंगत सुषमा स्वराज यांनी संस्कृतच्या वैज्ञानिकतेचे मंत्रमुग्ध करणारे भाषण दिले होते. त्यात त्या म्हणाल्या होत्या की, संस्कृतमध्ये शब्दांचे इतके भंडार आहे की रचनाकार त्याचा उपयोग व्यक्तीच्या प्रकृतीनुरूप करत असे. उदा.- 'रामाने' म्हटलेले 'रुद्राष्टक'- त्यातून रामाचे व्यक्तिमत्त्व लक्षात येते.

आणि दुसरे 'रावणाने' म्हटलेले 'शिवतांडव स्तोत्र.' समजा, हे आपण पाच वर्षांच्या मुलाला विचारले की बाबा यातले कुठले स्तोत्र कुणी म्हटले तर तो सहज त्यांची नावे सांगू शकतो.

वैज्ञानिकांनी सुद्धा कॉम्प्युटरसाठी संस्कृतला विश्वातील श्रेष्ठ भाषा म्हणून स्वीकारले आहे. संस्कृत ही ज्ञानाचा प्रकाश पसरवणारी, तसेच मानवतेचा पाठ देणारी, विश्वाला एका सूत्रामध्ये बांधून ठेवणारी, संस्कृत भाषा विश्वातील प्रत्येक व्यक्तीने शिकणे व त्याचा प्रसार, प्रचार करणे हे त्याचे प्रथम कर्तव्य आहे.

रमा देशमुख/नागपूर

●● ●●

तरुण पिढी शेतीत का रमत नाही?

भारत हा कृषिप्रधान देश आहे, असे आपण लहानपणापासून ऐकत आलेलो आहोत. ही वास्तविकता स्वीकारावीच लागेल. कारण भारतातील बहुतांश लोक आजही कृषी व्यवस्थेवर अवलंबून आहेत. जवळपास देशातील ७० टक्के जनता ही आजही कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. बहुतांश रोजगार, व्यवसाय कृषी क्षेत्राशी निगडित आहेत. असे असतानाही केंद्र सरकार कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष करते आहे. आज १ नंबरवर असलेले कृषी क्षेत्र हे ३ नंबरवर फेकले गले आहे. एकेकाळची काळी आई ही दुर्लक्षित झालेली आहे.

शेती हा अत्यंत आतबट्ट्याचा व्यवसाय झाला आहे. यात कुठल्याही प्रकारचे आकर्षण राहिलेले नाही. मूलभूत शिक्षणातून शेतीला हद्दपार करण्यात आले आहे. लहान मुलांचे मातीशी असलेले नाते हे तोडण्यात आले आहे. शाळा परिसर स्वच्छता, बागायत, खेळकूद, क्राफ्ट इ. विषयांना कालबाह्य ठरविण्यात आले आहे. आता संगणक, लॅपटॉप, टॅब, मोबाईल, स्क्रीन इ. आधुनिक प्रणालीद्वारे शिक्षण ऑनलाईन, ऑफलाईन देण्यात येते आहे. यामुळे खडू-फळा अडगळीत जाऊन पडला आहे. पुस्तकरूपी सहज उपलब्ध होणारे शिक्षण याची वाट लावली गेली आहे. शिक्षणाला व्यावसायिक स्वरूप प्राप्त करून दिले जात आहे. यासाठी स्वतःला शिक्षण सम्राट म्हणवून घेणारे लोकप्रतिनिधी आणि श्रीमंत वर्गातील लोक यांचे कारस्थान कारणीभूत ठरते आहे.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असे संत तुकाराम महाराज यांनी म्हटले आहे ते उगाच नव्हे! त्यांनी निसर्गाचे महत्त्व जाणले होते. आज आम्ही निव्वळ निसर्ग संवर्धनाचे नाटक करतो. समूहाने एक-दोन झाडे लावून त्याचे प्रदर्शन मांडतो आहे. कुणालाही न कळू देता वारेमाप झाडांची कत्तल करतो आहे. शेतीबाबतची आवड निर्माण होण्यासाठी शेतीविषयक शिक्षणाची सुरुवात ही प्राथमिक शिक्षणापासून सुरू केली पाहिजे. आज शेतीची अत्यंत दुरवस्था झालेली आहे. एक नंबरवर असलेली शेती तीन नंबरवर गेली आहे. याची कारणे काय आहेत, हे तपासून पाहिले जात नाहीत. यावर उपाययोजना करणे तर दूरच राहिले. धातुरमातुर कर्जमाफी देऊन, वीज बिल माफ करून, अनुदान देऊन हे काम भागणारे नाही. तर यावर कायमचा पर्याय शोधला गेला पाहिजे. केंद्र सरकारने जमीन धारणा कायद्यात सुधारणा करून कमाल जमिनीची अट शिथिल केली आहे. यामुळे आता कुणालाही देशात कुठेही वारेमाप जमीन खरेदी करता येते. यामुळे मोठमोठे उद्योजक, व्यापारी यांचा कल जमीन खरेदीकडे वाढलेला पाहायला मिळतो आहे. यामुळे जमिनीच्या भावात वाढ झाली आहे. शेतीची सुपीक जमीन खरेदी करून यावर उद्योगधंदे, व्यवसाय, हॉटेल्स, मॉल्स इ. उभारले जात आहेत. शेती कसणे दिवसेंदिवस कठीण काम होत आहे. सरकारच्या रेवडी छाप फुकटच्या योजनांमुळे मजुरांना, शेतकऱ्यांच्या मुलांना कष्टाचे काम नकोसे वाटते आहे. शेतीत कसण्यासाठी मजूर मिळणे कठीण झाले आहे. मग शेती कशी करणार? यामुळे शेती विकण्याकडे किंवा ठेक्याने देण्याकडे शेतकऱ्यांचा कल दिसतो आहे.

शेतमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार जोपर्यंत शेतकऱ्यांना प्राप्त होत नाही. तोपर्यंत शेतकरी हा पारतंत्र्यातच जगणार आहे, ही खूणगाठ मनाशी बांधली गेली पाहिजे. शेती हा व्यवसाय घोषित करण्यात आला पाहिजे. शेतकरी जे उत्पादन शेतीत घेतो त्याच्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार त्याला मिळालाच पाहिजे. आयात-निर्यात धोरण हे शेतकरी हिताचे असले पाहिजे. न की व्यापारी हिताचे! शेती ही फायद्याची ठरली पाहिजे. जास्तीत जास्त रोजगार देणारा हा व्यवसाय नफ्यात येईल तो सुदिन म्हणावा लागेल.

मिलिंद गड्डमवार/९५११२१५२००

●● ●●

ज्येष्ठांना तीर्थस्थळांचे दर्शन

महाराष्ट्र शासनाने ज्येष्ठांना भारतातील ७३ आणि महाराष्ट्रातील ६६ तीर्थस्थानी मोफत प्रवास करण्याची योजना कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे. तसे परिपत्रक सामाजिक न्याय विभागाने नुकतेच प्रसिद्ध केले आहे. हा उपक्रम प्रशंसनीय आणि अभिनंदनीय आहे.

ज्येष्ठ नागरिक म्हटले की त्यांचे वय ६० वर्षांवरील असणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील ज्येष्ठ नागरिकांचे सरासरी वय ६५ असावे. प्रवास करायचा म्हटला की त्यांना कुणाची तरी सोबत लागणार. मग त्यांच्या खर्चाचा प्रश्न उपस्थित होणार. कारण बहुसंख्य ज्येष्ठांना पेन्शन मिळत नाही आणि काहींना १००० रुपये आणि त्या पेक्षाही कमी पेन्शन मिळत आहे. या अल्प उत्पन्नात दैनंदिन खर्च भागवताना तारेवरची कसरत करावी लागते.

ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्नाचे एकमेव साधन म्हणजे मिळणारी पेन्शन. महाराष्ट्रात एक कोटीच्या वर ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यातील किमान ३० टक्के लोकांना पेन्शन मिळत नाही. काहींना अल्प पेन्शन मिळत आहे. त्यांना दुसरे उत्पन्नाचे साधन नाही. दुसऱ्यावर अवलंबून राहणे क्रमप्राप्त आहे. मानसिक तणावात ते जीवन जगतात. प्रवास मोफत असला तरी मार्गात येणारा इतर खर्च, भोजन आदी कुठून करणार ही समस्या आहे. त्यामुळे नको ते तीर्थस्थानी जाणे, अशी मानसिकता अनेकांची असू शकते.

भारत सरकार आणि महाराष्ट्र सरकारने या बाबतीत विचार करण्याची गरज आहे. सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या दृष्टीने न्यूनतम दैनंदिन खर्च भागविण्यासाठी सर्वांना पेन्शन योजना राबविण्याची गरज आहे. ज्येष्ठांचे प्रतिनिधित

मुख्यमंत्री एकनाथराव शिंदेंनी विकासात कुठेही भेदभाव केला नाही -माजीमंत्री अर्जुनराव खोतकर

कुंबेफळ येथे विविध विकास कामांचा अर्जुनराव खोतकरांच्या हस्ते शुभारंभ

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या विकासासाठी अहोरात्र झटत असलेले मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांनी सत्ताधारी पक्षाचे लोकप्रतिनिधी नसले तरी केवळ जनतेला सुविधा मिळाल्या पाहिजे या व्यापक भूमिकेतून जालना विधानसभा मतदारसंघात भरघोस निधी उपलब्ध करून दिला. विकास कामांत मुख्यमंत्र्यांनी भेदभाव केला नाही त्यामुळेच शहर आणि ग्रामीण भागात विकासाला गती मिळाली असे प्रतिपादन शिवसेना उपनेते माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी केले.

कुंबेफळ ता. जालना येथे बरड वस्ती सिमेंट रस्ता, गाव अंतर्गत तसेच संत सावता मंदिर पेवर ब्लॉक बसवणे, कुंबेफळ- सिरसवाडी रस्ता दुरूस्ती अशा विविध विकास कामांचा शुभारंभ शनिवारी (ता. २७) माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, माजी सभापती पांडुरंग डोंगरे, कृ. उ. बा. चे प्रशासकीय संचालक तथा युवा सेना तालुकाप्रमुख राहुल गवारे, सरपंच रविंद्र ढगे, ड.राहुल हिवराळे,सरपंच विठ्ठल गवारे, उपसरपंच हरेश पठाण,तंटामुक्ती अध्यक्ष ईश्वर काटकर, शालेय समिती अध्यक्ष बंडू गवारे,वि.का.सोसायटी चेअरमन भरत हिंगणे, ग्रा पं.सदस्य संदीप म्हस्के,दिनेश वाहुळ, रमेश काटकर, बाळासाहेब पाचरणे,सचिन क्षीरसागर, रखमाजी गवारे ,लक्ष्मणराव गवारे, महादु परळकर, सुभान परळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी याप्रसंगी बोलतांना गाव पातळीवर पायाभूत सुविधा, विकास कामांसाठी राहुल गवारे यांच्यासारख्या तरुण नेतृत्वाने आपल्याकडे वारंवार मागणी केली आपण केलेल्या पाठपुराव्यास मुख्यमंत्र्यांनी प्रतिसाद देत भरघोस निधी उपलब्ध करून दिला. यामुळेच ग्रामीण भागात विकास कामे होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री लाडकी बहीण नोंदणी शिबीराचा महिलांनी नोंदणी करून लाभ घ्यावा असे आवाहन खोतकर यांनी केले. कार्यक्रमास महिला, तरुण व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उप-स्थिती होती. ग्रामस्थांनी आपल्यासारख्या नवख्या तरुणावर विश्वास दाखवत ग्रामपंचायत चा कारभार करण्याची संधी दिली. शिवसेना उपनेते, माजी मंत्री अर्जुनराव खोतकर, युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील सर्व समाज घटकांना पायाभूत सुविधा देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला. असे कृ. उ. बा. चे प्रशासकीय संचालक तथा युवा सेना तालुका प्रमुख राहुल गवारे यांनी याप्रसंगी बोलतांना नमूद केले.तथापि मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत नोंदणीसाठी मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून गावातील पात्र, लाभार्थी महिला वंचित राहणार नाही याची दक्षता घेणार असल्याचेही राहुल गवारे यांनी यावेळी सांगितले.

संक्षिप्त

विरेगाव आरोग्य शिबिरात ३८४ रुग्णांची तपासणी

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

महात्मा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत विवेकानंद हॉस्पिटल जालना आणि प्राथमिक आरोग्य केंद्र विरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता. २७) मोफत सर्व रोग निदान शिबिर घेण्यात आले. शिबिरात नवजात शिशु , लहान बालके किडणी , मूत्र मार्गातील खडे , अस्थिरोग, गुडघे ,मणक्याचे आजार, कॅन्सर , थायरॉईड, आतड्याचे आजार,अशा विविध आजारग्रस्त रुग्णांची विवेकानंद चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. राजकुमार सचदेव,संचालक डॉ.श्रीमंत मिसाळ,डॉ चारुदत्त हवालदार, डॉ. चारुस्मिता हवालदार, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सतीश गोयल,डॉ.सौरभ शेलगावकर , डॉ. सुनीता जोशी आदी तज्ञ डॉक्टरांमार्फत तपासणी करून औषधे वितरित करण्यात आली. सुत्रसंचालन आरोग्य सहाय्यक मदन देशमाने यांनी केले तर विठ्ठल लाड यांनी आभार मानले. पंचक्रोशीतील ३८४ ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. शिबिराच्या यशस्वीतेसाठी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज राठोड,व्यस्थापक किशोर आघाम, प्रशासकीय अधिकारी शशिराज केंढे, औषध निर्माण अधिकारी स्वप्निल दांडगे, रवीराज केंढे, सचिन कांबळे, डॉ.अश्विनी जुकटे, गट परिवर्तक अनिता खांडेभराड, औषध निर्माण अधिकारी रवी हनवते, आरोग्य सेवक धनंजय दुसाने, राजू जैवळ, श्रीमती गायकवाड ,श्रीमती मुलगे ,श्रीमती ढिल्पे, श्रीमती घोरपडे ,श्रीमती थोरात, शिवाजी खरात, निलखन आदींनी परिश्रम घेतले.

तभा वृत्तसेवा

जालना : माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांनी अग्रसेन नगर येथे भेट दिली असता येथील रहवासी तर्फे ओपन स्पेस विकास करणेबाबत निवेदन देतांना देण्यात आले. यावेळी अर्जुनराव खोतकर यांनी चारही बाजूंनी कंपाऊंड वॉल हायमॅक्स लाईट, सिनियर सिटीझनला बसण्यासाठी बेंच, वाकींग ट्रॅक करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी कॉलनीतील सर्व प्रतिष्ठत नागरिक उपस्थित होते.

जगदंब गणेश मंडळाची कार्यकारिणी जाहीर

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मंठा शहरातील घारे कॉलनीचा राजा जगदंब गणेश मंडळाची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली. यात अध्यक्ष आदित्य भुसारे , उपाध्यक्ष बालाजी बागल , सिद्धार्थ जाधव , सचिव अभिषेक आघाव, दत्ता काळे, सहसचिव विकास जाधव , जीवन दाळवे , सुरज वाघमारे , कोषाध्यक्ष विजय घोडे , यश बोराडे , सोशल मीडिया सौरभ हुलजुते , गुणवंत खोंडे, सल्लागार विकास घुगे, कैलास तायडे ,अवि ठोकरे, दत्ता काळे ,बबलू घोडे, ऋषी वाघ,शुभम गादेवाड , इरफान लाला, गजानन बोराडे, नरेश पांजगे, निलेश गायकवाड, विष्णू बोराडे, सुनील सोनटक्के, अमोल खंडागळे, योगेश वाघमारे, अर्जुन खराबे, मनोज इंगळे, कृष्णा ठोकरे यांचा कार्यकारणीत समावेश आहे.

नोंदणीकृत असंघटित नागरिकांनी शिधापत्रिका काढून घ्यावी -ना.तहसिलदार विनोद भालेराव

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

केंद्र शासनाच्या ईथम पोर्टलवरील नोंदणीकृत स्थंलातरीत असंघटीत यांना शिधापत्रिका वितरीत करण्याचे काम सुरू आहे. कामगार विभागाने ई श्रम पोर्टवरील उर्वरित नोंदणीकृत स्थंलातरीत, जे अद्यात रेशनकार्ड डेटावर नोदणीकृत नाहीत अशा कामगारांचा जिल्हानिहाय डाटा उपलब्ध करून दिला आहे. नोंदणीकृत कामगारापैकी विनाशिधापत्रिका धारक कामगारांची यादी परतूर तहमिल कार्यालयास प्राप्त झाली असून, यादीमध्ये नमूद कामगारांना तातडीने अनुज्ञेय शिधापत्रिका व त्यावरील लाभ देण्यात यावे असे निर्देश प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने परतूर तालुक्यातील नोंदणीकृत कामगारांना यांना शिधापत्रिका नसल्यास शिधापत्रिका मिळणेकरिता तहसिल कार्यालय परतूर येथे (ता.३०)रोजी रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०४.०० वाजेपर्यंत कैम्प चे आयोजन करण्यांत आले आहे. यामध्ये नोंदणीकृत कामगारांना शिधापत्रिका वितरीत करणेकरिता नोंदणीकृत कामगार यांनी कुटुंबातील सर्व सदस्यांचे आधारकार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, बैंकेचे पासबुक व आवश्यक त्या कागदपत्रासह उपस्थित रहावे असे आव्हान विनोद भालेराव यांनी केले आहे.

घनसावंगीच्या आमदाराविरोधात धामणगावच्या नागरीकांचा उठाव

गावच्या विकासासाठी दिला सतीश घाटगेंना पाठींबा

तभा वृत्तसेवा
अंबड/बाळासाहेब गावडे

अंबड घनसावंगी: दि २८/७/२४वा रविवार शिक्षण, आरोग्य आणि रस्ते या मूलभूत सुविधापासून वंचित असलेल्या श्रीपत धामणगावची जनतेमध्ये विद्यमान आमदाराविरोधात शनिवारी मोठा रोष पाहायला मिळाला. कोणत्याही पदावर नसताना सतीश घाटगे यांनी केलेल्या विकासकामामुळे धामणगावकरांनी सतीश घाटगे यांना आगामी निवडणुकीसाठी पाठींबा दिला.

समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली शनिवारी धामणगावात भव्य शाखा उद्घाटन कार्यक्रम पार पडला. या सोहळ्यात जमलेल्या युवा वर्गाने आपल्या गावासाठी सर्व जनतेला सतीश घाटगे यांच्या बाजूने एकत्रित करत एका प्रकारे उठाव केला . सतीश घाटगे यांचे गावात जंगी स्वागत गावकऱ्यांनी केले. सतीश घाटगे यांनी श्रीपत धामणगावाला श्रीमंत धामणगाव बनविण्याचा शब्द दिला. तसेच येणाऱ्या काळात परिवर्तन अटळ आहे. असा विश्वास दिला. नूतन शाखेतील पदाधिकारी प्रदीप शिंदे, मच्छिंद्र येले, लखन इंडे, शरद फाटकुरे , रोहिदास शिंदे, विठ्ठल शिंदे, आकाश शिंदे, भरत शिंदे, अंकुश शिंदे, अंकुश राऊत आण्णासाहेब शिंदे, युनुस शेख, मोकिंद शिंदे, अनंत शिंदे, विकास येले, अर्जुन शिंदे, गणेश शिंदे यांनी या कार्यक्रमासाठी पुढाकार घेतला. यावेळी समृद्धी कारखान्याचे संचालक अभिजीत उढाण, राजेंद्र छल्लारे सर, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव कंटुले, कामगार विभागाचे जिल्हाध्यक्ष गोविंद आर्दड, ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष माधव टेहळे, भगवान तौर, हनुमान आर्दड, रमेश जाधव, बाळासाहेब बोरकर सह आदि भाजपा पदाधिकारी उपस्थित होते

धामणगावच्या रस्त्याचा प्रश्न लवकरच लावणार मार्गी

धामणगाव हे घनसावंगी तालुक्यातील शेवटचे गाव असून या गावाला जोडणारा मुख्य रस्ता २५ वर्षापासून अत्यंत दयनीय बनला आहे. हा रस्ता नव्याने तयार करण्यासाठी सतीश घाटगे यांनी प्रयत्न करून मंजुरी मिळवून आणली आहे. या रस्त्यामुळे शाळकरी मुले आणि शेतकऱ्यांचे मोठे हाल होत होते.

कामगारांसाठी अहोरात्र झटणारे बनकर दांपत्य

तभा वृत्तसेवा
टेंभुर्णी / प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील सातेफळ येथील सुनीता बनकर, रामदास बनकर हे बनकर कामगारांसाठी अहोरात्र झटणारे दांपत्य म्हणून पंचक्रोशीत त्यांची एक आगळी वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

रामदास बनकर हे अल्पशिक्षित असून पत्नी सुनीता जेमतेम शिकलेली, भूमिहीन असणारे बनकर यांनी सुरवातीप-ासून सालगडी म्हणून तर पत्नी सुनीता यांनी रोजमजुरी केली. रोजमजुरी साठी सोबत असणाऱ्या महिला व त्यांची परिस्थिती अशा अनेक बाबीचा विचार करून त्यांनी गावातील महिला कामगार व पुरुष कामगार याची एक यादी बनवून निःशुल्क पणे सर्व महिला व पुरुषांची कामगार कल्याण विभागात नोंदणी करून अनेकांना लाभ मिळवून दिला आहे. हातांवर पोट असणाऱ्या या बनकर दांपत्याने जवळपास परिसरातील दोनशेहुन अधिक मोलमजुरी करणाऱ्या कामगारांना कामगार कल्याण विभागातून संसार उपयोगी साहित्य,कामगार सुरक्षा किट, कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती अशा योजनेचा लाभ मिळवून दिला आहे. मोलमजुरी करणाऱ्या लोकांना लाभ मिळवून दिला तर त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य हीच माझी कमाई असल्याची त्यांनी सांगितले. बनकर दांपत्याने सातेफळ येथे ८५ कामगारांना संसार उपयोगी साहित्य आणले ते साहित्य राष्ट्रवादी नेते ऍड रामकृष्ण बनकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी दत्ता बनकर, प्रल्हाद बनकर,तेजराव खंदारे, साहेबराव खंदारे, अमोल बनकर, आदींची उपस्थित होती.

उर्दु शाळेच्या वर्ग खोल्यांसाठी पारध येथे मंगळवारी रास्तारोको

तभा वृत्तसेवा
पारध/प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पारध बु. येथील जिल्हा परिषदेच्या उर्दू माध्यमाच्या शाळेच्या वर्ग खोल्यांची अवस्था अत्यंत पायावर झाली असून या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा जीव टांगणीला लागला आहे. यासंदर्भात वारंवार प्रशासनाकडे वर्ग खोल्या बांधून देण्यात यावा म्हणून सर्व स्तरातून प्रयत्न करण्यात आले मात्र जिल्हा प्रशासन झोपेची सोंग घेत असल्याचा आरोप पालक वर्गातून होत आहे. परिणामी आता पालकांनी या वर्ग खोल्यांसाठी रास्तारोको आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.

पारध बू. ग्रामपंचायतीने या संदर्भात ५ फेब्रुवारी २०२३ रोजी सदरच्या सात खोल्या बांधून देण्यात याव्या म्हणून उपोषण करणार असल्याचे निवेदन प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालय जालना यांना दिले होते. मात्र जिल्हा प्रशासनाने कागदी घोडे नाचवत २ मार्च २०२३ रोजी आश्वासनाचे पत्र देऊन रडतीचे असू पुसण्याचे काम केले. प्रत्यक्षात कारवाईला मात्र ठेंगा दाखवत पारध बु. येथील पालकांच्या तोंडाला पाणी पुसले. पारध येथील जिल्हा परिषदेच्या खुर्द माध्यमाच्या शाळेच्या सात वर्गखोल्या अतिशय जीर व धोकादायक झाल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी जालना यांच्या आदेशान्वये गेल्या आठ वर्षांपूर्वी पाडण्यात येऊन जमीनद-ोस्त करण्यात आल्या होत्या. तेव्हापासून या शाळेतील विद्यार्थी मराठी माध्यमाच्या तीन वर्गखोल्यांमध्ये दाटीवाटीने बसविण्यात येत आहे . परिणामी या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पुरता बट्ट्याबोळ झाला आहे. या सात खोल्यांचे बांधकाम करण्यात यावे म्हणून पारध ग्रामपंचायत च्या वतीने उपोषण देखील करण्यात आले होते मात्र जिल्हा परिषद चे प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी यांनी देखील आश्वासनाची खैरात त्यांच्या पदरी टाकून हे उपोषण मागे घेण्यात आली होते. सदर पालकांनी देखील अनेक वेळा जिल्हा प्रशासनाला या खोल्या बांधून देण्यासंदर्भात निवेदन दिले, प्रत्यक्ष अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या मात्र प्रशासनाने कोणतीच दखल घेतली नाही. त्यामुळे आता संतप्त पालकांसह पारध चे सरपंच ग्रामपंचायतचे सदस्य आणि ग्रामस्थ दि.३० जुलै मंगळवारी पारध बू. येथील वालसावंगी फाट्यावर रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचे निवेदन जि.प.चे प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना देण्यात आले असून निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी जालना, गटशिक्षणाधिकारी भोकरदन, गटविकास अधिकारी भोकरदन तथा सहाय्यक पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे पारध यांना देण्यात आल्या आहे.

चोरीस गेलेल्या साडेसात लाख रुपये किंमतीच्या १३ मोटार सायकल अंबड पोलीसांकडुन जप्त

तभा वृतासेवा
जालना / प्रतिनिधी

गेल्या काही दिवसापासुन पोलीस ठाणे अंबड हददीतुन मोटार सायकल चोरी जाण्याच्या घटना घडल्याने पोलीस निरीक्षक आर. के. नाचण यांनी पोलीस ठाणेच्या डी.बी. पथकाला मार्गदर्शन करुन चोराचा शोध घेवुन मोटार सायकल हस्तगत करण्याबाबत सुचना दिल्या होत्या. त्यावरुन दिनांक २७/०७/२०२४ रोजी पोलीस निरीक्षक आर. के. नाचण यांना गुप्त माहीती मिळाली की, इसम नामे संभाजी नाना ननवरे रा. रुई हा अंबड शहरात मोटार सायकल चोरीचे उददेशाने येत आहे. त्यावरुन त्यांनी पोस्टेच्या डि बी. पथकाला सदर इसमास ताब्यात घेण्याबाबत सुचना देवुन रवाना केले होते.

त्यानुसार पोलीस ठाणे अंबडचे डि बी. पथक हे त्याचा शोध घेत असतांना इसम नामे संभाजी नाना ननवरे रा. रुई ता. अंबड जि.जालना हा अंबड शहरात चोरलेली मोटार सायकल विक्री करण्याच्या उददेशाने अंबड येथील मत्सोदरी मंदीर परीसरात मिळुन आल्याने त्यास विश्वासात घेवुन विचारपुस करीता त्याने अंबड, पाचोड, छत्रपती संभाजीनगर, पैठण, सातारा, मुकुंदवाडी, पुंडलिकनगर, कळंब जि. धाराशिव ताडकळस जिल्हा परभणी याठिकाणावरुन त्याचे एका साथीदारासह मोटार सायकली चोरुन आणल्याची कबुली दिल्याने त्यास अटक करुन त्यांचेकडुन खालील वर्णनाच्या १३ मोटार सायकली जप्त करण्यात आलेल्या आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री. अजय कुमार बन्सल, पोलीस अधिक्षक जालना, मा. श्री. आयुष नोपानी, अप्पर पोलीस अधिक्षक जालना, मा. श्री. विशाल खांबे, उपविपोअ, अंबड यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री. आर.के. नाचण, सपोनि अमोल गुरले, पोउपनि स्कॉट, पोहेकॉ/१११८ विष्णु चव्हाण, पोहेकॉ/१२७२ दिपक पाटील, पोहेकॉ/९२७ आविनाश नरवडे, पोकॉ/४७ स्वप्निल भिसे, पोकॉ/४२९ विठठल वैराळ, पोकॉ/५०८ वंदन पवार, यांचेसह स्थागुशाचे पोहेकॉ/९४९ सागर बावीस्कर यांनी केलेली आहे.

बँकांनी कर्जाची टाळाटाळ न करता लाभार्थ्याला सन्मानपूर्वक वागणूक द्यावी अन् पंधरा ते वीस दिवसात कर्ज प्रकरण निकाली काढा-नरेंद्र पाटील

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/ प्रतिनिधी

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या तळागाळातील लाभार्थ्यांना न्याय मिळावा म्हणून तालुकास्तरावर दौऱ्यांचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये सुरू असलेल्या कामाचा आढावा घेण्यात येत आहे. मराठा तरूणांना कर्ज देण्यास टाळाटाळ करणाऱ्या बँकांची गय केली जाणार आहे, असा इशारा अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी बँकेच्या अधिकाऱ्यांना बैठकीत दिला. जाफराबाद तहसील कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते.

पुढे बोलताना म्हणाले की, विविध बँकाच्या किचकट नियमावलीमुळे अनेक मराठा तरुण या योजनांपासून वंचित आहेत. बँक तथा लाभार्थ्यांनी एकमेंकाचे

जाफराबाद तहसील कार्यालयात कर्ज आढावा बैठक

हित जपून तथा समन्वयातून आण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाची कर्ज प्रकरणे मार्गी लावावी, असे आवाहन महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले. जाफ्राबाद येथील तहसील कार्यालयात शुक्रवारी (दि.२६) रोजी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी उपविभागीय अधिकारी डॉ. दयानंद जगताप, तहसी-लदार डॉ. सारीका भगत, नायब तहसी-लदार आर. एम. निहाळ विजयसिंह परीहार, विभागीय समन्वयक प्रवीण पाटील, उध्दव दुनगहू, डी. एल. भूते, ए. के. टाकरस,एस.व्ही.वाघ, स्वप्निल देवकाते, उमेश कोल्हे, वेदांत खैरे, सोमेश्वर

शिंदे, अविनाश देवकर, कृष्णा फुलमाळी, पंढरी परिहार यांची प्रमुख उपस्थिती होती.पूर्तता करून बँकेकडे प्रस्ताव - दाखल करावा. यासाठी बँकानी कर्ज देण्यास टाळाटाळ न करता त्यांना - सन्मानपूर्वक वागणूक द्यावी. १५ ते ✻ २० दिवसात सदरील कर्ज प्रकरणे - निकाली काढावे, अशा सूचना - पाटील यांनी यावेळी दिल्या. तर - बँक आणि लाभार्थ्यांनीही कोणत्या - व्यवसायासाठी किती कर्ज घ्यायचे - आहे व बैंक किती देणार आहे याचा - अभ्यास करुन कर्ज प्रकरणे करावी. - मागील काही वर्षाचा आढावा बघता - बँकाकडे अनेक प्रकरणे प्रलंबित - असून, तालुक्यात गेल्या काहीमहिन्यांत बँकांनी १ हजार १४५ प्रकरणे करण्याचे अपेक्षित होते. मात्र यापैकी निम्मेही कर्ज प्रकरणे निकाली निघाले नसल्याने बँकांनी नेमक्या कोणत्या कारणाने ही कर्ज प्रकरणे निकाली काढल्या गेले नाही असा सवालही त्यांनी विविध बँकाच्या व्यस्था पकांना विचारला. पुढील काळात प्रलंबित तथा नव्या येणाऱ्या कर्ज प्रकरणाचा तात्काळ निपटारा करावा अशा सूचनाही त्यांनी बँक कर्मचाऱ्यांना दिल्या. दरवर्षी किमान ५०० लाभार्थ्यांना तरी या महामंडळातील विविध योजनांचा लाभ मिळाला पाहिजे यासाठी बँकांनी तत्परतेने काम करावे असे अवाहनही त्यांनी केले. यावेळी स्टेट बँक ऑफ इंडिया, महाराष्ट्र, चिखली अर्बन, श्री. गजानन महाराज अर्बन, महाराष्ट्र ग्रामीण,एचडीएफसी, बँक ऑफ बडोदा,जिल्हा मध्यवर्ती यासह तालुक्यातील विविध बँकाचे व्यावस्थापक तथा कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी मराठा समाजातील लाभार्थी, बँक व इतर कर्मचारी तथा नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

तंत्रज्ञान

'ईव्ही' क्षेत्रात भारताची प्रगती

१२ मिनिटांत बॅटरी चार्जिंग शक्य

गेल्या काही वर्षांत भारताने इलेक्ट्रिक वाहने (एत) स्वीकारण्यात उल्लेखनीय पावले उचलली आहेत. तरीही, चार्जिंगच्या अपुऱ्या पायाभूत सुविधांच्या रूपात एक मोठा अडथळा कायम आहे. हे आव्हान केवळ भारतापुरतेच मर्यादित नाही; तर संपूर्ण जगात एक मजबूत ईव्ही चार्जिंग नेटवर्ककी कमतरता किंवा चार्जिंगला लागणारा प्रदीर्घ काळ हे प्रमुख अडथळे आहेत. यामुळेच जगभरातील ग्राहक आपली पारंपरिक पेट्रोल/डिझेलवर चालणारी वाहने सोडून (आयसीई) इलेक्ट्रिक वाहने (ईसी) स्वीकारण्यास एकदम तयार होत नाहीत. डेलॉईटच्या अलीकडील जागतिक सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की चार्जिंगला लागणारा वेळ, रेंजची चिंता, खर्च आणि बॅटरीची सुरक्षा या चार बाबी बॅटरी इलेक्ट्रिक वाहनांच्या ग्राहकांच्या प्राथमिक चिंता आहेत.

भारतात, ८६४ लोकांच्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की ४३ टक्के लोक ईव्ही चार्जिंग करण्यासाठी लागणाऱ्या वेळेबद्दल चिंतित आहेत आणि ४२ टक्के लोक सार्वजनिक ईव्ही चार्जिंग स्टेशनच्या कमतरतेबद्दल चिंतित आहेत. मात्र, या समस्या असूनही या क्षेत्रात लक्षणीय प्रगती होत आहे, ही गोष्ट महत्त्वाची आहे. एक्सपोनंट एनर्जीने आपल्या मालकीच्या स्थानकांवर व्यावसायिक ईव्हीसाठी १५ मिनिटांत जलद चार्जिंग तंत्रज्ञान विकसित करण्याचे जोरात प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचप्रमाणे, बंगळुरूस्थित ईएमओ एनर्जीने ईव्ही बॅटरी पॅक तयार केले आहेत जे ३० मिनिटांत पूर्ण चार्ज होऊ शकतात.

क्लीन इलेक्ट्रिकची स्थापना २०२० मध्ये आयआयटी बीएचयू मधील आकाश गुप्ता, अभिनव रॉय आणि अंकित जोशी या तीन माजी विद्यार्थ्यांनी केली. कंपनीचे प्राथमिक उद्दिष्ट इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) बॅटरीशी संबंधित महत्त्वाच्या समस्यांचे निराकरण करणे हे होते, विशेषत: सुरक्षितता, किंमत आणि सुविधा यावर लक्ष केंद्रित करण्यावर कंपनीचा भर होता. सहसंस्थापक आणि सीईओ आकाश गुप्ता यांच्या म्हणण्यानुसार, इलेक्ट्रिक वाहनांना व्यापक मान्यता मिळण्यासाठी आणि त्यांचा उपक्रम यशस्वी होण्यासाठी त्यांना ईव्ही अधिक किफायतशीर आणि सोयीस्कर बनवणे आवश्यक आहे.

सध्याच्या ईव्हीमधील एक मोठा दोष म्हणजे चार्जिंगला लागणारा जास्त वेळ. पारंपरिक ज्वलन इंजिन वाहनाला इंधन भरण्यासाठी फक्त पाच मिनिटे लागतात. परंतु ईव्ही चार्ज करण्यासाठी ६० ते १०० मिनिटे लागू शकतात. चार्जिंगला लागणाऱ्या या वेळेत अधिकाधिक घट करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट क्लीन इलेक्ट्रिक कंपनीने ठेवले आहे. हा वेळ केवळ १० ते १५ मिनिटांपर्यंत आणण्यासाठी कंपनीचे तज्ज्ञ, अभियंते सातत्याने प्रयत्नरत आहेत. हे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट साध्य करण्यासाठीच २०२० मध्ये क्लीन इलेक्ट्रिक कंपनीची स्थापना करण्यात आली. त्यानंतर सहसंस्थापकांनी 'डायरेक्ट कॉन्टॅक्ट लिक्विड कूलिंग' नामक नवीन आर्किटेक्चरवर काम करण्यास सुरुवात केली, जे एक प्रकारचे इमर्शन लिक्विड कूलिंग तंत्रज्ञान आहे. सीईओ आकाश गुप्ता यांनी सांगितले की, जागतिक स्तरावर अद्याप कोणालाही हे तंत्रज्ञान (बॅटरी चार्जिंग कालावधी कमी करण्याचे) विकसित करता आलेले नाही. ईव्ही विकसित करताना सर्वांत मोठे आव्हान म्हणजे बॅटरीचे प्रभावीपणे व्यवस्थापन करणे हे होय. वाहनाच्या संपूर्ण आयुष्यभर इष्टतम कार्य कायम राखण्यासाठी बॅटरी पुरेशा थंड ठेवणे आवश्यक आहे. कारण जास्त गरम झाल्यामुळे बॅटऱ्या लवकर खराब होऊ शकतात. याव्यतिरिक्त, ईव्हीमध्ये आग लागण्याच्या घटना अधूनमधून होत असतात. मात्र, बहुतेकदा खराब सेल गुणवत्तेमुळे किंवा दोषपूर्ण बॅटरी व्यवस्थापन प्रणाली (बीएमएस) मुळे इलेक्ट्रिक वाहनाला आग लागण्याच्या घटना घडतात. विशेषत: लिथियम-आयन बॅटरीचे मूळतः संवेदनशील स्वरूपामुळे आग लागते.

जगभरात, ईसी बॅटरीसाठी इष्टतम तापमान राखण्यासाठी लिक्विड कूलिंग, एअर कूलिंग आणि फेज चेंज मटेरियल कूलिंग यांसारख्या विविध शीतकरण प्रणाली (कूलिंग सिस्टीम) वापरल्या जातात. इमर्शन कूलिंग म्हणजे बॅटरी सेलला डायइलेक्ट्रिक द्रवपदार्थात बुडविण्यात येते. जलद चार्जिंग सक्षम करण्यासाठी (१० ते १५ मिनिटांच्या श्रेणीमध्ये) प्रगत कूलिंग आर्किटेक्चर आवश्यक आहे. विशेष म्हणजे क्लीन इलेक्ट्रिकने अशा प्रकारची प्रणाली यशस्वी रीत्या विकसित केली आहे. यात अतिशय खास असे बॅटरी व्यवस्थापन तंत्रज्ञान विकसित केले आहे. कंपनीने भारत आणि अमेरिका या दोन्ही ठिकाणी आपल्या नवकल्पनांसाठी चार पेटंट मिळवले आहेत, असे सीईओ आकाश गुप्ता यांनी सांगितले.

२०२२ मध्ये क्लीन इलेक्ट्रिकने कलारी कॅपिटल, आयआयएम अहमदाबाद, क्लायमेट एंजल्स आणि लेट्सव्हेंचर यासह गुंतवणूकदारांकडून अंदाजे २.२ मिलियन डॉलर्सचा निधी मिळवला. कंपनीची एक्सपोनंट एनर्जीशी स्पर्धा आहे. परंतु एक्सपोनंटच्या १५-मिनिटांच्या चार्जिंग बॅटरीच्या विपरीत, युनिव्हर्सल चार्जिंग पॉईंट्ससह काम करणाऱ्या बॅटरीवर आम्ही लक्ष केंद्रित करीत आहोत. स्मार्टफोनसाठी जसे 'युनिव्हर्सल चार्जर' वापरता येते अगदी त्याचप्रमाणे ईव्ही चार्जिंगसाठी एक जागतिक मानक स्थापित करणे हे क्लीन इलेक्ट्रिकचे उद्दिष्ट आहे, असेही आकाश गुप्ता म्हणाले. आम्ही आधीच दोन, तीन आणि चार-चाकी वाहनांसाठी बॅटरी विकसित केल्या आहेत. यात विविध प्रकारच्या इलेक्ट्रिक वाहनांसाठी वापरल्या जाणाऱ्या कूलिंग सिस्टमचा वापर केला आहे. ज्यात १,००० ते २,००० चक्रांची (सायकल) वॉरंटी आहे, असेही त्यांनी नमूद केले.

क्लीन इलेक्ट्रिक बॅटरी सध्या ३८ शहरांमध्ये ईव्हीला ऊर्जा देत आहे. कंपनीने जागतिक कार निर्मात्यांसह इतर ईव्ही उत्पादकांशी देखील संपर्क साधला आहे. गेल्या वर्षी विक्री सुरू केल्यापासून, क्लीन इलेक्ट्रिक कंपनीच्या व्यवसायात सातत्याने वाढ होत आहे. ही स्टार्टअप कंपनी सध्या महिन्याला सुमारे एक कोटी रुपये कमावते आणि पुढील वर्षाच्या मध्यापर्यंत ते १० कोटीपर्यंत वाढवण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. आम्ही आणखी गुंतवणूकदार शोधत आहेत आणि सध्या दोन गुंतवणूकदारांशी चर्चा करीत आहोत, असेही कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने सांगितले.

२०२९ पर्यंत इलेक्ट्रिक वाहनांचे मार्केट अंदाजे ११४ बिलियन डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. या पृष्ठभूमीवर भारताच्या क्लीन इलेक्ट्रिक कंपनीला उत्तम संधी आहे. कंपनीच्या अभियंत्यांनी यशस्वी रीत्या विकसित तंत्रज्ञान वापरल्यास ईव्ही मार्केटमध्ये महत्त्वाचे स्थान मिळविण्याची महत्त्वाची संधी उपलब्ध होऊ शकते. ●●

(ऑर्गनायझरवरून साभार)

इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात (इलेक्ट्रिक व्हेईकल) भारत सातत्याने प्रगती करीत आहे. क्लीन इलेक्ट्रिकने २०२० मध्ये आपले काम सुरू केले. आता १२-मिनिटांच्या बॅटरी चार्जिंग तंत्रज्ञान आणि स्मार्ट कूलिंग सिस्टीमसह ईव्ही मार्केट बदलण्याची योजना आखणे सुरू आहे. चार्जिंगची गती आणि अनुकूलतेसह प्रमुख समस्या हाताळण्यावर आमचे तज्ज्ञ कार्य करीत आहेत. एकूणच या घडामोडींमुळे भारतीय स्टार्टअप ईव्ही उद्योगावर मोठा प्रभाव पडणार आहे.

प्लेटलेट्स वाढवण्यासाठी 'या' गोष्टींचा करा आहारात समावेश

डेंग्यू तापामुळे प्लेटलेट्सची संख्या कमी होते. ही बाब आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. प्लेटलेट्सची कमतरता टाळण्यासाठी आणि ते वाढवण्यासाठी योग्य आहाराचे सेवन करणे आवश्यक आहे आणि या समतोल आहाराची जाणीवपूर्वक सवय लावणेही आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर ठरेल.

तुमच्या शरीरातील प्लेटलेट्सची संख्या पूर्ण होणे हे निरोगी शरीराचे लक्षण आहे. शरीरात प्लेटलेट्सचे प्रमाण कमी असल्याने माणसाला अनेक आजारांना सामोरे जावे लागते. प्लेटलेट्स हे रक्तपेशी आहेत जे रक्तस्त्राव थांबविण्यास मदत करतात. प्लेटलेट्स आपल्या शरीरात रक्ताच्या गुठळ्या (Blood clots) तयार करण्याचे कार्य करतात जेणेकरून दुखापत झाल्यास अतिरिक्त रक्त बाहेर येण्यापासून रोखता येते. प्लेटलेट्स या रंगहीन रक्तपेशी असतात ज्या रक्त गोठण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. जेव्हा एखाद्या व्यक्तीला दुखापत होते तेव्हा या रक्तपेशी एकत्र मिसळतात आणि रक्तस्त्राव थांबवतात. शरीरात प्लेटलेट्सची संख्या कमी असल्यास एखाद्या व्यक्तीला थ्रोम्बोसाइटोपेनिया नावाच्या आजाराला सामोरे जावे लागू शकते. शरीरातील प्लेटलेट्सची संख्या वाढवण्यासाठी तुम्ही विशेष आहार किंवा पूरक आहार (Supplements) घेऊ शकता. याशिवाय शरीरातील प्लेटलेट्सची संख्या वाढवण्यासाठी काही नैसर्गिक पद्धतींचा अवलंब केला जाऊ शकतो.

डेंग्यू ताप हा एडिस इजिप्त डासाच्या चाव्याद्वारे पसरणारा विषाणूजन्य संसर्ग आहे. डेंग्यू तापादरम्यान प्लेटलेट्सची संख्या कमी होते. ही बाब आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. प्लेटलेट्सची कमतरता टाळण्यासाठी आणि ते वाढवण्यासाठी सुयोग्य आहाराचे सेवन करणे आवश्यक आहे. आज या लेखाच्या माध्यमातून आम्ही तुम्हाला काही पदार्थांबद्दल सांगणार आहोत ज्यांचा तुम्ही तुमच्या आहारात समावेश करून प्लेटलेट्स वाढवू शकता.

पपईची पाने : डेंग्यूच्या तापामध्ये पपईची पाने प्लेटलेट्सची संख्या वाढवण्यास मदत करतात. तुम्ही त्यांना नीट धुवून, बारीक करून रस काढू शकता आणि पिऊ शकता.

डाळिंब : डाळिंबात मुबलक प्रमाणात अँटिऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन सी असते, जे प्लेटलेट्स वाढवण्यास मदत करतात. डाळिंबाचा रस पिणे देखील फायदेशीर आहे.

किवी : किवी फळामध्ये व्हिटॅमिन सी आणि इतर पोषक घटक मोठ्या प्रमाणात असतात, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि प्लेटलेट्सची संख्या वाढविण्यास मदत करतात.

गुळवेल : गुळवेल किंवा गुडूची हृदयाच्या आकाराची पाने म्हणून कॉर्डिफोलिया हे नाव पडले. भारत, श्रीलंका, म्यानमार अशा उष्णकटिबंधीय प्रदेशात आढळणारी गुळवेल ही एक वेल आहे. हिला अमृतवेल असेही म्हणतात. गुळवेलला हिंदी भाषेत गिलोय म्हणूनही ओळखले जाते. या वेलीचा रस सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि प्लेटलेट्सची संख्या वाढविण्यास ही वनस्पती मदत करते. याचे नियमित सेवन केल्यास फायदा होऊ शकतो.

बीटरूट : बीटरूटमध्ये लोह आणि फोलेटचे प्रमाण जास्त असते, जे रक्त तयार करण्यास मदत करते. हे सॅलड किंवा ज्यूसच्या स्वरूपात सेवन केले जाऊ शकते.

नारळ पाणी : नारळाचे पाणी शरीराला हायड्रेट ठेवते आणि त्यात इलेक्ट्रोलाइट्स असतात जे प्लेटलेट्सची संख्या वाढवण्यास मदत करतात.

हिरव्या भाज्या : पालक, मेथी, ब्रोकोली यांसारख्या हिरव्या भाज्यांमध्ये भरपूर प्रमाणात लोह आणि फोलेट असते. हे शरीरात रक्त तयार होण्यास मदत करतात आणि प्लेटलेट्सची संख्या वाढवण्यास मदत करतात.

व्हिटॅमिन सी युक्त फळे : संत्री, लिंबू, आवळा इत्यादी फळांमध्ये व्हिटॅमिन सी चे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे प्लेटलेट्स वाढण्यास मदत होते. यांचा आहारात समावेश करा.

पनीर आणि टोफू : पनीर आणि टोफूमध्ये प्रथिने आणि कॅल्शियमचे प्रमाण जास्त असते, जे शरीराला ऊर्जा देते आणि प्लेटलेट्सची संख्या वाढवण्यास मदत करते.

तुळशीची पाने : तुळशीची पाने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात आणि प्लेटलेट्सची संख्या वाढवण्यास मदत करतात. तुळशीच्या पानांचा रस किंवा चहा पिऊ शकता. ●●

दृष्टिक्षेप

प्रा. भगवती प्रकाश

राजशाही पुठिया

बांगलादेशातील मंदिरांचे भांडार

बांगलादेशातील राजशाही पुठिया हा प्रदेश प्राचीन अविभाजित भारतातील अशा काही मोजक्याच स्थानांपैकी एक आहे ज्यात गेल्या दोन सहस्राब्दीतील प्राचीन मंदिरे, मूर्ती, प्राचीन वास्तू, नाणी आणि शिलालेखांचे भांडार आहे. मंदिरांचे सुंदर नक्षीकाम, भव्य शिल्पे, प्राचीन हिंदू देवी-देवतांच्या सुंदर मूर्ती, मोहक राजवाडे, प्राचीन शिलालेख आणि हस्तलिखिते पाहण्यासारखी आहेत. तिथल्या वरेंद्र संशोधन संग्रहालयाच्या सहा दालनांमध्ये सिंधू संस्कृतीच्या पुरातन वास्तूंसह बंगालची सुंदर मंदिरे, नाणी आणि शिलालेखांसह असंख्य पुरातन वास्तू आहेत.

इतिहास

ब्रह्मवैवर्त पुराणात उल्लेख केलेल्या केवर्त साम्राज्यातून आलेल्या राज्यपरंपरेच्या उत्तरार्धात, राजशाही-पुठिया प्रदेशात मौर्य, गुप्त, पाल, राजा गणेशाचे वंशज, कलापहद, बारो, भुयान, पुंड्रवर्धन, बरियान ब्राह्मण राजवंश व राजा दिवाण मोहनलाल इत्यादींचे साम्राज्य होते. इसवीसन सातव्या शतकात (६४०-७३०) कैलवर्त नावाने कैवर्त राजवंशाचे साम्राज्यही पुन्हा उदयास आले. पुंड्रवर्धनच्या ब्राह्मण साम्राज्यानेही येथे राज्य केले. या काळातील सातव्या शतकातील प्राचीन नाणी राजशाही विद्यापीठाच्या वरेंद्र संग्रहालयात जतन केलेली आहेत.

बांगलादेशातील राजशाही पुठिया भाग सुमारे दोन हजार वर्षे प्राचीन मंदिरे, मूर्ती, प्राचीन वास्तू, नाणी आणि शिलालेख यांचे भांडार आहे. आज या मंदिरांची देखभाल, पूजा इत्यादी करणे ही मोठी समस्या आहे. धर्मांध व जिहादी कट्टरवाद्यांच्या हल्ल्यांपासून तेथील मंदिरांची सुरक्षा हे देखील एक गंभीर आव्हान आहे.

पाल घराण्याचे संस्थापक राजा गोपाल यांच्या राज्याचा उल्लेखही खलीमपूर ताम्रपटात आढळून येतो. दनुजमर्दन देव या नावाने ओळखल्या जाणाऱ्या राजा गणेशाची १४१७ सालची नाणी देखील वरेंद्र संग्रहालयात संग्रहित आहेत. राजा गणेशाच्या स्वतःच्या पूर्वजांपैकी एक राजा दनुजमर्दन यांच्या नावाने १४१७ साली जारी करण्यात आलेल्या नाण्यांमध्ये एका बाजूला राजाचे नाव कोरलेले आहे आणि दुसऱ्या बाजूला 'श्री चंडी चरण प्रयाण' असे कोरले आहे. या नाण्यांची किंमत सध्या १.२५ लाख रुपये आहे. त्यांचा विस्तार अराकान (म्यानमार) पर्यंत झाला आहे. कैवर्त वंशातील वर उल्लेखित राजे केवट जातीचे होते. काशीप्रसाद जायसवाल आणि पांडुरंग वामन काणे इत्यादी नामवंत संशोधकांनुसार पाल वंशाचा संस्थापक गोपाळ हा देखील शूद्र होता. अशा प्रकारे, पुंड्रवर्धन हा ब्राह्मणांच्या साम्राज्याच्या अधीन कैवर्त आणि पाल वंशातील राजा होता. अशा प्रकारे प्राचीन भारतात सर्व वर्णांचे राजे होते. त्यांनी बांधलेल्या कृष्ण मंदिराचे अवशेष आजही आहेत. संग्रहालयात भगवान विष्णूच्या भव्य प्राचीन चतुर्भूत मूर्तीसह मोठ्या प्रमाणात पुरातन वस्तू, शिलालेख, नाणी आणि मूर्ती आहेत.

पुठियाचे अकल्पनीय सुंदर मंदिर

पुठिया राजशाहीची मंदिरे जगातील सर्वात भव्य समजल्या जाणाऱ्या मंदिरांचे एक संकुल आहे. यापैकी काही प्रातिनिधिक मंदिरांचा थोडक्यात उल्लेख खालीलप्रमाणे आहे.

पंचरत्न गोविंद मंदिर : पुठियाच्या राजघराण्याने बांधलेले, भगवान कृष्णाचे हे मंदिर रत्नांनी जडलेल्या पाच उंच शिखरांनी सुसज्ज आहे. या मंदिराच्या भिंतींवर, राम लीला आणि कृष्ण लीला या मालिका अतिशय सुंदर आणि सुबकपणे आणि कलात्मकपणे चित्रित केल्या आहेत.

पंचरत्न शिव मंदिर: प्राचीन शिवसागर तलावाच्या काठी हे अतिशय भव्य आणि नयनरम्य शिवमंदिर आहे. तलावाच्या किनाऱ्यावर असे नयनरम्य शिवमंदिर कदाचित दुसरे नसेल. पाच उर्ध्व शिखरांसह या शिव पंचायतन मंदिराचे पाकिस्तानी सैनिकांनी बांगलादेश मुक्ती संग्रामादरम्यान (१९७१) नुकसान केले होते. त्यांनी शिवलिंग उखडून टाकण्याचे आणि नुकसान करण्याचे सर्व प्रयत्न करूनही ते सुरक्षित राहिले. हे भुवनेश्वर शिवमंदिर म्हणूनही ओळखले जाते.

छोटे आणि मोठे आन्हिका मंदिर: येथे श्री कृष्णाची दोन मंदिरे असून ती लहान आन्हिका मंदिर आणि मोठे आन्हिका मंदिर नावाने ओळखली जातात. त्यांची मृण्मय कला अतिशय भव्य आहे. भिंतींवर मातीच्या सुंदर कलाकृती आहेत.

अपर्णा काली मंदिर शक्तिपीठ : हे शक्तिपीठ राजशाही विभागातील बोगरा जिल्ह्यातील शेरपूर उपजिल्ह्यापासून २८ किमी अंतरावर भवानीपूर गावात आहे. या ठिकाणी माता सतीच्या पायाचा डावा पाय/डावी बरगडी पडली. इथपर्यंत पोहोचण्याची फारशी साधने नाहीत. प्रत्येक शक्तिपीठात विशिष्ट भैरवाचेही स्थान आहे. भैरव हा शिवाचा अवतार मानला जातो. येथे बामेश भैरव किंवा वामन भैरवाचे स्थान आहे. ●●

(पांचजन्यवरून साभार)

इतिहास

विजयनगरचे हिंदू साम्राज्य

दक्षिण भारतातील हंपी ही राजधानी असलेले राज्य 'राजवीर साम्राज्य म्हणून ओळखले जाते. विजयनगर हे दक्षिण भारतातील मध्ययुगीन काळातील एक प्रसिद्ध साम्राज्य होय.

इसवीसन १३३६ मध्ये कर्नाटकातील विद्यमान बेल्लारी जिल्ह्यात होस्पेट तालुक्यातील हंपी (विजयानगर) येथे तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेस पहिला हरिहर (१३३६-५६), पहिला बुक्क (कार्यकाळ १३५६-७७), मुद्दण, मारप्पा व कंपण या पाच बंधूंनी या राज्याची स्थापना केली. या बंधूंना विद्यारण्य म्हणजे माधवाचार्य (सु. १२९६-१३८६) स्वामींनी प्रेरणा दिली. या साम्राज्याच्या विस्तार दक्षिणोत्तर बेळगावपासून कन्याकुमारीपर्यंत आणि पूर्व-पश्चिम आंध्रपासून गोव्यापर्यंत झाला होता. तथापि विजयनगरचे आधिपत्य मानणाऱ्या राजांच्या प्रदेशांचा विचार केल्यास या साम्राज्याची सत्ता उत्तरेस नर्मदा नदीपर्यंत आणि पूर्वेस कटकपर्यंत (ओडिशा राज्य) भिडल्याची दिसते. सुमारे सव्वादोनशे वर्षे विजयनगरच्या हिंदू सम्राटांची अधिसत्ता टिकून होती. त्या काळात त्यांनी दक्षिणेत हिंदू संस्कृतीचे संवर्धन-प्रसार-प्रचार कार्य केले आणि दक्षिणेतील मुस्लिम शाह्यांच्या राज्यविस्तारास पायबंद घातला. विजयनगर हंपी, पंपाक्षेत्र, होस्पेट इत्यादी वेगवेगळ्या नावांनीही विजयनगरचा उल्लेख केल्याचे दिसून येते. इ. स. १३७३ च्या सुमारास विद्यानगरची (विजयानगर) सेना दक्षिण समुद्रापर्यंत पोहोचली. जवळजवळ दक्षिण हिंदुस्थानातील संपूर्ण प्रदेशावर या सेनेने दिग्विजय मिळविला. त्याप्रीत्यर्थ पहिल्या बुक्क राजाने 'विद्यानगर' या आपल्या नगरीचे नाव बदलून 'विजयानगर' असे ठेवले. तथापि स्थानिक लोक विजयनगर हंपी असाच याचा उल्लेख करतात. मुस्लिम सत्ताधाऱ्यांशी टक्कर घेऊन हिंदू धर्म, संस्कृती जिवंत ठेवणे हे विजयनगरच्या राजांचे ध्येय होते आणि त्यात ते यशस्वी झाले. विजयनगर साम्राज्याच्या वाढत्या शक्तीमुळे या तत्कालीन इस्लामी आक्रमकांना आपल्या राज्यात पराभूत व्हावे लागले आणि तेथून त्यांना पळ काढावा लागला. विजयनगरने बहामनी राज्याशी वारंवार युद्ध केले आणि त्यांना पराभूत करून सोडले.

कंपणाच्या पत्नीने मधुराविजयम् नावाचे काव्य लिहिले. कृष्णदेवराय (सु. १४८९-१५२९) याने आयुक्तमाल्यदा नावाचे तेलुगु भाषेत प्रबंध-काव्य लिहिले (१५११). वेंकट सेनापती अनंत यांच्या 'काकुस्थ-विजयम्' या ग्रंथातून ऐतिहासिक सामग्री मिळते. विजयनगरच्या दरबारात पोर्तुगिजांचा राजदूत असे आणि पोर्तुगिजांशी त्यांचे राजनैतिक संबधही होते. त्यामुळे पोर्तुगीज अहवालातून विजयनगरमधील काही घटनांचे तपशील मिळतात. विजयनगरच्या राजांनी अनेक राजप्रासाद, किल्ले, मंदिरे आणि अन्य वास्तू बांधल्या. त्यापैकी काहींच्या अवशेषांवरून त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कलात्मक दृष्टी आणि वास्तूशिल्पशैली दिसून येते. कंपली हे बेल्लारी, धारवाड, रायचूर, अनंतपूर, शिमोगा व चितळदुर्ग या विद्यमान जिल्ह्यांचे मिळून दक्षिण भारतातील एक स्वतंत्र राज्य होते. मुहम्मद तुघलकाने १३२६ मध्ये ते जिंकून तेथील राजपुत्र व सरदार यांना कैद केले आणि इस्लाम धर्म स्वीकारण्यास भाग पाडले. त्यांत हरिहर व बुक्क हे संगमाचे दोन पुत्र होते. त्यांनी दिल्लीच्या सुलतानाचे दक्षिणेकडील प्रदेशाकडे झालेले दुर्लक्ष आणि कंपलीमधील अनागोंदी यांचा फायदा घेऊन पुन्हा हिंदू धर्म स्वीकारून विजयनगर राज्याची स्थापना केली, असे काही इतिहास तज्ज्ञांचे मत आहे. हरिहरानंतर त्याचा धाकटा बंधू पहिला बुक्क गादीवर आला. बुक्कने राज्याचा विस्तार करून राजनारायण संबुरायाचा पराभव केला आणि अर्काट प्रदेश काबीज केला तसेच. कोंडविडू रेड्डींवर विजय मिळवून पेनुकोंडे (पेनुगोंडे) हा प्रदेश हस्तगत केला. त्याचा मुलगा कुमार कंपण याच्या विजयामुळे मदुराईच्या सुलतानाचे राज्य विजयनगर साम्रज्यात विलीन झाले. या घटनेचे कंपणाची पत्नी गंगादेवी हिने आपल्या 'मधुरविजयम्' या संस्कृत काव्यात सुरेख वर्णन केले आहे. रामेश्वरपर्यंतचा दक्षिण हिंदुस्थान विजयनगरच्या अधिपत्याखाली आला. हरिहराच्या काळापासून बहमनी आणि विजयनगर या राजकीय प्रभाव खूपच वाढला. गोवा बुक्कच्या आधीन होते. मलबार आणि श्रीलंका येथील राजांनी त्याला खंडण्या पाठविल्या. १३७४ मध्ये बुक्कने चीनमधील मिंग राजाकडे आपला राजदूत पाठवला होता. या काळात तुंगभद्रेच्या दक्षिणेस विजयनगरचे पूर्ण वर्चस्व प्रस्थापित झाले. बुक्क हा या साम्राज्यातील सर्वश्रेष्ठ राजा मानला जातो. तो पराक्रमी व कल्पक राजा होता. वैदिक धर्माच्या पुनरुत्थानासाठी त्याने पुष्कळ प्रयत्न केले. त्याने 'वेदमार्गप्रतिष्ठापक' हे बिरूद धारण केले आणि अनेक विद्वानांना आश्रय दिला. आपले गुरू माधवाचार्य आणि त्यांचे बंधू सायणाचार्य यांच्याकडून त्याने वेदांवरील भाष्ये लिहून घेतली. विजयनगरच्या साम्राज्याचा तोच खरा शिल्पकार मानण्यात येतो. त्याने आपल्या राजधानीचे 'विजयानगर' असे नामकरण केले.

तुळुव व आरधीडु घराणे: (१५०४-१६४६). तुळुव घराणे विजयानगराच्या इतिहासातील सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने प्रसिद्ध आहे. नरसा नायक हा या वंशातील पहिला राजा. त्याने साळुव नरसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा मोठा मुलगा तिम्म याला गादीवर बसविले. नरसा नायकाने चेर, चोल, पांड्या व दक्षिणेतील इतर राजे यांना नमवून गजपतीचा पराभव केला आणि आदिलखानाला कैद केले. राचयूर व मुद्गल हे किल्ले जिंकले. अंतर्गत बंडाळी मोडून काढून दक्षिण भारताचे प्रदेश (विद्यमान कर्नाटक व तमिळनाडू ही राज्ये) आपल्या सत्तेखाली आणले. त्यामुळे विजयानगरच्या पूर्वीच्या सीमा कायम झाल्या व त्यास वैभव प्राप्त झाले. नरसा नायकानंतर त्याच्या मुलगा दुसरा नरसिंह (वीर नरसिंह)-(१५३०-०९) गादीवर आला. तो पराक्रमी होता. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ कृष्णदेवराय (१५०९-२९) हा विजयानगरचा राजा झाला.

कृष्णदेवराय हा तुळुव वंशाचा राजा होता म्हणून याच्याबरोबर तुळुव वंशाचे राज्य सुरू झाले, असे मानले जाते. कृष्णदेवराय हा दक्षिण भारतातील अत्यंत कर्तृत्ववान असा राजा होऊन गेला. एक कुशल प्रशासक, शूर योद्धा आणि गाढा विद्वान म्हणून त्याची ख्याती होती. कृष्णदेवरायाच्या काळात विजयानगर साम्राज्य वैभवाच्या ऐन शिखरावर पोहोचले होते.त्याने पोर्तुगीज वास्तुविशारदांच्या मदतीने विजयानगरच्या आसपास कालवे खोदून तळी बांधली आणि कोरडवाहू जमीन पाण्याखाली आणली. त्याने अनेक प्रासाद, मंदिरे व शेकडो गोपुरे बांधली. त्यांपैकी रामस्वामी मंदिराचा विस्तार, विरूपाक्ष मंदिरातील कल्याणमंडप आणि एक शिखर, कृष्णस्वामी आणि विठ्ठलस्वामी ही दोन स्वतंत्र मंदिरे प्रसिद्ध आहेत. त्याने नरसिंहाची भव्य मूर्ती करवून घेऊन विजयानगरच्या सौंदर्यात भर घातली. ●●

पदर कर्तृत्वाचा!

अपर्णा कुळकर्णी / ९४२१२१२४४८

फुटबॉल हेच जीवन... अंजू तुरंबेकर

१९ जुलै राष्ट्रीय फुटबॉल दिवस म्हणून सगळीकडे साजरा झाला. यानिमित्ताने आपल्या देशाची फुटबॉलपटू अंजू तुरंबेकर यांच्याविषयी जाणून घ्यायलाच हवं. फुटबॉलचीच काय पण कोणत्याही खेळाची पार्श्वभूमी नसलेली खेडेगावातील एक सामान्य शेतकरी कन्या! प्रबळ इच्छाशक्ती व जिद्दीच्या जोरावर राष्ट्रीय फुटबॉलपटू म्हणून ओळख निर्माण करते आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर कोच बनते. संघर्षाच्या अग्निदिव्यातून जाते पण फुटबॉल खेळणं, सोडत नाही. अनेक विक्रम प्रस्थापित करीत स्वतःच्या ए.टी.फाउंडेशनची स्थापना करून फुटबॉलवरील प्रेमापोटी आयुष्य फुटबॉललाच समर्पित करणारी खेळाडू म्हणजे अंजू तुरंबेकर!

कोल्हापूर जिल्ह्यातल्या गडहिंग्लाज तालुक्यात असणाऱ्या बेकनाळ या छोट्याशा गावातील अंजू तुरंबेकर आज आशियाई फुटबॉल महासंघाच्या 'अ' श्रेणीच्या प्रशिक्षक झाल्या आहेत. या श्रेणीच्या प्रशिक्षक झालेल्या त्या सर्वाधिक युवा व्यक्ती ठरल्यात.

आशियाई फुटबॉल महासंघाच्या ग्रासरूट डेव्हलपमेंट समितीवर सदस्य म्हणून निवडली जाणारी पहिली भारतीय महिला म्हणूनही अंजू तुरंबेकर यांना ओळखलं जातं. गोव्यातील अत्यंत प्रतिष्ठित फुटबॉल क्लब म्हणून ओळख असलेल्या डेम्पो क्लबच्या त्या तांत्रिक संचालक आहेत. एखाद्या पुरुष संघाच्या टेक्निकल डायरेक्टर झालेल्या अंजू या पहिल्याच महिला ! भारतीय फुटबॉल महासंघासोबत तळागाळातील घटकांपर्यंत फुटबॉल पोहचवण्यासाठी त्यांनी सहा वर्षे काम केलं आहे. एखाद्या चित्रपटाला शोभेल अशी अंजू यांची ही यशोगाथा अनेकांसाठी ठरवलेल्या मार्गावर जिद्दीने कसे पुढे जाता येते? हे लक्षात घेऊन स्वप्नपूर्तीच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रेरक आहे.

अंजू यांचा आजवरचा प्रवास अवघड वळणाचा, खाचखळग्यांचा होता. पस्तीस वर्षांपूर्वी ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाविषयी औदासीन्यच होते. लग्न होईस्तोवर कष्टाची कामे करणे व जमेल तसे थोडेफार शिक्षण घेण्यासाठी मुलींना शाळेत पाठवण्याची मानसिकता असलेल्या कुटुंबात अंजू चौथे अपत्य म्हणून जन्माला आली. नकळत्या वयापासून शेतीतील कामे अंगावर पडली. शेतीशी जणू नाळच जुळलेली! निसर्गाच्या सान्निध्यात शरीर व मन मजबूत खंबीर होत गेले. त्याचाच पुढे फिटनेस आणि आयुष्याच्या अवघड प्रवासात फायदा झाला, असं त्यांना वाटतं. प्राथमिक शिक्षण बेकनाळ येथे घेतल्यावर पुढील शिक्षणासाठी गडहिंग्लाज येथे जाण्यापूर्वी, शेतातील कामे करून जावे लागेल, अशी अट घालण्यात आली होती. ती मान्य करून पुढच्या शिक्षणासाठी कशीबशी परवानगी मिळाली. पहाटे चार वाजता उठून, शेतीचे कामे आटोपून शाळेत जाण्याचा तिचा दिनक्रम झाला. शालेय जीवनात लंगडी, धावण्याची स्पर्धा, खो-खो अशा मैदानी खेळांमध्ये त्या आवडीने सहभागी व्हायच्या. कधी त्यामुळे शेतीकडे दुर्लक्ष झालं किंवा घरी पोहचण्यास उशीर झाला तर मारही बसायचा. असं सुरू असताना नववीत शाळेच्या भिंतीवर गडहिंग्लाज शहरातील 'मास्टर्स स्पोर्टस् क्लब'चे मुलींची फुटबॉल टीम बनविण्याविषयीचे पोस्टर बघितले आणि त्यांना आयुष्याचा सूर गवसला. फुटबॉलची काहीही माहिती नसताना, फक्त मुलींसाठी काहीतरी वेगळं आहे, हे बघताच कुतूहलापोटी मैत्रिणीसोबत अंजुने फुटबॉलच्या मैदानावर पाय ठेवला चप्पलबुटाशिवाय! अनवाणी पायांनी ही मुलगी एक ते दीड तास भान हरपून फुटबॉल खेळत राहिली. काय झाले असेल नेमके ते त्या किशोरीला कळले नाही. पण, त्या अवधीत तिला कष्ट-दुःखांपासून जणू सुटका मिळाल्यासारखं वाटलं. फुटबॉलमध्ये तिला अनोखा आनंद गवसला होता. आतून असं जाणवलं की, फुटबॉल हेच आपलं जीवन! तिथे उपस्थित सर्वांना हिच्या खेळातील चुणूक जाणवली. त्यांच्या प्रोत्साहनामुळे हिने आपलं फुटबॉल खेळायला जाणं सुरूच ठेवले. इतर मुलींनी खेळणं बंद केलं. पण, फुटबॉल प्रेमापायी वेडावलेल्या अंजूनं मुलांसोबत त्या मैदानावर खेळणं सुरू ठेवलं. घरी परतायला उशीर होऊ लागल्याने, घरच्यांना हुशार मुलींचे एक्स्ट?ा क्लासेस असतात, अशी बतावणी केली. तरी एकदिवस वडिलांच्या कानावर फुटबॉल खेळण्याची बातमी गेलीच. वडिलांचा बेदम मार बसलेला पण, मन अजून कणखर झाले. तिच्यासाठी तो काळ प्रचंड संघर्षाचा होता. शाळेतून घरी परतायला उशीर झाल्यावर मार बसणार या मानसिकतेतच अंजू घरी यायची. मार खाऊनही दुसऱ्या दिवशी शाळेतून फुटबॉल मैदानावर जाण्यासाठी तिचे पाय व मन ओढल्या जायचे. उशीर झाल्यास गावची बस मिळायची नाही, दुसऱ्या बसने मध्ये उतरून अर्धे अंतर पायी चालत यायची.

अंजू खेळणे सोडत नाही बघून त्यांच्या वडिलांनी मास्टर्स स्पोर्टस् क्लबच्या प्रशिक्षकांनासुद्धा धमकावले. पण, सहृदयी आणि परिस्थितीची जाण असलेल्या प्रशिक्षकांनी ती गोष्ट मनावर न घेता, अंजुला सहकार्य केलं.

अशा सहकार्याविषयी बोलताना अंजू म्हणतात की,'माझ्या संपूर्ण कारकिर्दीत मला अनेकांनी कसलीही अपेक्षा न ठेवता, कसलेही वाईट भाव न ठेवता मदत केली आहे. म्हणूनच आज मी या पदावर कार्यरत आहे.'

महाराष्ट्राच्या अंडर १९ महिला फुटबॉल संघाची निवड असल्याचं तिला कळलं, तेव्हा मुंबईला पाठवायला घरचे तयार नव्हते. त्यामुळे, मग अक्षरशः भांडून अंजू कधीही न पाहिलेल्या मुंबईला गेल्याच. मुंबईचे कोच संतोष कश्यप यांनी त्यांना छान मार्गदर्शन केले. त्यांची महाराष्ट्राच्या अंडर१९ संघात निवडही झाली. महाराष्ट्राच्या संघात निवड झाल्याची बातमी पेपरमध्ये आली. राष्ट्रीय स्पर्धेसाठी आसामला जायचं होतं. अंजू हार मानणाऱ्यातील नसल्याने घरच्यांच्या विरोधाला न जुमानता खेळायला गेली. अंजू दहावीत असताना पुन्हा संधी मिळाली तेव्हा दहावीत नापास झालीस तर तुझं लग्न लावून देऊ, अशी धमकी कुटुंबीयांनी दिली होती. अंजू खेळली आणि दहावीत उत्तीर्णही झाली. अकरावीत अंजू महाराष्ट्र फुटबॉल संघाच्या कर्णधार झाली. चार राष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी झाली. त्यांच्या वडिलांना वाटू लागले की, राष्ट्रीय स्पर्धा खेळली आहेसच तर आता पोलिसात भरती हो, नाही तर लग्न लावून देवू ! हा 'अमुक कर नाही तर...' हे काही अंजुचा पिच्छा सोडायला तयार नव्हते.

कोल्हापूरला पोलीस भरतीसाठी गेल्यावर, ग्राउंड अगदी आरामात क्लिअर केलं. लेखी परीक्षा बाकी होती. एकीकडे पोलीस भरती आणि दुसरीकडं गुजरातच्या राष्ट्रीय स्पर्धा! त्या म्हणतात,'मी लेखी परीक्षा दिली असती तर माझ्या आयुष्याचा मार्गच बदलला असता. मी खूप विचार केला आणि लेखी परीक्षा सोडून कोल्हापूरवरून सरळ अहमदाबादला गेले. यशस्वी होईस्तोवर घरी न परतण्याचा निर्णय घेवूनच!' गुजरातला झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत माघारलेला महाराष्ट्राचा संघ अंजुमुळेच उपविजेता ठरला. एकीकडे चांगली कामगिरी केल्याचा आनंद तर दुसरीकडे आता कुठे जायचं? हा प्रश्न होता. तेव्हा प्रशिक्षकांनी विचारलं की, पुण्यात येऊन फुटबॉल खेळणार का?

त्यांना परिस्थिती सांगितली. त्यांनीच अंजुची राहण्याची सोय करून पुण्यातल्या मॉडर्न कॉलेजमध्ये प्रवेशही मिळवून दिला. फुटबॉल सराव जोमाने सुरूझाला.

पुण्यात असताना खायचे काय? हा प्रश्न होताच. त्यावेळी, पूजाराणी नावाची पंजाबी मैत्रीण त्यांच्यासाठी आवर्जून डबा आणायची. पण, ज्या दिवशी ती आली नाही त्यादिवशी ग्लुकोज बिस्कीट पाण्यात बुडवून खायची. पुण्यात असताना पडेल ते काम केले. प्रसंगी भांडी घासली, पेट?ोल पंपावरही काम केले. अंजू धैर्याने दिवस काढत होती. अशातच प्रशिक्षकांकडून 'मॅजिक बस' या जागतिक एनजीओ विषयी कळल्याने त्या पदवीच्या दुसऱ्या वर्षाला असताना मुंबईत आल्या. त्या संस्थेमध्ये वंचित घटकातील मुलांना तसेच अनेक स्तरांवर त्या फुटबॉल शिकवू लागल्या. राष्ट्रीय पातळीवरची शिबिरं घेताना इंग्रजी बोलावं लागणार असल्याने जिद्दीने त्या हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या मुलींच्या मदतीने इंग्रजी शिकल्या आणि त्यांचा फुटबॉल प्रशिक्षक म्हणून उत्तम प्रवास सुरू झाला. मग २०१० मध्ये नेदरलँड येथे जाऊन आंतरराष्ट्रीय कोचचे प्रशिक्षण घेतले. नंतर, अमेरिकेसह आणखी तीन-चार देशांत प्रशिक्षण घेतले. मग विविध देशांत जाऊन प्रशिक्षण देण्याची संधी त्यांना मिळाली. खेळाडू ते प्रशिक्षक हा प्रवास विशेष उल्लेखनीय यासाठी आहे कारण, ज्या प्रशिक्षकांकडून त्यांनी स्वतः प्रशिक्षण घेतले त्यांनाही प्रशिक्षण देण्याचं भाग्य अंजु यांना लाभलं. जीवन सुंदर आहे, असं मानणाऱ्या अंजु आयुष्याच्या खडतर, संघर्षमय प्रवासाला रंजक प्रवास असे अगदी सहजतेने म्हणून जातात तेव्हा त्यांची जीवनविषयक खिलाडू वृत्ती आणि सकारात्मकता दिसून येते .

साप्ताहिकी

अपर्णा विचोरे-आठल्ये/९८२२७०१०६२

मुंबई दूरदर्शनचे मालिका युग

दूरदर्शनच्या त्या कालखंडात मुंबई दूरदर्शनवर सादर झालेल्या अनेक दर्जेदार मालिका आजही स्मरणात आहेत. त्यातल्या काही मालिका वेगळ्या विषयामुळे लक्षात राहिल्या.

'द्विधाता' ही बायपोलर पर्सनॅलिटी या मानसिक समस्येवर आधारित रहस्य मालिका तेव्हा खूप लोकप्रिय झाली होती.

गडगंज संपत्तीचा वारसा लाभलेली कलावंत पत्नी हेच आयुष्यातलं शल्य असलेल्या पतीला त्याचीच गुन्हेगारी मानसिकता कुठे पोहचवते?

हे बघताना प्रत्येक भागात रहस्य वाढत जाते आणि मालिकेच्या शेवटी होणारा रहस्यभेद प्रेक्षकांना अवाक करणारा ठरला. स्मिता तळवलकर आणि विक्रम गोखलेंच्या अभिनयाबद्दल काय बोलावे ! स्मिता तळवलकर आणि विक्रम गोखले ही जोडी त्याआधी 'जोडी तुझी माझी' या मालिकेतही लोकप्रियता मिळवून गेली होती. त्या नंतर 'द्विधाता' तेव्हा नव्यानेच सुरू झालेल्या 'झी' टिव्हीवर भाषांतर करून प्रक्षेपित केली गेली. दूरदर्शनवरच्या मालिकेसाठी दिनचर्या बदलण्याचा प्रघात 'रामायण'च्याहीपासून सुरू झालाच होता पण, एखाद्या स्त्री अनुवर्ती मालिकेलाही तीच लोकप्रियता मिळाली असेल तर?

'बंदिनी' ही श्री अधिकारी ब्रदर्सची मालिका कुटुंबातील सर्व सदस्यांच्या पसंतीला उतरलेली होती. प्रत्येक भागात मराठी नाट्यचित्रसृष्टीतील अनेक नावाजलेल्या कलाकारांनी हजेरी लावली होती. मालिकेचे शिर्षकगीत एक सुंदर भावगीत म्हणून आजही ऐकायला मिळते. शांताराम नांदगावकर यांच्या शब्दांना स्वरसाज चढवला होता. अरुण पौडवाल यांनी आणि अनुराधा पौडवाल यांचा स्वर लाभला होता. स्त्रीच्या वेगवेगळ्या रूपांना रेखाटणाऱ्या कथांना या मालिकेत चित्रांकित केलं होतं. मुंबई दूरदर्शनवर 'ये जो है जिंदगी'च्या धर्तीवर खुसखुशीत मालिका सादर झाल्या. 'असे पाहुणे येती','जोडी तुझी माझी' या सारख्या मालिकांनी प्रेक्षकांचे दर्जेदार मनोरंजन केले. म्हणूनच मुंबई दूरदर्शनला आता स्वतःचा प्रेक्षकवर्ग लाभला होता.

ब्रॅण्ड स्टोरी

निकिता गावंडे /९९७०६६३८१३

चहाचा प्रवास... डर्बन ते अहमदाबाद!

या वाघबकरी चहाचा लोगोही त्याच्या नावाप्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. भारत छोडो चळवळीशी नाते सांगणारा हा लोगो एकतेचा संदेश देणारा आहे. वाघ हा प्रतिनिधित्व करतो तो ब्रिटिशांचे आणि बकरी प्रतीक आहे तत्कालीन गुलाम भारताचे! कालपरत्वे याचा अर्थ आर्थिकदृष्ट्या सक्षम असणारा वर्ग आणि दुर्बल वर्ग असाही घेता येईल. आता हे वाघ आणि बकरी हे दोघेही एकाच कपातून चहा पितात. म्हणजे, गरीब-श्रीमंत, सबळ आणि दुर्बळ या सर्व घटकांना एका समान पातळीवर आणणारा धागा म्हणजे चहा! असा संदेश देणारा हा वाघबकरी चहा आपल्या 'हमेशा रिश्ते बनाये' या टॅगलाईनसह खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण ठरला.

साहिल म्हणाला,'बाबा! मागच्या वेळेला तुम्ही म्हटलं होतं की, तुम्ही एका चहाच्या ब्रॅण्डविषयी सांगणार आहात. आम्ही सर्वजण त्याविषयी जाणून घेण्यास उत्सुक आहोत. बरं आत्या ! चल गेस कर बघू, बाबा कुठल्या चहाविषयी बोलत असतील?' 'सोप्पं आहे. दादा बोलत असेल त्याच्या आवडत्या ब्रूकबॉण्ड रेड लेबल विषयी! त्याची सकाळ कुठे होते त्याशिवाय!' नयना आजीकडे बघून हसत म्हणाली. 'अगं, माझाच काय निम्म्या भारताचा आवडता चहा आहे ब्रूकबॉण्ड रेड लेबल! चल तर, आता याविषयीच सांगतो तुला...ब्रूकबॉण्ड कंपनीची सुरुवात युनायटेड किंगडम येथील मॅंचेस्टर येथे आर्थर ब्रुक यांनी केली,'बाबा पुढे म्हणाले. 'अच्छा! तर आर्थर ब्रुक यांच्या नावावरून ब्रुक तर, बॉण्ड काय जेम्स बॉण्ड यांच्या नावावरून का?' साहिल म्हणाला. 'साहिलराव, मस्करी पुरे! अरे, बॉण्ड याचा अर्थ होतो बांधिलकी!

आपल्या ग्राहकांना दर्जेदार चहा पुरविणे या कार्यासाठी पूर्णपणे समर्पित असणे आणि उत्पादक-ग्राहक यांच्यामध्ये बॉण्ड निर्माण करणे आणि जपणे हे! आर्थर ब्रुकचे ध्येय होते. ब्रुकचा बॉण्ड तो ब्रुकबॉण्ड!' 'बढिया आहे हे! मी तर कधी याचा विचारही केला नव्हता,' साहिल बोलला. बाबांनी पुढे सांगायला सुरुवात केली. 'वर्ष १९८४ मध्ये ही कंपनी युनिलिव्हरने विकत घेतली आणि स्वाद अपनेपन का! अशी टॅगलाईन वापरत, या कंपनीच्या रेड लेबल या ब्रॅण्डने भारतीयांच्या मनावर गारुड केले, ते कायमचेच!

चहाचा खरा आनंद मिळतो तो मित्र मैत्रिणींच्या घोळक्यात, खरं आहे ना? पण काही महाभाग असेही असतात की, ते एकांतात चवीचवीने चहाचा रसास्वाद घेतात.

अशा चहाप्रेमींसाठी १९६६ मध्ये या कंपनीने खास तयार केला ब्रुकबॉण्ड ताजमहाल चहा आणि त्यासाठी ब्रॅण्ड ॲम्बेसिडर म्हणून नेमणूक केली ती संगीत क्षेत्रातील एक दिग्गज व्यक्तिमत्त्व उस्ताद झाकीर हुसेन यांची. 'अरे हुजूर !वाह ताज बोलिये!' या टॅगलाईनसह हा ब्रॅण्ड चहाच्या दर्दीमध्ये आपली एक खास जागा बनवून आहे. चला, बरेच विषयांतर झाले. खरंतर मी त्यादिवशी बोलल्याप्रमाणे तुम्हाला एका वेगळ्याच ब्रॅण्डविषयी सांगणार होतो. तो ब्रॅण्ड म्हणजे चहाप्रेमींच्या मनात आणि कपात जागा मिळवणारा सुप्रसिद्ध वाघ बकरी चहा! या प्रसिद्ध ब्रॅण्डचे जनक आहेत नारनदास देसाई! वर्ष १८९२ मध्ये दक्षिण आफ्रिकेतील डर्बन येथे ५०० एकर चहाच्या मळ्यात त्यांनी चहाचा व्यवसाय सुरू केला.

पण, तेथील वांशिक भेदभाव व राजकीय अशांततेमुळे त्यांना वर्ष १९१५ मध्ये नाईलाजाने भारतात परतावे लागले. अशा अवस्थेत भारतात परतल्यावर त्यांनी पुन्हा नव्याने सुरुवात केली ती राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पाठिंब्याने! वर्ष १९१९ मध्ये त्यांनी अहमदाबाद येथे गुजरात चहा डेपोची स्थापना केली. वर्ष १९३४ मध्ये या गुजरात टी डेपोने 'वाघ बकरी' या आगळ्यावेगळ्या नावाने चहाचा ब्रॅण्ड सुरू केला. या वाघबकरी चहाचा लोगोही त्याच्या नावाप्रमाणेच वैशिष्ट्यपूर्ण आहे. भारत छोडो चळवळीशी नाते सांगणारा हा लोगो एकतेचा संदेश देणारा आहे. वाघ हा प्रतिनिधित्व करतो तो ब्रिटिशांचे आणि बकरी प्रतीक आहे तत्कालीन गुलाम भारताचे! कालपरत्वे याचा अर्थ आर्थिकदृष्ट्या सक्षम असणारा वर्ग आणि दुर्बल वर्ग असाही घेता येईल. आता हे वाघ आणि बकरी हे दोघेही एकाच कपातून चहा पितात. म्हणजे, गरीब-श्रीमंत, सबळ आणि दुर्बळ या सर्व घटकांना एका समान पातळीवर आणणारा धागा म्हणजे चहा! असा संदेश देणारा हा वाघबकरी चहा आपल्या 'हमेशा रिश्ते बनाये' या टॅगलाईनसह खरोखरच वैशिष्ट्यपूर्ण ठरला. 'किती सुंदर आणि महत्त्वपूर्ण माहिती दिलीस दादा तू! कित्येकदा हे नाव कानावर पडलेलं आहे. डब्यावरील लोगोही अनेकदा पाहिला आहे. तरीसुद्धा त्याचा असा काही ऐतिहासिक व सामाजिक संदर्भ असेल, असा विचार मी कधीच केलेला नव्हता. चला तर, आपल्या ज्ञानात एक खूप छान भर पडली. याचा आनंद एकेक कप चहा पिऊन साजरा करू या,' असं म्हणत नयना उठली आणि सर्वांसाठी चहा करण्याकरिता स्वयंपाकघराकडे निघाली.

गझल आरस्पानी

गझलनंदा / ८४२२०८९६६६

तेथेच जिंकण्याची केली पुन्हा तयारी...

मराठी गझलतंत्राबाबत थोडेसे सांगण्याचा प्रयत्न करते आहे. मित्रांनो, मागच्या शनिवारी गझलियत म्हणजे काय? यावर आपण बोललो. त्याचाच पुढला भाग म्हणजे राबता ! आता हा राबता म्हणजे काय? राबताचा सरसकट अर्थ म्हणजे वहिवाट! आता शेराच्या दोन ओळीत राबता किंवा वहिवाट असणे म्हणजेच त्यांच्यात परस्पर संबंध असणे कारण, मुळात शेराची व्याख्या करताना, शेराची पहिली ओळ ही एखाद्या विषयाची प्रस्तावना असावी आणि दुसरी ओळ त्याचा प्रभावी समारोप असायला पाहिजे. तसेच, एखाद्या वेळी तो समारोप नसेल तर किमान पहिल्या ओळीला पूरक, त्याला साजेसा अर्थ, पहिल्या ओळीचे सौंदर्य वाढविणारी अशी दुसरी ओळ असायला हवी. उदाहरण बघा,

तू मला घातले होते, चुलीच्या तीव्र जाळाशी
धगीला ऊब म्हणण्याची, योजना चालली आहे

या उदाहरणात शेराचा सानी मिसरा हा पूरक किंवा मदतनीस किंवा सौंदर्य वाढविणारा ठरतो. दोन्ही ओळी म्हणजेच हा शेर जर गझलेतून बाजूला काढला तर, गझल अपुरी रहात नाहीच पण, हा एक शेर स्वयंभू आणि स्वयंपूर्ण अशी कविता होऊन आपलं स्थान निर्माण करते. आता दुसरं उदाहरण बघू या.

पाच शेरांनी, मला समृद्ध केले
फक्त जखमांचा, जरा विस्तार झाला

किंवा

आई म्हणते, बरेच झाले मुलगी झाली
तिच्या पित्याला, किमान आता बाई कळली

पहिल्या शेरात एक साधं स्टेटमेंट आहे की, पाच शेरांनी समृद्ध होणं म्हणजेच गझल लिहिता येणं. दुसरी ओळ कुठली येणार याची रसिक वाट बघत असतानाच

'फक्त जखमांचा जरा विस्तार झाला' अशी ओळ जेव्हा सरसरत येते तेव्हा, वेदना आणि गझलेचं अतूट नातं अधोरेखित होतं. जेव्हा वाचक/श्रोते यांच्याकडून दाद मिळते. तोच राबता! दुसरा शेर बघू या.

आईला मुलगी बाळ होणं हे साधंसं स्टेटमेंट आहे. गझलकार पुढे काय बोलणार, याची श्रोता वाट बघतो. पण जेव्हा,'तिच्या पित्याला किमान आता बाई कळली' ही ओळ येते, त्याची श्रोत्याला कल्पना नसते. अनाहूतपणे ही ओळ कानावर पडताच त्याच्या तोंडून 'वाह' असा शब्द निघतो. तो आपल्या विश्वात जातो. त्याच्या घरी मुलगी असेल, एखाद्याला मुलगी नसेल तर तो त्याप्रमाणे विचार करू लागतो. मुलगी आपल्या पित्याचा विचार करू लागते.

माणूस म्हणजे पुरूष आपली आई, बहीण, पत्नी यांच्यापैकी कुणालाही गृहीत धरूशकतो. पण, मुलगी त्यांच्या काळजाचा तुकडा असते. कुणाला काही झालं तरी तो सहन करतो. पण, पोटच्या मुलीचं किंचितसं दुःखही त्याला सहन होत नाही. आपल्या पोटच्या लेकीमुळे एका स्त्रीचं दुःख त्याला कळू शकतं. केवळ दोन ओळींच्या शेरात असं काही गुपीत दडलेलं असतं आणि हे असणं म्हणजेच राबता तो किती टोकाचा आहे, हे वाचून कळतं. अशाच आशयाचा आणखी एक शेर इथे देतेय.

मुलगी झाली, हत्तीवरूनी साखर वाटा
मिटे काळजी, आयुष्याच्या संध्याकाळी

अशाप्रकारे दोन्ही ओळीत राबता असलेले शेर हे सदोदीत नवीन असतात. ते कधीच जुने होत नाहीत आणि सार्वकालिक असतात. शिवाय, ऐकणाऱ्याला असंच वाटत असतं की, इथे दिलेला शेर हा माझ्यासाठीच आहे. एक चपखल उदाहरण बघा. गझलसम्राट सुरेश भट यांचा हा शेर !

इतकेच मला जाताना, सरणावर कळले होते
मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते

अर्थात इथे आवर्जून एक गोष्ट स्पष्ट करते की, नवीन लेखन करणाऱ्याला एकदम हे साधणार नाही. त्यांनी गझलेचं तंत्र, शरीरशास्त्र आधी समजून घ्यावं कारण, पुढे बी.ए. व्हायचं असेल तर आधी पहिल्या वर्गासाठी शाळेत जायला हवं. पहिलीतल्या मुलाला आधी अक्षर ओळख व्हावी लागते. जसजसा तो वरच्या वर्गात जाईल, त्याला शब्द, साधे वाक्य, अलंकारीक वाक्य लिहिता येईल. पुढे अशाच सुंदर वाक्यांनी तो वाचकाला उत्तम लेखन देऊ शकेल. मंडळी, आज इथेच थांबू या,

नेहमीप्रमाणे आता माझी एक गझल...

संदेश

संदेश पावसाचा, आला कधी न दारी
भेगाळल्या धरेने, घ्यावी कशी उभारी

येथे शिशिर आला, घेऊनिया उन्हाळा
माझा वसंत तेव्हा, मज मागतो उधारी

बोलून लोक गेले, काहीतरी करावे
अपुल्याच पूर्वजांना, का नाचवी मदारी

छाटून पंख केले, बंदिस्त पाखराला
जाळीमधून त्याने, घ्यावी कशी भरारी

यमुना कदंब येथे, झाले मुकेच आता
मथुरेहुनी पुन्हा, का आला नसे मुरारी

विसरून आज गेले, माझ्यात काय होते
मी आठवीत आहे, माझी जुनी हुशारी

येथे पराभवाची, भरते अजून शाळा
तेथेच जिंकण्याची, केली पुन्हा तयारी

सोलापूर तरुण भारत
https://epaper.daniktarunbharat.com

'विष्णुपुरी'चा आज पुन्हा एक दरवाजा उघडला

तभा वृत्तसेवा
नांदेड, २८ जुलै -

येथील कै डॉ.शंकरराव चव्हाण विष्णूपुरी प्रकल्प ९३ क्षमतेने भरला असल्याने आज दि. २८ रोजी दुपारी प्रकल्पाचा एक दरवाजा उघडण्यात आला.

मागील पाच दिवसांपासून नांदेड जिल्ह्यात पाऊस सुरु आहे. प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात चालू असलेल्या सततच्या पावसामुळे प्रकल्पाच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. विष्णुपुरी प्रकल्प ९३ टक्के भरला असल्याने व प्रकल्पात येणाऱ्या पाण्याची आवक लक्षात घेता आज दि. २८ जुलै रोजी विष्णूपुरी प्रकल्पाचा ८ नंबरचा दरवाजा उघडण्यात आला. या दरवाजातून ४३६ क्युमेक्सने पाण्याचा विसर्ग सुरु असल्याची माहिती विष्णूपुरी प्रकल्पाचे उपविभागीय अधिकारी अरुण अंकुलवार यांनी दिली.

चार दिवसापासून सूर्यदर्शन नाही

शहरात मागील चार दिवसांपासून पावसाला सुरुवात झाली आहे. नक्षत्र बदलाने नव्या पावसाला सुरुवात झाली असून शहरात गारवा निर्माण झाला आहे. मागील चार दिवसापासून सुर्यदर्शन झाले नाही. मागील चार दिवसापासून पाऊस सुरू असल्याने जनतेची धावपळ उडत आहे. अनेकांनी पावसापासून संरक्षण व्हावे यासाठी दक्षता पाळत रेनकोट आणि छत्रीचा आधार घेत आहेत.त्यातच शहरातील अनेक रस्ते खोदून ठेवण्यात आल्याने या रस्त्यातून वाट काढण्यासाठी वाहनधारकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

मोर चौक ते वाडी रस्त्यासाठी कृति समितीचे आज उपोषण

तभा वृत्तसेवा
नांदेड, २८ जुलै -

मोर चौक ते वाडी बुद्रुक रस्त्याच्या मागणीसाठी नागरिक कृती समितीच्या वतीने आज लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे. मोर चौक परीसरात सकाळी ९ वाजल्यापासून संध्याकाळी पाच वाज वाजेपर्यंत हे उपोषण सुर रहाणार असून नागरीकांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे .

मारे चौक ते वाडी बु. हा या भागातील मुख्य व नांदेड शहराला जोडणारा रहदारीचा रस्ता आहे. सध्या ह्या रस्त्याची खड्डे पडून चाळन झाली आहे. नामांकीत शाळा, खाजगी क्लासेस यामुळे महिला, विद्यार्थी यांची मोठी ये जा असते. खराब रस्यामुळे दररोज अनेकांचे अपघात होत आहेत. सदरील रस्ता दुरस्त करण्यात यावा या मागणीसाठी वाडी बु नागरीक कृती समितीच्या वतीने सुमारे तीन हजार सहयांचे निवेदन जिल्हाधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी यांना देण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा एकदा निवेदन देऊनही प्रशासनाने लोक भावनेला केराची टोपली दाखवली. त्यामुळे त्रस्त झालेल्या नागरीकांच्या वतीने हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करावा यासाठी आज सोमवारी एक दिवसाचे लाक्षणीक उपोषण करण्यात येणार आहे. यानंतरही हा रस्ता दुरुस्त झाला नाही तर तीव्र आंदोलन केले जाईल अशी माहिती कृती समितीचे अध्यक्ष डॉ. दिलीप शिंदे, सचिव विजय कुलकर्णी, कार्याध्यक्ष संकेत जमदाडे,उपाध्यक्ष वसंत कऱ्हाळे, नंदकुमार बनसोडे, किरन नाईक, बी.बी एंगडे यांनी दिली.

संक्षिप्त वृत्त

उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त उमरीत रुग्णांना फळे वाटप

उमरी - महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव बाळासाहेब ठाकरे यांना दिर्घ आयुष्य लाभो ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना कार्यालयात ठाकरे यांचा वाढदिवस साजरा करुन उमरी तालुकाशिवसेनेच्या वतीने शिवसेना तालुका प्रमुख बालाजी पाटील सावंत यांच्या आदेशाने तथा उमरी तालुक्याचे जेष्ठ शिवसैनिक शिवाजी पाटील हस्सेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसैनिकांच्या उपस्थितीत उमरी येथील ग्रामिण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. यावेळी डॉ गोविंद राठोड, शिवाजी पाटील हस्सेकर, संजय हंबर्डे, अँड विशाल अचकुवार, श्रीपत पाटील सावंत, डॉ सुरज सावळे पाटील, गोविद शिंदे, साईनाथ हिवराळे, सुरेश ढगे, मारोती शिंदे हस्सेकर, एस के हंबर्डे, माधव शिंदे, सयाजी ताटलेवाड, तिरुपत पाटील जाधव, डॉ अर्जुन शिंदे राजु पांचाळ, नागोराव शिंदे, दिगांबर गोणेकर, सदाशिव केसगिरे, यांच्या सह असंख्य शिवसैनिक उपस्थित होते.

उपमहानिरीक्षक शहाजी ऊमाप यांचे स्वागत

नवीन नांदेड - नांदेड परिक्षेत्राचे नूतन पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी ऊमाप यांनी पदभार स्विकारताच असर्जन येथील राज्यपाल पुरस्कार पोलीस पाटील खंडेराव बकाल यांनी स्वागत केले. नांदेड परिक्षेत्राचे नूतन पोलीस उपमहानिरीक्षक म्हणून शहाजी उमाप यांनी २६ जुलै रोजी पदभार स्विकारला. दरम्यान, राज्यपाल पुरस्कार प्राप्त पोलीस पाटील खंडेराव बकाल यांनी पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांची सदिच्छा भेट घेतली तसेच पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी गंगाधर थाटे (रहाटी), माधव बोकारे पाटील (सोमेश्वर) यांची उपस्थिती होती.

बी.आर.पांचाळ यांना महाराष्ट्र भूषण व जीवनगौरव पुरस्कार

भोकर - पत्रकारिता क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करून सर्व सामान्यांना न्याय देत सामाजिक कार्यात सहभाग घेणारे भोकर येथील ज्येष्ठ पत्रकार बी.आर.पांचाळ यांना महात्मा कबीर समता परिषदेचा महाराष्ट्र भूषण व जीवन गौरव पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. पत्रकार बी.आर. पांचाळ यांनी मागील ३४ वर्षापासून पत्रकारितेमध्ये वेगळा ठसा उमटवला असून ग्रामीण भागातील समस्या, ग्रामस्वच्छता, जलसंधारण, वृक्षारोपण अशा विविध विषयावर लिखाण करून प्रश्न मांडले आहेत, धार्मिक व सामाजिक कार्यामध्येही त्यांचा मोठा सहभाग असतो यापूर्वी त्यांना विविध संस्थांनी त्यांचा गौरव केला आहे त्यांच्या कार्याची दखल घेऊन महात्मा कबीर समता परिषद यांच्या वतीने वर्ष २०२३-२०२४ चा महाराष्ट्र भूषण व जीवन गौरव पुरस्कार घोषित करण्यात आला आहे परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मुकुंदराज पाटील यांनी पुरस्कार घोषित करण्यात आल्याचे पत्र पाठवले असून १४ऑगस्ट रोजी नांदेड येथे पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेकांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.

अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी जाहिर करा : पांडुरंग दाढेल

लोहा - साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शासकीय सुट्टी जाहिर करावी अशी मागणी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुर्णाकृती पुतळा समितीचे अध्यक्ष पांडुरंग दाढेल यांनी शासनाकडे मागणी केली आहे. साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती १ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रासह अनेक देशामध्ये मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. महाराष्ट्र राज्यात मातंग समाज व बहुजन कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. त्यांना जयंती सोहळ्यात उपस्थित राहण्यासाठी सार्वजनिक सुट्टी असणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात शासनाने या विषयाकडे गांर्भीयांने लक्ष देवून १ ऑगस्ट रोजी शासकीय सुट्टी जाहीर करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी पदावर डॉ. संगिता चंद्रकांत देशमुख रुजू

नांदेड - जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी या पदावर डॉ. संगिता चंद्रकांत देशमुख यांची पदस्थापना शासन आदेशान्वये करण्यात आली आहे. त्या अन्वये डॉ. संगिता चंद्रकांत देशमुख या १६ जुलै २०२४ रोजी जिल्हा परिषद नांदेड येथे जिल्हा आरोग्य अधिकारी पदावर रुजू झाल्या आहेत. आरोग्य सेवेतील कामाचा त्यांना प्रदीर्घ अनुभव असून यापुर्वी त्या वाशिम येथे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी व सांगली येथे जिल्हा हिवताप अधिकारी तसेच सातारा येथे तालुका आरोग्य अधिकारी या पदावर कार्यरत होत्या. जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड या पदावर रुजू झाल्यानंतर त्यांनी अधिकारी व कर्मचारी यांचा विविध आरोग्य विषयक राष्ट्रीय कार्यक्रमांचा सविस्तर आढावा घेवून मार्गदर्शन केले. या अनुषंगाने आवश्यक त्या सूचना केल्या.

नांदेड - राज्यात मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेअंतर्गत वैयक्तिक शेततळे योजनेचा अर्ज करण्यासाठी सेतूसुविधा केंद्र, गावातील कृषि सहाय्यक, तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

नांदेड जिल्हयातील उद्योजकांसाठी मैत्रीच्या माध्यमातून सुवर्णसंधी

नांदेड - उद्योग संचालनालयातंर्गत जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड, सिडबी व मैत्री तर्फे नांदेड जिल्हयातील उद्योजकांसाठी, उद्योग क्षेत्रातील कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे, जिल्ह्यात उद्योजकीय वातावरण अधिक व्यापक स्वरुपात वाढवून रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्याप्रमाणात निर्माण करण्यासाठी, उद्योगाच्या विकासाकरिता शासनाच्या विविध योजनांच्या माहितीसाठी आज जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांचे अध्यक्षतेखाली, उद्योग भवन, कार्यालय जिल्हा उद्योग केंद्र, शिवाजीनगर, नांदेड येथे कार्यशाळा संपन्न झाली.

मुदखेड येथे अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पत्रकारांना रेनकोट वाटप

तभा वृत्तसेवा
मुदखेड, २८ जुलै -

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जिल्हाध्यक्ष इजिनियर विश्वंभर पाटील पवार यांच्याकडून मुदखेड येथील शासकीय विश्रामगृह येथे तालुक्यातील पत्रकारांना पावसापासून त्यांचे संरक्षण करण्यासाठी रेनकट देऊन अजित दादा पवार व सुनील तटकरे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला जिल्हाध्यक्षा नांदेड सौ.पूजाताई माधव व्यवहारे,मराठी पत्रकार सांघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, उपाध्यक्ष नामदेव बिच्चेवार, तालुका सचिव साहेबराव गागलवाड, कार्याध्यक्ष दिनेश शर्मा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक कार्याध्यक्ष नांदेड हनुमंत पाटील नटूरे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मुदखेड कार्याध्यक्ष शंकर पाटील डोणगावकर, मुदखेड शहराध्यक्ष मोहम्मद बुरान,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी युवक भोकर तालुकाध्यक्ष दर्शन पाटील डुरे सायाळकर,महिला आघाडी मुदखेड शहराध्यक्ष सौ.रुक्मिणी कुंचटवाड, ज्ञानेश्वर गायकवाड, ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष नांदेड गजानन बोडके,सोशल मीडिया जिल्हा उपाध्यक्ष नांदेड माधव व्यवहारे, सोशल मीडिया तालुकाध्यक्ष भोकर सचिन सुंळे नांदेकर,गंगाधर कुंचटवाड, प्रदीप ढगे,दिलीप सरोदे,शेख इरफान युवक विधानसभा अध्यक्ष ,रामा गुंजकर,शेख साजिद युवक जिल्हा उपाध्यक्ष, शेख इरफान अल्पसंख्यांक शहराध्यक्ष,शेख हकीम शहर उपाध्यक्ष, विनायक देशमुख,राजू गायकवाड, शेख मुखीद अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष, बबन गायकवाड शहर उपाध्यक्ष ,बालाजी बिंदगे, आनंदा निखाते, संतोष दर्शनवाड, मोहम्मद इम्रान, गोपाल सूर्यवंशी यांच्यासह मुदखेड तालुक्यातील व शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

लोह्यात हभप विशाल महाराज खोले यांचा किर्तन सोहळा

तभा वृत्तसेवा
लोहा, २८ जुलै -

नांदेड जिल्ह्याचे माजी खा. लोहा -कंधार मतदार संघाचे भाग्यविधाते लिंबोटी धरणाचे शिल्पकार प्रतापराव पाटील चिखलीकर व नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे बँकेचे संचालक युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ३ ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता सुप्रसिद्ध किर्तनकार हभप विशाल महाराज खोले यांचा भव्य किर्तन कार्यक्रमांचे दिपक पाटील कानवटे , केशव पाटील पवार, आवीनास पाटील पवार यांनी आयोजन केले आले आहे.या कीर्तन सोहळ्यास ह भ प आत्माराम महाराज रायवाडीकर, ह भ प लक्ष्मीकांत महाराज लोहेकर, गायनाचार्य गणेश रावजी माळेगावकर, सदानंद महाराज रायवाडीकर, पप्पू महाराज पोले, सोपान महाराज फळेकर, मृदंगमणी राजाभाऊ गुरुजी सोनमांजरेकर, मृदंग सम्राट विशाल महाराज बाबुळगावकर यांच्या कार्यक्रमांचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन दिपक पाटील कानवटे, पत्रकार संघाचे जिल्हा उपाध्यक्ष केशव पाटील पवार, अविनाश पाटील पवार यांनी केले आहे.

पाणी साचल्याने रेल्वेच्या भूयारी मार्गावरील वाहतूक बंद

तभा वृत्तसेवा
भोकर, २८ जुलै -

शहरातील रेल्वे भुयारी मार्ग सुरु होऊन दोन वर्षाचा कालावधी लोटला असताना अल्पावधीतच या बोगस कामाचे पितळ उघडे पडले असून भुयारी मार्गावर जागोजागी खड्डे व खड्ड्यामध्ये पाणी साचले आहे. वाहनधारकांच्या सोयीसाठी रेल्वे विभागाच्या वतीने भुयारी मार्ग बांधून वाहतूकीसाठी सुरू करण्यात आला परंतु पावसाचे साचलेले पाणी ईतरत्र जाण्याकरिता व्यवस्था करण्यात आली नाही परिणामी पावसाचे पाणी सदरील भुयारी मार्गातच महिनाभरापासून साचल्याने याठिकाणी तळ्याचे स्वरुप आले आहे.यामूळे वाहनाना ये जा करिता वाहनधारकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली एकाच भुयारी मार्गाचा वापर करावा लागत असल्याने या ठिकाणी छोटे-मोठे अपघाताची मालीका सुरु आहे. संबधितांना वारंवार सूचना देऊन सुद्धा रेल्वे विभागाकडून कोणत्याही उपाययोजना करण्यात आल्या नाही. सलग एका महिन्यापासून भूयारी मार्गात पाणी साचलेले आहे. रेल्वे विभागाने या भुयारी मार्गातील साचलेले पाणी तात्काळ काढण्याची व्यवस्था करण्यात यावी अन्यथा साचलेल्या पाण्यामध्ये मत्स्यपालन करण्याची परवानगी द्यावी अशी मागणी जनजागृती माहिती अधिकार समितीचे नांदेड जिल्हा अध्यक्ष एजाज कुरेशी यांनी केली आहे.



इयत्ता दहावी व बारावी पुरवणी परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये बदल

तभा वृत्तसेवा
नांदेड, २८ जुलै -

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणारी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता १० पुरवणी परीक्षा १६ जुलै ते ३० जुलै २०२४ आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता १२ वी पुरवणी परीक्षा १६ ते ८ ऑगस्ट २०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली आहे. तथापि २६ जुलै २०२४ रोजी राज्याच्या काही जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा इशारा देण्यात आलेला आहे. त्यामुळे २६ जुलै रोजी होणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र इयत्ता १० वी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता १२ वी परीक्षेच्या वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला आहे. या वेळापत्रकातील बदलाची सर्व संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, विद्यार्थी, पालक व अन्य घटकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन राज्य मंडळाचे सहसचिव मेधा निरफराके यांनी केले आहे.

जिल्ह्यात विद्यार्थी अभ्यासक उपक्रम राबविण्यात येणार

तभा वृत्तसेवा
नांदेड, २८ जुलै -

जिल्हा परिषद आणि शासन स्तरावील राबविण्यात येणा-या विविध योजनाची अंमलबजावणी अधिक प्रभावी होण्यासाठी तसेच अभ्यासपूर्ण उपाययोजना सुचविण्यासाठी नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल कनवाल यांनी महाविद्यालयातील विद्यार्थी अभ्यासक (Rural Fellows) हा अभिनव उपक्रम हाती घेतला असून आज त्यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

जिल्हा परिषदेच्य यशवंतराव चव्हाण सभागृहात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात उच्च शिक्षण विभागाचे सह संचालक डॉ. किरणकुमार बोंदार, माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी माधव सलगर आदींची उपस्थिती होती.

देगलुर - सावित्रीबाई फुले प्राथमिक व माध्यमिक विद्यालय येथे शिक्षण सप्ताहचा समारोप विद्यार्थ्यांना स्नेह भोजन देऊन करण्यात आला या प्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक यशवंत गजभारे व सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. (छाया: विशाल पवार)

भाजपा संयोजक पद बदलण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार : उमाकांत भोरे

तभा वृत्तसेवा
हदगाव, २८ जुलै -

हदगाव - हिमायतनगर भाजपा संयोजक पद हे मागच्या काही महिन्यापासून रिक्त होते त्या ठिकाणी दोन्ही तालुक्यातीलच कार्यकर्त्यांमधून निवड होणे अपेक्षित असताना अचानकपणे हदगाव - हिमायतनगर तालुक्यापासून शंभर किलोमीटर दूर असलेल्या तालुक्यास हे पद भेटल्यामुळे भाजपा तालुक्यातील सर्व कार्यकर्ते गोंधळलेल्या अवस्थेत असून मोठ्या प्रमाणात असंतोष उफळून आला आहे. हे पद तालुक्यातीलच कार्यकर्त्यांना देऊन न्याय द्यावा अशी मागणी करण्याकरिता भाजपाचे तालुका सरचिटणीस उमाकांत भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक शिष्टमंडळ लवकरच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पश्चात तत्कालीन भाजपाच्या नेत्या तथा हदगाव- हिमायतनगर संयोजक सूर्यकांता पाटील यांनी आपल्या सदस्य तत्त्वासह संपूर्ण पदाचे राजीनामे दिले होते तदनंतर दोन्ही तालुक्यातील कार्यकर्त्यांना असा विश्वास होता की, स्थानिक कार्यकर्त्यांमधूनच या पदासाठी निवड केली जाईल पण काही दिवसापूर्वी संयोजक पदासाठी दूरवरच्या तालुक्याला संधी दिली असल्याकारणाने इथल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमधला असंतोष उफळून आला असून त्यानिमित्ताने भाजपाचे सरचिटणीस उमाकांत भोरे यांच्या मार्गदर्शनाखाली एक शिष्टमंडळ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन या निवडीमुळे आगामी होणाऱ्या विधानसभा निवडणुका तदनंतर मिनी मंत्रालय समजले जाणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व स्थानिक स्वराज संस्था या निवडणुकीत पक्षास फटका बसण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही तरी पक्षास फायदा होऊन दोन्ही तालुक्यात वातावरण अनुकूल राहण्यासाठी त्या ठिकाणी स्थानिक तालुक्यातूनच संधी देण्यात यावी अशी मागणी या भेटीत करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आले.

कंधारच्या शांतिदुत उद्यानासाठी तीन कोटी; अद्यावत अभ्यासिका होणार : माजी खा. चिखलीकर

तभा वृत्तसेवा
कंधार, २८ जुलै -

लोहा-कंधार तालुका हा माळरान भाग असला तरी येथील विद्यार्थी मेहनती आहेत .त्या बळावर यश संपादन करतात राज्याच्या वेगवेगळ्या भागात आमच्या विद्यार्थ्यांनी नौकरीत नाव लौकिक मिळविला आहे. कंधार येथील शांतिदुत गोविंदराव पाटील चिखलीकर सार्वजनिक उद्यानाचे शुभोभिकरणा साठी तीन कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला असून त्यातच अद्यावत अभ्यासिका करण्यात येणार आहे स्पर्धेतील टिकण्यासाठी परिश्रम व जिद्द चिकाटी ठेवा यश हमखास मिळते असे मार्गदर्शन जिल्ह्याचे नेते माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी केले.

शांतिदुत प्रतिष्ठानच्या वतीने लोकनेते प्रतापराव पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने संत नामदेव महाराज मंगल कार्यालय कंधार येथे प्रसिद्ध व्याख्याते विठ्ठल कागणे यांचे करिअर मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते

यावेळी व्यासपीठावर माजी खा. प्रताप पाटील चिखलीकर, सेवानिवृत्त शिक्षण संचालक डॉ गोविंद नांदेडे, तालुकाध्यक्ष प्रा. किशनराव डफडे, गंगाप्रसाद यन्नावार,भाजपा महिला मोर्चा तालुकाध्यक्षा ॲड जयमंगला औरादकर, प्रा मुंडे जिल्हाउपाध्यक्ष भगवान राठोड, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष बाळासाहेब गर्जे, मधुकर. डांगे, निलेश गौर, वरपडे, दत्तात्रय चंदनफुले, शांतीदूत प्रतिष्ठानचे एन जी कदम ,प्रा शिवाजी अंबुलगेकर हरिहर धुतमल, अप्पाराव पवार ,साहेबराव चिखलीकर आदि मान्यवर उपस्थित होते

जिल्ह्याचे नेते प्रतापराव पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कंधार येथे शांतिदुत गोविंदराव पाटील सार्वजनिक उद्यानात तीन कोटी रुपये खर्चून अद्यावत अभ्यासिक केली जाणार आहे तसेच विद्यार्थ्यांना कोणतेही अडचण असेल तर आपण नेहमीच सोडविली आहे यापुढेही सोडविणार असे ग्वाही दिली व्याख्याते विठ्ठल कागणे यांनी हसवती कधी आत्मचिंतन करावयास भाग पाडत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा.कागणे यांनी खडसर प्रवासात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना कानमंत्र दिला. राज्याचे पूर्व शिक्षण संचालक डॉ गोंविद नांदेडे यांनी अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. जीवनात यश संपादन करताना कोणत्या गोष्टी केल्या पाहिजे हे सांगताना प्रतापराव पाटील यांच्या सारखे नेतृत्व आपणस लाभले आहे त्याचे ते जपणे गरजेचे आहे असे आवर्जून सांगितले. शांतिदुत प्रतिष्ठानच्या आयोजक .प्राणिताताई देवरे

चिखलीकर यांनी प्रास्ताविकात मार्गदर्शन करताना सांगितले की, लोहा कंधार हा आपला दुर्गम डोंगराळ भाग आहे.आपण रांगडी माणसं त्यामुळे एखाद्या संकटावर मात करून परिस्थितीशी झुंज देत आपण आयुष्यातील प्रत्येक क्षेत्रात निश्चितपणे यशस्वी होतो.विद्यार्थ्यांना शैक्षणिक अडचणीत कायमच आम्ही मदत करत असतो यापुढे ही करत राहू विद्यार्थ्यांना कुठली ही शैक्षणिक अडचण असेल तर ती आपण .प्रतापराव पाटील चिखलीकर साहेबांच्या माध्यमातून आवश्यक समस्या तात्काळ सोडवू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक बंधू भगिनींचा सत्कार सन्मान या वेळी करण्यात आला. संचलन व आभार गंगाप्रसाद यन्नावार यांनी केले.